# हिंदुबोध

संपादक : रविकांत कळंबकर

॥ इदं शास्त्रं, इदं शस्त्रम् ॥

विश्व हिन्दू परिषद
धर्मो रक्षति रक्षितः

■ शके १९४७ ■ वर्ष २५ ■ अंक ५ ■ ऑगस्ट २०२५ (मासिक) ■ मूल्य ₹ २०/- ■ पृष्ठ संख्या ४४

■ HINDUBODH ■ PUNE ■ VOL. 25 ■ ISSUE NO 5 ■ Aug 2025 (MONTHLY) ■ PRICE ₹ 20/- ■ PAGES 44




## विकसित भारत! विजयी भारत!!


आमच्या
साथीने करा
गृहसौख्याचा
श्रीगणेशा
हक्काचं घर असावं हे कुटुंबातल्या प्रत्येकाचं स्वप्नं असतं. हे स्वप्नं साकारण्यासाठी 'जनता गृहकर्ज योजना' घेऊन आम्ही आहोत सदैव तुमच्या सोबत. जनता बँक गृहकर्ज म्हणजे सहज सोपी प्रक्रिया, परवडणारे दर आणि तत्पर सेवा. तेव्हा नवीन घराचे स्वप्नं साकार करा आणि सुखी आयुष्याचा श्रीगणेशा करा!
सर्व गणेशभक्तांना गणेशोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा!
जनता
गृहकर्ज
योजना
• व्याजदर ७.७५%* पासून सुरु
• रु. ३ कोटींपर्यंत अर्थसहाय्य
• परवडणारे EMI
*अटी व नियम लागू.
जनता सहकारी बँक लि., पुणे
मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक
मुख्य कार्यालय : १४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव मार्ग, पुणे ४११००२. दूरध्वनी : ०२०-२४४५३२५८ / ५९
टोल फ्री क्रमांक : 1800 233 3258
www.janatabankpune.com

मासिक
**हिंदुबोध**
वर्ष - पंचवीस : अंक ५ वा
शके १९४७
ऑगस्ट २०२५

संपादक
श्री. रविकांत कळंबकर
ravi.kalambkar@gmail.com

निवास
एबीसी जंक्शन, ए बिल्डींग, फ्लॅट नं. ६,
आकुर्डी रेल्वेस्टेशन जवळ,
निगडी प्राधिकरण, पुणे ४११०४४

[redacted]

संपादक मंडळ
श्री. किशोर चव्हाण - प्रांत मंत्री
श्री. ॲड. सतिश गोरडे - प्रांत सहमंत्री
श्री. कृष्णकांत चांडक - प्रांत कोषाध्यक्ष
श्री. श्रीपाद रामदासी - प्रांत प्रचार-प्रसार प्रमुख
श्री. अनिल सांबरे - नागपूर
श्री. विजयकुमार पिसे - सोलापूर

संपादक मंडळ सदस्य
श्री. नितीन वाटकर
प्रांत जाहिरात व वर्गणीदार प्रतिनिधी

पत्र व्यवहार
व्यवस्थापक
मनोज शेलार
मो: ९०४९३९६३६३

अंकमूल्य रु. २०/-, वार्षिक वर्गणी रु. २००/-

मुद्रण स्थळ
संवाद ट्रेडप्रिंटस्, ५९५, शनिवार पेठ, पुणे - ३०.
दूरभाष : २४४८ ५६ ३२
sanwadpvt@gmail.com

## अनुक्रमणिका

✦ संपादकीय.... काळ रात्री कडून, विजयी माळेकडे!
रविकांत कळंबकर ................................ ०५

✦ वि. हिं. परिषद प्रांत वृत्त ................................................ ०६

✦ चांगल्या बातम्या
कुमार आठवले .................................... १५

✦ ५० वर्षापूर्वीच संविधान बदलले होते!
विजयकुमार पिसे ................................ १७

✦ संविधान आणि त्याची समरसता
ॲड. स्वाती जेरे ................................ १९

✦ २५ जून १९७५ : एका काळ रात्रीची सुरूवात!
रवींद्र मुळे .......................................... २२

✦ स्वदेशी आकाश क्षेपणास्त्र - भाग १
काशीनाथ देवधर ................................ २७

✦ जिहाद्यांनी केला विध्वंस, तर स्वयंसेवकांनी केली सेवाकार्ये
डॉ. गिरीष आफळे ................................ २८

✦ पुराणातील इतिहास आणि इतिहासातील पुराण - लेखांक ७
हणमंत नाडगौडा .................................. ३१

✦ शैक्षणिक संस्कार - भाग १
यशवंत लिमये ...................................... ३३

✦ चालुक्य राजांची मंदिरे
शंतनू परांजपे ...................................... ३४

✦ कशासाठी हवा आहे भिकाऱ्यांचा डॉक्टर?
डॉ. अभिजीत सोनावणे .......................... ३६

✦ स्मरण क्रांतिवीरांचे
राजन वडके ........................................ ३८

प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

'हिंदुबोध' मासिक मालक, विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश यांचेकरिता मुद्रक व प्रकाशक विवेक सोनक यांनी संवाद ट्रेडप्रिंटस्, बी - ७, गोवईकर बिल्डिंग, ५९५ शनिवार पेठ, पुणे ४११०३० येथे छापून, भारत भवन, १३६० शुक्रवार पेठ, पुणे - ४११००२ येथे प्रकाशित केले. संपादक : रविकांत कळंबकर (पीआरबी ॲक्टनुसार संपादकीय जबाबदारी)

**"Hindu Bodh" Monthly publication is owned by Vishva Hindu Parishad, Maharashtra Pradesh, Printed and Published by Vivek Sonak, Printed at Sanwad TradePrints, B-7, Gowaikar Bldg. 595 Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Bharat Bhavan, 1360 Shukrawar Peth, Pune - 411002. Editor - Ravikant Kalambkar**

हिंदुबोध संबंधीचे सर्व कायदेशीर खटले अंक प्रकाशनाच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत केवळ पुण्याच्या न्यायालयातच चालतील.

**विजयी विश्व तिरंगा प्यारा,**
**झंडा ऊंचा रहे हमारा।**

**विजयी विश्व तिरंगा प्यारा,**
**झंडा ऊंचा रहे हमारा।**
**सदा शक्ति बरसाने वाला,**
**प्रेम सुधा सरसाने वाला,**
**वीरों को हरषाने वाला,**
**मातृभूमि का तन–मन सारा।। झंडा...।**
**स्वतंत्रता के भीषण रण में,**
**लखकर बढ़े जोश क्षण–क्षण में,**
**कांपे शत्रु देखकर मन में,**
**मिट जाए भय संकट सारा।। झंडा...।**
**इस झंडे के नीचे निर्भय,**
**लें स्वराज्य यह अविचल निश्चय,**

**बोलें भारत माता की जय,**
**स्वतंत्रता हो ध्येय हमारा।। झंडा...।**
**आओ! प्यारे वीरो, आओ।**
**देश–धर्म पर बलि–बलि जाओ,**
**एक साथ सब मिलकर गाओ,**
**प्यारा भारत देश हमारा।। झंडा...।**
**इसकी शान न जाने पाए,**
**चाहे जान भले ही जाए,**
**विश्व–विजय करके दिखलाएं,**
**तब होवे प्रण पूर्ण हमारा।। झंडा...।**
**विजयी विश्व तिरंगा प्यारा,**
**झंडा ऊंचा रहे हमारा।**

# आवाहन...

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे प्रांत स्तरावर निघणारे एकमेव मासिक म्हणजे **''हिंदुबोध.''** कोरोनाचे पहिल्या लाटेनंतर म्हणजे फेब्रु. २०२१ पासून नवीन स्वरूपात निघणे सुरू झाले आहे. हा अंक ४४ पानांचा असून याचे मासिक मूल्य रु. २०/– फक्त आहे. वार्षिक रु. २००/– तर त्रैवार्षिक रु. ५००/– वर्गणी आहे. पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.

देव, देश अन् धर्मासाठी कार्यरत असलेल्या या कार्यासाठी आपण **हिंदुबोध** मासिकाचे नियमित वाचक व्हावे, ही विनंती. वर्गणी खात्यात भरून नोंद (नांव, पत्ता, पिनकोड क्र., संपर्क क्र.) कार्यालयाकडे कळवावी. आपल्याला दरमहा **''हिंदुबोध.''** ' दि. १ ते ५ काळात पोस्टाने मिळेल.

तसेच आपण नवीन वर्गणीदार वाचक व अंकासाठी जाहिरात मिळवून देण्यात योगदान द्यावे. ही नम्र विनंती. योग्य ते मानधन देण्यात येईल. कळावे, धन्यवाद!

**श्री. रविकांत कळंबकर**
(संपादक)

**श्री. किशोर चव्हाण**
(प्रांत मंत्री)

**श्री. पांडुरंग राऊत**
(प्रांत अध्यक्ष)

# काळ रात्री कडून, विजयी माळेकडे!

## संपादकीय

पंधरा ऑगस्ट रोजी होणाऱ्या स्वातंत्र्यदिनाच्या सर्व वाचकांना प्रथमतः मनःपूर्वक शुभेच्छा. स्वातंत्र्योत्तर देशाची वाटचाल आता अमृत महोत्सवी वर्षापासून शताब्दीचे दिशेने चालू झाली आहे. तीन वर्षांपूर्वी अमृत महोत्सवाचे मोठे आयोजन देशभर विविध कार्यक्रमांचे माध्यमातून झाले होते. एखाद्या आनंदोत्सवाचे किंवा घटनेचे अश्या स्वरुपाचे कार्यक्रम संपन्न होणे स्वाभाविकच आहे, किंबहुना ते होणे अपेक्षितच असते. आता! शताब्दीचे उद्दिष्ट समोर ठेवून वाटचाल व प्रगती तश्या स्वरुपाची चालू आहे.

जसा हा विचार महत्त्वाचा आहे तसाच नुकताच दोन महिन्यांपूर्वी देशातील आणिबाणीच्या घटनेला पन्नास वर्षे पूर्ण झाली. म्हणून त्या आठवणींना उजाळा देण्याचे पण मोठ्या प्रमाणात कार्यक्रम झाले. अर्थातच ज्यांनी त्याचा त्रास अनुभवला तेच या गोष्टींना उजाळा देणार. २५ जून १९७५ ते २० मार्च १९७७ असा हा लोकशाहीची विटंबना करणारा कालखंड होता.

१९७१ साली देशात 'गरीबी हटाव'चा नारा देत इंदिराजी प्रचंड संख्येने संसदेत विराजमान झाल्या होत्या. परंतु, त्यांच्या विरोधी उमेदवार राजनारायण यांनी निवडणुकीत भ्रष्टाचार व गैरव्यवहाराचे आरोप करत कोर्टात धाव घेतली होती. कोर्टाने इंदिरा गांधीचे विरोधात निकाल दिला. इंदिराजींनी वरील कोर्टात जाणे किंवा राजीनामा देणे अपेक्षित होते. परंतु, इंदिरा इज इंडिया आणि इंडिया इज इंदिरा असा मंत्र त्यावेळी कॉंग्रेस नेत्यांकडून जपला जात होता. आणि म्हणूनच, इंदिराजींना देशात स्वतःचे प्रभुत्व तर सिद्ध करायचेच होते. पण! विरोधी विचारही पुसायचे असा जणू विडाच उचलला होता. त्याचाच परिणाम आणिबाणी घोषीत करण्यात आला.

आज जी मंडळी केवळ कॉंग्रेसचीच नाहीतर साहित्यिक, कलाकार, पुरोगामी पुरस्कृत विचारवंत, संविधान धोक्यात म्हणून छाती बडवत आहेत. त्यांना हे जुने दिवस आठवण करुन देण्यासाठी आणिबाणीची पन्नास वर्षे कार्यक्रम करुन इतिहास दाखवला गेला. इतिहास विस्मरणामुळेच देश इस्लामी राजवटीखाली अत्याचार सहन करत होता. देशाचे स्वातंत्र्य घेताना स्वीकारलेली फाळणी इतिहासाच्या चुका लक्षात न घेतल्यामुळेच झाली. आणि स्वातंत्र्योत्तर काळात घराणेशाही, व्यक्तीवादी राजकारण, सामुहिक निर्णयांचा अभाव, भारतीय मूल्यांचा विसर अशी वाटचाल सुरु झाली. परंतु आता लोकशाही मार्गानेच निवडून येऊन उत्तम कारकीर्द चालू असताना त्यांची पावती पुन्हा पुन्हा मिळाली असताना संविधान धोक्यात अशी ओरड सुरु झाली. म्हणून, त्यांना आणिबाणीचा आरसा दाखववा लागला. वास्तविक आणिबाणीत सगळ्यात जास्त त्रास संघालाच झाला. संघाच्या पुढाकारानेच आणिबाणीचा डाव उलटवून लावला गेला. लोकशाही व संविधान वाचवले गेले. त्या वेळीचे सरसंघचालक पू. बाळासाहेब देवरस म्हणालेच होते की, स्वातंत्र्यलढा हा ब्रिटिशांविरुद्ध होता. तर, हा स्वातंत्र्यलढा आपल्यातील अंतर्गत होता. त्यामुळे विसरा आणि क्षमा करा. आम्ही विसरलोच आहोत आणि म्हणूनच संसदीय लोकशाही मार्गानेच बहुमताने सर्वांची साथ घेत, विश्वास घेत देशाची स्वातंत्र्याची शताब्दी साजरी करण्याकडे विकासात्मक घोडदौड चालू आहे.

आणिबाणीला पन्नास वर्षे होणं आणि विकसित भारताच्या दिशेने होणारी अकरा वर्षांची वाटचाल हा एक योगच आहे. आज देशाचा वेगवेगळ्या दृष्टीने विचार करता बहुतेक सर्वत्र विकासाच्या, विजयाच्या पाऊल खुणा उमटत आहेत. आर्थिक उलाढाल, दळणवळणाच्या विकसित आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापराने आलेली गतिमानता, ५ जी वापरामुळे आर्थिक उलाढालीला मिळालेली चाल, संरक्षण सिद्धता, अन्नधान्याची मुबलकता, गरीबीच्या स्तराची घट, उंचावलेले रहाणीमान व महत्त्वाचे म्हणजे देशांतर्गत निर्माण झालेला आत्मविश्वास कि जो, हे दाखवत आहे की, हो! आम्हीपण हे करु शकतो. यामुळेच जगात भारताची प्रतिमा उंचावत आहे. देशाचे सांस्कृतिक मूल्य जगासमोर वेगवेगळ्या माध्यमातून प्रदर्शित होत आहे.

याच काळात रा.स्व.संघ शताब्दी उंबरठ्यावर आहे. व्यवस्था परिवर्तनातून देश जात असताना समाज परीवर्तनाचे महत्त्व संघ जाणतो आहे. देश पारतंत्र्यात कां गेला याचे उत्तर संघाला सापडल्याने पुनःश्च ते घडता कामा नये, याच साठी संघ अविरत कार्यरत आहे. देशांतर्गत संविधानाचे महत्त्व सांभाळत, व्यवस्थेतील नियमांचे पालन करत स्व बोधाचा विचार जागा ठेवून समरस जीवनपद्धती अनुभवणारा संघटीत समाज, पर्यावरणाचा समतोल साधत समर्थपणे उभा असलेला देश समाज परिवर्तनाचे माध्यमातून संघ पहातो आहे. त्यासाठी सक्रिय होत आहे. संघाच्या या पुढाकाराला समाजातूनही प्रभावी प्रतिसाद मिळत आहे. आणि म्हणूनच म्हणावेसे वाटते, जाग रहा है जन–गण–मन, निश्चित होगा परिवर्तन. हीच आपली विजयाची माळ असणार आहे.

**रविकांत कळंबकर, हिंदुबोध संपादक**




## मोफत आरोग्य शिबिर - हडपसर

गुरुवार दि. १० जुलै २०२५ रोजी, गुरुपौर्णिमेनिमित्त विहिंप व काळभोर क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमानाने हडपसर जिल्हा छत्रपती संभाजी महाराज प्रखंड येथे मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन केले होते. शिबिराचा शुभारंभ प. महा. प्रांत अध्यक्ष मा. पांडुरंग (अण्णा) राऊत तसेच पुणे पूर्व विभाग सहमंत्री श्री संतोषजी अनगोळकर, दुर्गावाहिनी पुणे पूर्व विभाग संयोजिका सौ. सुरेखाताई कवडे, हडपसर अध्यक्ष, श्री. नंदकिशोर (काका) काळभोर यांच्या हस्ते संपन्न झाला. सर्व प्रमुख उपस्थितांचे हडपसर जिल्हा मंत्री श्री. राजेंद्र शेवाळे यांनी स्वागत केले. श्री संतोष यांनी आपले मनोगत व्यक्त करत असताना सांगितले की, असे उपक्रम खूप गरजेचे आहेत. देव, देश व धर्माचे कार्य करण्याकरिता त्याचबरोबर सेवा कार्य करण्यासाठी विहिंप कायम तत्पर असते.

अध्यक्षीय मनोगत व्यक्त करत असताना आदरणीय अण्णांनी सांगितले की, हा उपक्रम खूप चांगला आहे. असे उपक्रम वेगवेगळ्या ठिकाणी व गरजूना देण्यात आले पाहिजे. काळभोर क्लिनिकचे डॉक्टर सुयोग काळभोर व डॉक्टर सौ. प्रतीक्षा काळभोर यांनी सहकार्य केले त्यांचे यावेळी आभार मानण्यात आले. यावेळी वृक्षारोपण करण्यात आले. याच परिसरातील धर्माचार्य म्हणून नावलौकिक असणारे व अहोरात्र हिंदू धर्माचे जागरण करणारे ह-भ-प सदाशिव (महाराज) कामठे गुरूंचे पूजन म्हणून महिला भगिनी यांच्याकडून औक्षण केले. भेटवस्तू देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. मोफत आरोग्य शिबिराचा एकूण ८५ लाभार्थ्यांनी लाभ घेतला. सदर कार्यक्रमाचा समारोप डॉ.सुयोग काळभोर व डॉ.सौ. प्रतीक्षा काळभोर यांचा शाल श्रीफळ व वृक्ष भेट देऊन सन्मान करण्यात आला व आभार मानण्यात आले.



## आषाढी प्लास्टिक मुक्त व पर्यावरण पूरक वारी

विहिंप कसबा जिल्हा धर्मयात्रा महासंघाने दि.२२ जून २०२५ रोजी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरू श्री तुकाराम महाराज पालखी मार्गावर प्लास्टिक मुक्त, पर्यावरण पूरक व स्वच्छता अभियान राबविले. श्री किशोरजी चव्हाण, प्रांत मंत्री व अशोकजी यलमार प्रांत धर्मयात्रा प्रमुख यांच्या मार्गदर्शनाखाली कसबा जिल्ह्यामार्फत वारीमध्ये सदर अभियान प्रथमच राबविण्यात आले. अभियानाचे उद्घाटन भवानी पेठेत सूर्यमुखी गणेश मंदिर समोर झाले. यावेळेस श्री. अशोकजी यलमार यांनी सध्या वारीतील इतर धर्मियांचे व्यवसायिक अतिक्रमण व प्लास्टिक मुक्त पर्यावरण वारी कशी करता येईल याविषयी संबोधन केले. श्री किशोरजी चव्हाण म्हणाले, वारीमधील प्लास्टिकचा वापर टाळणे, स्वच्छता राखणे, कचरा योग्य प्रकारे व्यवस्थापित करणे आणि पर्यावरणपूरक वारीचा आदर्श प्रस्थापित करणे या उद्देशाने प्रत्येक दिंडीत जागरूकता प्रयत्न करणार आहोत. यंदा वारी मार्गावर धर्मयात्रा महासंघआयामाचे कार्यकर्ते प्लास्टिक संकलन करण्यासाठी आवाहन करणार आहेत.

यावेळेस कालीमाता भक्त श्री. श्रीकांतजी महाराज यांनी विश्व हिंदू परिषद करीत असलेल्या कार्याचे मोल भविष्यात खूप महत्त्वाचे आहे येणाऱ्या पिढीला प्लास्टिक मुक्त वारी व्हावी याविषयी विश्व हिंदू परिषद जागरण करीत आहे असे नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कसबा जिल्हा मंत्री श्री विजय कांबळे यांनी केले.त्यानंतर रामोशी गेट, भवानी पेठ ,मोटार गेट , खाण्या मारुती चौक, पुलगेट या ठिकाणी विश्व हिंदू परिषदच्या कार्यकर्त्यांनी हातामध्ये बारदान घेत प्लास्टिक टाकणाऱ्यांना आवाहन केले व

प्लास्टिक गोळा केले. कार्यकर्त्यांनी हातात प्लास्टिकचे दुष्परिणाम विषयी फलक धरून पर्यावरण पूरक वारी विषयी व तसेच प्लास्टिकचे गोमातेवर होणारे परिणाम याविषयी जनजागृती केली. यावेळेस कसबा जिल्ह्यातील संत मार्गदर्शक लालजी महाराज, बैरागी मठ भवानी पेठ, जिल्हा उपाध्यक्षा सौ लीनाताई भावे, विजय कांबळे भाग मंत्री, विक्रम घुंगरूवाले बजरंग दल संयोजक कार्तिकीताई परदेशी दुर्गा वाहिनी संयोजिका, दीपक जगताप समरसता प्रमुख, श्री सुनील भडकवाडे धर्माचार्य प्रमुख, श्री शैलेशभाऊ जाधव सेवा प्रमुख, श्री तुषारजी खेमकर लष्कर प्रखंड मंत्री, श्रीनिवास कोळी महात्मा फुले प्रखंड मंत्री, सोमनाथ वरेकर प्रखंड मंत्री व जिल्ह्यातील विविध आयमांचे कार्यकर्ते व महिला उपस्थित होते.आयामाचे कार्यकर्ते उपस्थित होते.वारकऱ्यांनीसुद्धा अभियानास प्रतिसाद देऊन आनंद व्यक्त केला.

**विजय कांबळे, जिल्हा मंत्री, कसबा जिल्हा**

◈




# प्लास्टिक मुक्त आणि पर्यावरण पूरक वारी - विश्व हिंदू परिषदेचा उपक्रम

रविवार दिनांक २२ जून २०२५ रोजी.विश्व हिंदू परिषद, धर्मयात्रा महासंघ – हडपसर भाग यांच्या वतीने संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गांवर हडपसर ते सासवड प्लास्टिक मुक्त व पर्यावरण पूरक वारी उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

या उपक्रमाला योगी अखिलनाथ गुरु गोरक्षनाथ आखाडा यांचा आशीर्वाद लाभला. प्रमुख पाहुणे म्हणून, धार्मिक विभाग प्रमुख श्री. संजय मूरदाळे (महाराष्ट्र व गोवा) आणि श्री. नवनाथ बोंगारगे, धर्मप्रसार प्रांत सहप्रमुख. व आदर पूनावाला क्लीन सिटी चे श्री. निलेश रामेकर उपस्थित होते.

त्याचबरोबर मातृशक्ती विभाग संयोजिका सौ.आशाताई टेकवडे. दुर्गावाहिनी विभाग संयोजिका सौ.सुरेखाताई कवडे. हडपसर भागअध्यक्ष श्री. नंदकिशोर काळभोर उपाध्यक्ष श्री.मनोज काळे हडपसर भाग मंत्री श्री.राजेंद्र शेवाळे, भाग सहमंत्री श्री.भागवत कदम उपस्थित होते.

श्री. संजय मुरदाळे म्हणाले, वारी ही अध्यात्मिक यात्रेबरोबरच समाज परिवर्तनाचे माध्यम आहे. प्लास्टिक टाळून आपण पर्यावरणाचे रक्षण केले पाहिजे. युवकांनी पुढे येऊन सजग समाज घडवावा.

आदर पूनावाला क्लीन सिटीचे श्री.निलेश रामेकर यांनी सांगितले की प्रत्येक गाव आणि वस्ती प्लास्टिक मुक्त झाली पाहिजे. समाजाच्या सर्व स्तरांमध्ये असे उपक्रम राबवायला हवेत. या उपक्रमा करीता आदर पुनावाला क्लीन सिटीचे सहकार्य विश्व हिंदू परिषदेला राहील.

या उपक्रमात विश्व हिंदू परिषद,धर्मयात्रा महासंघाचे शंभरहून अधिक कार्यकर्ते सहभागी झाले होते. विशेष टी–शर्ट घालून युवक युवतीनी फलक लावून प्लास्टिक संकलन केंद्र आणि जनजागृती मोहीम राबवली.

या उपक्रमामध्ये १२० बॅग प्लास्टिक जमा झाले. त्याचे अंदाजे वजन २४०० किलो इतके होते. जमा झालेले सर्व प्लास्टिक आदर पुनावाला क्लीन सिटी त्यांच्याकडे सुपूर्त करण्यात आले. समाजातील सर्व स्तरातून या उपक्रमाचे कौतुक झाले.

या उपक्रमाकरिता विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, मातृशक्ती, दुर्गावाहिनी, धर्मयात्रा महासंघ या सर्वांचे अनमोल सहकार्य लाभले. त्याकरिता हडपसर भाग व या भागातील सातही प्रखंडामधून कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाग मंत्री श्री. राजेंद्र शेवाळे यांनी केले. समारोप व आभार भाग अध्यक्ष श्री.नंदकिशोर काळभोर यांनी केले.

**श्री राजेंद्र शेवाळे, भाग मंत्री हडपसर.**






## वैवाहिक समुपदेशन केंद्र

पिंपरी चिंचवड येथे मोरया गोसावी मंदिरासमोर विश्व हिंदू परिषद कार्यालय येथे मोफत वैवाहिक आणि इतर समस्या समुपदेशन केंद्र सुरू करण्यात आले. दि. ८/३/२०२५ रोजी सायं. ५ ते ७ उद्घाटन सोहळा पार पडला. मा. अध्यक्ष श्री. शरदजी इनामदार त्याचप्रमाणे श्री फाटक काका (ज्येष्ठ पश्चिम प्रांत कार्यकारिणी सदस्य) मातृशक्ती उपाध्यक्षा सौ. भक्ती ताई साळवी तसेच ग्रंथालय उपाध्यक्षा सौ. पूजा ताई कुलकर्णी यांच्या उपस्थितीमध्ये हा सोहळा पार पडला. समुपदेशन केंद्रातर्फे डॉक्टर सचिन पाठक (प्रतिथयश स्त्री रोगतज्ञ पुणे) आणि एडवोकेट सौ. स्मिताताई जोशी (पुणे कोर्ट, मुंबई हायकोर्ट) यादेखील याप्रसंगी उपस्थित राहिल्या आणि मार्गदर्शन केले.

श्री. रत्नाकर चांदजकर हे प्रमुख समुपदेशक म्हणून कार्यभाग सांभाळतील. डॉ. शर्वरी यरगट्टीकर यांनी विश्व हिंदू परिषद मातृशक्तीचे कार्य आणि समुपदेशन केंद्र यांचा समन्वय साधताना त्याचा कशा पद्धतीने सामाजिक उपयोग होईल याबाबत प्रस्तावना केली. एडवोकेट सौ. स्मिता जोशी यांनी लव जिहाद, ज्येष्ठ नागरिक, कौटुंबिक समस्या असलेले नागरिक इत्यादी समस्यांना या सल्लागार केंद्रातून, समुपदेशनातून कसा उपयोग होईल याबाबत उत्कृष्ट मार्गदर्शन केले. मातृशक्ती सौ. प्रेरिता हरदास या कार्यक्रमात सहभागी झाल्या.

## विश्व हिंदू परिषद भीमाशंकर जिल्ह्याच्या मागणीला यश....

श्री क्षेत्र भीमाशंकर श्रावणी यात्रेच्या गेल्या वर्षीच्या २०२४ च्या नियोजनात भाग घेताना, गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी व भविक भक्तांचे दर्शन सुलभ होण्यासाठी ऑनलाईन बुकिंगची व्यवस्था करण्यात यावी अशी मागणी विश्व हिंदू परिषदेच्या वतीने करण्यात आली होती. त्या मागणीला यश येत आहे.




## एकादशी निमित्त खिचडी वाटप कार्यक्रम - धनकवडी

दरवर्षीप्रमाणे यंदाही आम्ही विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, कात्रज जिल्हा, धनकवडी प्रखंड आयोजित, देवशयनी आषाढी एकादशी निमित्त सर्व भाविकांना धनकवडी गावठाणातील विठ्ठल – रुक्मिणी मंदिरात खिचडी वाटप कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या उपक्रमात मोठ्या संख्येने ग्रामस्थ व भक्तगण सहभागी झाले होते.

धनकवडी परिसरात सकाळपासूनच भक्तांची गर्दी उसळली होती. हरिनामाच्या गजरात वातावरण भक्तिमय झाले होते. उपस्थितांना खिचडीचे वाटप करून आषाढी एकादशीच्या शुभेच्छा देण्यात आल्या. प्रखंडातील सर्व विठ्ठल–रुक्मिणी भक्त मंदिरात विठूमाऊली समोर श्रद्धापूर्वक नतमस्तक होऊन प्रत्येकजण आपल्या कुटुंबाच्या सुख–समाधानासाठी व हिंदूराष्ट्र निर्मितीसाठी साकडे घालत होते. या नियोजित कार्यक्रमासाठी खिचडी प्रसाद वाटपाच्या निमित्ताने जिल्हा व प्रखंड स्तरावरील विश्व हिंदू परिषद व बजरंग दलचे सर्व कार्यकारिणी सदस्य, महिला–भगिनी (मातृ शक्ती–दुर्गा वाहिनी), व परिसरातील हिंदू धर्मीय विशेष अतिथी, प्रथम नागरिक, राजकिय व सामाजिक क्षेत्रात काम करणारे इतर संघटनेतील, पदाधिकारी, मान्यवर, कार्यकर्ते व ज्येष्ठ नागरिकांचे सहकार्य लाभले. तसेच, त्यांची सनातन कार्यात योगदान देण्यास असलेली तळमळ दिसून आली व आपण केलेल्या कामाचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे अशी कौतुकाची थाप हिंदू समाजातून ऐकावयास मिळत होती. हे ऐकून आम्ही सर्वच संघटनेचे सदस्य धन्य झालो व याचा आम्हास आम्ही करत असलेल्या धर्म कार्यातील योगदानाचा सार्थ गर्व व अभिमान नक्कीच आहे व यापुढेही राहील.

असेच चालू वर्षातील विविध हिंदू धर्मीय सण–समारंभ सक्रियपणे राबविण्यासाठी आम्ही धनकवडी प्रखंड कार्यकारिणी सदस्य सदैव तत्पर आहोत.

**श्री. सागर गोरखनाथ भंडारे, धनकवडी प्रखंड मंत्री**



## धर्मगंगा ग्रंथालयातर्फे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

विश्व हिंदू परिषद संचालित धर्मगंगा ग्रंथालयातर्फे इयत्ता १० वी व १२ वी च्या परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा कौतुक समारंभ दिनांक २८ जून २५ रोजी ग्रंथालयात आयोजित करण्यात आला होता.

ग्रंथालयाचे सभासदांचे पाल्य असलेल्या इयत्ता दहावी व बारावी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या १५ विद्यार्थ्यांचा भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास साईनाथ बालक मंदिराच्या मुख्याध्यापिका सौ. वैभवी तेंडुलकर प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. ग्रंथालयाचे कोषाध्यक्ष श्री. श्रीरंग दाते यांनी प्रास्ताविक करताना ग्रंथालयाच्या स्थापनेचा इतिहास व ग्रंथालयाची माहिती सांगितली.

सौ. वैभवी तेंडुलकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आयुष्यात यशस्वी होण्यासाठी मनाने खंबीर असणे आवश्यक असल्याचे सांगितले. अपयशाचा सकारात्मकतेने स्वीकार करण्यास सांगितले. तसेच आपला हिंदू धर्म व संस्कृती यांचे जतन व संवर्धन करण्याची या पिढीची जबाबदारी असल्याचे सांगितले.

विद्यार्थिनी कुमारी सई दाणी व तिच्या पालक सौ. माधुरी दाणी यांनी प्रातिनिधिक स्वरूपात आपले मनोगत व्यक्त केले आणि मुलांना प्रोत्साहन देणाऱ्या ग्रंथालयाच्या उपक्रमाचे कौतुक केले.

ग्रंथालयाचे अध्यक्ष श्री. शरद इनामदार यांनी मुलांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. ग्रंथालयाच्या सहसचिव सौ. अनुजाताई कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे सूत्र संचालन केले. उपाध्यक्षा सौ. पूजा कुलकर्णी यांनी सर्वांचे आभार मानले. कार्यक्रमास सहकोषाध्यक्ष श्री. लक्ष्मीकांत देशपांडे, संचालक श्री. विजयराव देशपांडे, सौ. आरती कऱ्हाडकर उपस्थित होते. सामूहिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. ग्रंथालयाच्या सेवक वर्गाने कार्यक्रमाचे नियोजन केले.



## मोफत आरोग्य शिबिर - नांदेड

विश्व हिंदू परिषद सिंहगड भाग नांदेड प्रखंडाच्या वतीने रविवार दि.२९.०६.२०२५ रोजी सकाळी १० ते २ या वेळेत आरोग्य शिबिर घेण्यात आले या शिबिरात नेत्र, कान, नाक, घसा दंत यांचे निदान, पंचकर्म, त्याचबरोबर तज्ञ डॉक्टरांमार्फत मोफत मार्गदर्शन करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन विश्व हिंदू परिषद मातृशक्ती प्रांत संयोजिका प्रियाताई रसाळ, सिंहगड भागाचे अध्यक्ष शरद भाऊ जगताप, सामाजिक कार्यकर्ते दत्ताभाऊ कोल्हे, सुप्रसिद्ध ज्येष्ठ अभिनेते योगेश जी कुलकर्णी आणि सुप्रसिद्ध बॉडीबिल्डर महाराष्ट्र श्री संकेतजी काळे यांच्या हस्ते झाले.

सदर शिबिराला पुणे पश्चिम विभाग मातृशक्ती संयोजिका सौ योगिनीताई थोरात उपस्थित होत्या तसेच सिंहगडभाग संयोजिका शोभाताई श्रीगोंदेकर, बजरंग दल संयोजक राजू कुडले, बजरंग दल सहसंयोजक अमोल सावंत, अजय निकम व नांदेड प्रखंड मंत्री विशाल कडू, सहमंत्री आदित्य काळे, नरेश डोंगरे, संयोजक योगेश सुपारे, सहसंयोजक निसर्ग वाल्हेकर, मातृशक्ती संयोजिका सौ सुनंदाताई चापके, सत्संग प्रमुख आशाताई खिलारे, प्रितम देशमुख, वल्लभ शिळीमकर उपस्थित होते. एकूण ९० जणांनी शिबिराचा लाभ घेतला.





# गोमाता राज्यमातेला न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोग तत्पर अध्यक्ष श्रीशेखरजी मुंदडा

आज दिनांक १४ जुलै २०२५ महाराष्ट्रातील विश्व हिंदू परिषद गोरक्षा विभागाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक पुणे. कार्यालयात येथे संपन्न झाली यावेळी मंचावर उपस्थित विश्व हिंदू परिषद क्षेत्र मंत्री श्री गोविंदजी शेंडे, गोसेवा आयोगाचे अध्यक्ष श्री शेखरजी मुंदडा, क्षेत्रिय गोरक्षा प्रमुख श्री. भाऊराव कुदळे, क्षेत्र कृषी प्रशिक्षण प्रमुख शिवप्रसाद कोरे, सह महाराष्ट्रातील सर्व प्रांताचे गोरक्षा प्रमुख सह गोरक्षा प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. श्री शेखरजी मुंदडा यांनी गो १० या विषयाबाबत सविस्तर मार्गदर्शन करून, गोसेवा आयोग गोमातेला न्याय मिळवून देण्यासाठीच आहे. गोसंगोपन गोमय मूल्यवर्धन, गोरक्षा, गोसाक्षरता, गोपर्यटन, या विषयांवर भर दिला. आगामी काळात गोमातेच्या हक्कासाठी सदैव तत्पर असल्याचे सांगून श्री शेखरजी मुंदडा यांनी उपस्थित कार्यकर्त्यांशी संवाद साधला, यावेळी क्षेत्र मंत्री श्री गोविंदजी शेंडे यांनी गोरक्षा विभागाने विषमुक्त गोवंश आधारित शेतीसाठी पुढाकार घ्यावा. असे प्रतिपादन केले, तसेच राज्यात गोवंश हत्या बंदी कायद्याची कठोर अंमलबजावनी करावी असे आग्रही मत मांडले, क्षेत्र गोरक्षा प्रमुख श्री भाऊराव कुदळे यांनी संघटनेचा कार्य विस्तार. पैठण ते पंढरपूर गो पाई दिंडीची या वर्षापासून सुरुवात झाली, १० ठिकाणी कार्यक्रम झाले, या कार्यक्रमात २००० शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला, उत्कृष्ट नंदी व गोसेवा करणाऱ्या १६ गोपालकांचा सत्कार करण्यात आला, असे दिंडी बद्दल मत व्यक्त केले. विश्व हिंदू परिषदेचा कार्य विस्तार .सेवा कर्जमुक्त शेतकरी, नशा मुक्त भारत, गो आधारित उद्योग, गो आधारित आरोग्य, गोवंश प्रजाती सुधार, गोपालक शेतकऱ्यांची यादी, गोरक्षक कार्यकर्त्याकडे विशेष लक्ष देण्याबाबत मार्गदर्शन केले. कृषी विभाग प्रशिक्षण प्रमुख शिवप्रसाद कोरे यांनी गोकृपा अमृत, व गोमातेच्या गोमूत्र पासून औषधी, व शेना पासून खत निर्मिती, आदीबाबत सविस्तर माहिती सांगितली, यावेळी महाराष्ट्रातील. विदर्भ प्रांत गोरक्षा प्रमुख श्री अतुलजी अयाचित, देवगिरी प्रांत गोरक्षा प्रमुख श्री राजेशजी जैन, सह गोरक्षा प्रमुख श्री बद्रीनारायणजी सारडा, कोकण गोरक्षा प्रमुख श्री गणेशजी परब, सह गोरक्षा प्रमुख श्री रमेशजी पुरोहित, पश्चिम महाराष्ट्रातील , श्री सतीश गोरडे प्रांत सहमंत्री ,श्री विलासजी पाठक, श्री संतोष खामकर, श्री भानुदास बर्गे, क्षेत्र गोभक्त महिला प्रमुख सौ सुनीता देशमुख, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सर्व गोरक्षा विभागाचे कार्यकर्ते व गोसेवा आयोग यांच्यामध्ये गौरक्षणा बाबत सविस्तर चर्चा झाली.

धर्मो रक्षति रक्षितः जसा मनुष्याच्या देहात प्राण आहे अगदी तसाच देशाच्या देहात धर्म असतो... प्राण गेला मृत्यु होणार तसाच धर्म संपला देश मातीत जाणार.. शेकडो देश इस्लामच्या नावाखाली हिंदुस्थानपासुन तुटले गेले तिथे हिंदु धर्म नावाला शिल्लक नाही.. जोपर्यंत हिंदुस्थानात हिंदु धर्म आहे तोपर्यंत हिंदुस्थान आहे आणी जौपर्यंत हिंदुस्थान आहे तोपर्यंतच हिंदु धर्म आहे..त्यामुळे हिंदुंनो देव देश धर्मासाठी जगायला शिका.. त्याच्यासाठी जो लिहु शकतो त्याने लिहा,जो बोलु शकतो त्याने बोला आणी यातलं काही जमलं नाही तर त्यांना साथ द्या..जिथे तिथे हिंदुत्व पेरायला शिका. हिंदु समाज जोडायला शिका. लक्षात ठेवा शांततेच्या वेळी जास्त घाम गाळला तर अशांततेच्या वेळी जास्त रक्त सांडायची गरज पडणार नाही..

जयतु हिंदु राष्ट्रम्




# जिल्हा मंत्री सह मंत्री अभ्यास

प. महाराष्ट्र प्रांत मंत्री समूह अभ्यास वर्ग दि २८-२९ जून रोजी पुणे सेवा भवन येथे संपन्न झाला. प्रांतातून ३६ संख्या पूर्ण वेळ उपस्थित होती. यावेळी केन्दीय मंत्री तथा सेवा कार्य प्रमुख मा. अजयजी पारख, क्षेत्र मंत्री मा गोविंद जी शेंडे, संघटनमंत्री अनिरुद्ध पंडीत, प्रांत सह मंत्री अॅड सतिश गोरडे, नितीन वाटकर, धनाजी शिंदे आदि ना मार्गदर्शन केले यात खालील विषयावर मार्गदर्शन झाले.

**सत्र विषय (विचारार्थ)**

१) जिल्हा मंत्री सहमंत्री जिल्ह्याचे नेतृत्व, जिल्हा संचाची भूमिका, वृत्तसंकलनाची पद्धती, सर्वव्यापी सर्वस्पर्शी कार्य, कार्यकर्ता/कार्यक्रम/कार्य मूल्यांकन, आयामांचे कार्य, धर्मप्रसार, कार्यपद्धती बैठक वर्ग प्रवास,पुंज रचना, सहयोगी कार्यकर्ता विकास, समाज संघटन/सज्जन शक्ती संग्रह, नेतृत्व गुण विकास स्वयंविकास, जिल्हा मंत्री सहमंत्री जिल्ह्याचे नेतृत्व, जिल्हा संचाची भूमिका, वृत्तसंकलनाची पद्धती, सर्वव्यापी सर्वस्पर्शी कार्य, कार्यकर्ता/कार्यक्रम/कार्य मूल्यांकन, आयामांचे कार्य, धर्मप्रसार,कार्यपद्धती बैठक वर्ग प्रवास, पुंज रचना, सहयोगी कार्यकर्ता विकास, समाज संघटन/सज्जन शक्ती संग्रह, नेतृत्व गुण विकास स्वयंविकास या विषयावर अनिरुद्ध पंडीत यांनी मार्गदर्शन केले.

२) अॅड. सतिश गोरडे यांनी सर्वव्यापी सर्वस्पर्शी कार्य यह भौगोलिक संकल्पना है! सभी प्रखंड सभी, खंड ग्राम, दुर्गम क्षेत्र, सेवा वस्ती, high rise buildings कार्य खडा हो!

हिंदू समाज के सभी वर्गीकरण भाषा, प्रांत, सभी जातीया सभी पंथ, संप्रदाय, सभी आर्थिक श्रेणी, आयु के अनुसार, पुरुष, महिला,सभी आयु के समूह मे संपर्क केवल संपर्क नही प्रत्यक्ष अपने कार्य मे सहभाग अन्य अन्य समितीयों में दायित्व देकर कार्य करना! वर्ष के अलग अलग कार्यक्रमो की रचना करने के पूर्व सर्व स्पर्शी सर्वव्यापी कार्य दृष्टी से योजना बनाना और कार्यक्रम के बाद अनुवर्ती प्रयास इसकी और ध्यान देंगे तो सर्वव्यापी सर्वस्पर्शी कार्य खडा होने मे सहायता होगी!

३) कार्यपद्धती:- बैठक/प्रशिक्षण/प्रवास/वृत्तसंकलन - हेतू सामूहिक चिंतन- निर्णय की प्रक्रिया, कार्य की योजना, वैचारिक स्पष्टता, सक्रियता गुणवत्ता वर्धन, अपेक्षित कार्यकर्ता निश्चिती, समय,विषय, कोन कोनसा विषय लेगा इसकी निश्चिती,व्यवस्था, जिल्हा संच बैठक, मासिक जिल्हा समिती बैठक, प्रखंड बैठक, आयमोंकी बैठक में अपने पुंज के जिल्हा से अपेक्षित कार्यकर्ता उपस्थित रहे इस की चिंता

**प्रशिक्षण :**

हेतू कार्य के विस्तार एवम धुडीकरण हेतु कार्यकर्ताओ के गुण, कौशल्य,समझ विकसित करना प्रांत की योजना से परिषद शिक्षा वर्ग बजरंग दल शौर्य प्रशिक्षण वर्ग दुर्गा वाहिनी शौर्य प्रशिक्षण वर्ग मातृशक्ति प्रशिक्षण वर्ग वर्षभर प्रांत या केंद्र की योजना से आया मुकेश अलग-अलग अलग-अलग आयाम के प्रशिक्षण वर्ग में अपने जिला के कार्यकर्ताओं की उपस्थिति वर्ष में एक बार तीन दिन दो रात्रि निवासी अभ्यास वर्ग प्रखंड जिला स्तर के कार्यकर्ता

**प्रवास / संपर्क :**

हेतु कार्य कार्यकर्ताओं का अवलोकन करना, कार्य की गुणवत्ता बढ़े बैठक सत्संग प्रवास योजना बने नये कार्य शुरू हो , बैठक, सत्संग, सेवा कार्य, कार्यकर्ताओं के परिवार में सुखः / दु:ख के अवसर पर उपस्थित रहना!, प्रवास की पूर्व योजना पर्याप्त पहले करना, प्रवास में अपेक्षित कार्य की चर्चा स्थानक कार्यकर्ताओं से करना, निर्धारित सभी कार्यक्रम समय पर पूर्ण करने का आग्रह अपने कार्य क्षेत्र के सभी प्रखंडों में और जिस प्रखंड का में पालक हूं , जिस पुंज का पालक हु उस आयाम के सभी प्रमुख कार्यकर्ताओं से संपर्क, पूर्व ग्रह दूषित व्यवहार न हो, (like/dislike) सभी से संपर्क करना!, प्रवास करते समय निरीक्षक नहीं बल्कि सहयोगी कार्यकर्ता इस भाव से प्रवास करना, संपर्क करते समय सामने मिलने वाले कार्यकर्ताओं की सुनने का स्वभाव बनाना ! परिवार के सभी सदस्यों से बात करने का प्रयास, बैठक सत्संग सेवा प्रकल्प धर्मप्रसार की योजना से शुरू कार्य इस में अवश्य मिलना।

**आयुष्यात प्रत्येकाच्या निंदेला उत्तर द्यायचं नाही, कारण निंदा ही बुद्धीच्या कमकुवत पणामुळे होते आणि त्याला उत्तर न देणं हे आपल्या मनाच्या मोठेपणा असतो...!!!**

# संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळा २०२५

संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखीचे प्राथन श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथून मंगळवार दि. १० जून २०२५ वटपौर्णिमेच्या दिवशी झाले. त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर ह्या २८ दिवसांच्या वारी मध्ये प्रतिवर्षी विश्व हिंदू परिषद नाशिक जिल्ह्याच्या वतीने संपुर्ण वारीमार्गावर वारकरी बंधू – भगिनींना मोफत वैद्यकीय सेवा पुरविण्यात येते. यंदाचे हे १४वे वर्ष होते.




या २८ दिवसांच्या सेवेसाठी औषधांची आवश्यकता मोठ्या प्रमाणात असते, ही बाब लक्ष्यात घेत कुर्तकोटी शंकराचार्य न्यास नाशिक, सहेली सेवा मंडळ नाशिक, प.प.लोकनाथ तीर्थ स्वामी महाराज महायोगी ट्रस्ट नाशिक, वनवासी व दुर्बल घटक विविध सेवा प्रकल्प न्यास नाशिक ह्या सहयोगी संस्था तसेच श्री. प्रमोद कुलकर्णी, श्री. सुशील खिवंसरा, श्री. बाळासाहेब पालवे यांनी औषध खरेदी करण्याकरीता देणगी दिली. श्वास फाउंडेशन, नाशिक ने पूर्ण २८ दिवसांकरीता रुग्णवाहिका उपलब्ध करून दिली होती, तसेच भगूर येथून मा.श्री. एकनाथ शेटे ह्याच्या प्रयत्नातून अजून एक रुग्णवाहिका पूर्ण २८ दिवस प्राप्त झाली होती.

ह्या आरोग्य वारी पथकात डॉ. ज्ञानेश्वर कमोद, डॉ. निलय तोरस्कर, डॉ. किरण बकरे हे ३ मुख्य डॉक्टर्स म्हणून तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर वैद्यकीय प्रतिष्ठान संचालित सेवांकुर समितीचे ६० इंटर्न डॉक्टर्स सहभागी झाले होते. परिचारिका म्हणून सौ. आशालता कुमावत, सौ. भारती बनबेरू, सौ. सुरेखा घुले सहभागी झाले होते. रुग्णवाहिका चालक उत्तम वायचाळे, रवी मुकणे तर स्वयंसेवक म्हणून अरविंद ब्राह्मणकर, शिवाजी बोरुडे, मनोहर रहाणे, सुनील जोशी ह्या पथकात कार्यरत होते.

यंदाच्या वैद्यकीय सेवेचा शुभारंभ शुक्रवार दि. १३ जून २०२५ रोजी नाशिकरोड मुक्तिधाम येथे मोठ्या उत्साहात करण्यात आला. सहयोगी संस्था बालाजी सोशल फाउंडेशन, नाशिकरोड चे अध्यक्ष श्री. कैलास मुदलियार यांनी ४० फुट मंडप व काही प्रमाणात औषध ह्या शुभारंभाप्रसंगी उपलब्ध करून दिले होते. ह्या शुभारंभा प्रसंगी जयराम हॉस्पिटल, नाशिकरोड, नाशिकरोड सुपर स्पेश्यालिटी हॉस्पिटल चे डॉक्टर्स, प्रत कार्यकारीणी सदस्य श्री. हेरंब गोविलकर, प्रांत सेवा विभाग प्रमुख श्री. श्याम घरोटे, नाशिक विभाग मंत्री श्री. अनिल चांदवडकर, शहर जिल्हा अध्यक्ष श्री. विराज लोमटे, शहर जिल्हा मंत्री श्री. योगेश बहाळकर, ग्रामीण जिल्हा मंत्री श्री. देविदास वारुंगसे, जिल्हा सेवा विभाग प्रमुख डॉ. निरंजन नंदन, सह.प्रमुख श्री. महेश खालकर, श्री. सतीष पाटील तसेच सर्व सहयोगी संस्था सहभागी झाले होते.

श्रीरामपूर येथे डॉ. वैभव भालेराव, श्री. सचिन बाकलीवाल व सर्व स्वयंसेवकांनी लागणारी औषधांची पूर्तता करून दिली.

वारीचे सोमवार दि. २३ जून २०२५ रोजी अहिल्यानगर येथे आगमन झाले. अहिल्यानगर येथील मार्केट यार्डयेथे छोटेखानी कार्यक्रम आयोजित केला होता. विभाग मंत्री श्री. सुनील खिस्ती, जिल्हा मंत्री श्री. अनिल जोशी व सर्व पदाधिकारी यांनी उत्तम प्रकारे सर्व व्यवस्था केली होती, तसेच लागणाऱ्या औषधांची पूर्तता केली.

करमाळा येथे श्री. संजय मूरदाळे, श्री. अनिरुद्ध पंडित, श्री. धनाजीराव शिंदे, श्री. नागनाथ बोन्गर्गे, श्री. संजय कुलकर्णी, डॉ. जयसिंग पाटील यांनी आरोग्य सेवा केंद्र येथे सदिच्छा भेट देत स्वयंसेवकांचा उत्साह वाढवला.

ह्या २८ दिवसांच्या आरोग्य सेवा वारीत ७५०००/– वारकऱ्यांना सेवा देण्यात आली. दिवसाला १०० इंजेक्शन व २५ – ३० सलाईन देण्यात आले.

शनिवार ०५ जुलै२०२५ रोजी पथकाचे नाशिक येथे आगमन झाले.

# वारीत अर्बन नक्षलवाद शिरलाय सावधान, या घुसखोरांना प्रतिबंध करा।

विहिंपच्या धर्माचार्य व्यापक बैठकीत समस्त महाराज मंडळींची आग्रही भूमिका, सोलापूर, दि. ९ जुलै. सावधान, वारीत अर्बन नक्षलवाद शिरलाय, हिंदू संस्कृती आणि विचार तोडण्याचा डाव हा आहे. त्यांचा वेळीच बंदोबस्त झाला नाही तर, येत्या काळात वारी, दिंडी आणि आषाढी सोहळ्यामध्ये यांचे घातक प्रदूषण पाहायला मिळेल, अशी भीती व्यक्त करीत समस्त संत, महंत, धर्माचार्य यांनी फड, दिंडीचालकांनी खबरदारी घेतली पाहिजे. सरकारच्या निदर्शनास ही बाब लक्षात आणून द्यावी तसेच अशा घुसखोरांना वारीत प्रतिबंध करावा, अशी एकमुखी मागणी विश्व हिंदू परिषद धर्माचार्य व्यापक बैठकीत करण्यात आली. मंगळवारी ८ रोजी पंढरपुरातील कुकुरमुंडे महाराज मठात विठ्ठल महाराज वडगावकर अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली. विहिंपचे केंद्रीय सहमंत्री हरिशंकरजी यांनी मार्गदर्शन केले.




विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय सहमंत्री हरिशंकर बैठकीस मार्गदर्शन करताना म्हणाले, सुरवात आपल्यापासून करुयात. चिंतन झाले पाहिजे, त्यातून समाधान अपेक्षित आहे. नवीन पिढीला काय पाहिजे हे लक्षात घ्या. त्यावर संस्कार झाले पाहिजेत. आस्था, परंपरा जपण्याचा भाव असायला हवा. पंढरपूरचाही विकास झाला पाहिजे, अशीही भूमिका त्यांनी मांडली.

बैठकीचे अध्यक्ष विठ्ठल वडगावकर यांनी वारी परंपरेतील घातक विचार ठेचून काढा. पालखी सोहळ्यातील परंपरा जपण्याचे आवाहन करीत पंढरपुरातील जुन्या मठांना सरकारकडून अनुदान निधी द्या, असेही सुचवले. यात्रा हिंदूंची, लाभार्थी मुस्लिम असे पंढरपुरातील वारीचे चित्र आहे, त्यामुळे ज्याच्या कपाळी गंध, तो आपला बंधू असे समजून खरेदी, विक्री झाली पाहिजे वारीत ढोल ताशे, हलग्या आले आहेत. वाद्यांचे प्रदूषण वारीत नको, पखवाज हे आपले वाद्य आहे, असे आशुतोष बडवे महाराज म्हणाले.

महादेव शास्त्री बोराडे महाराज म्हणाले, प्रयागराजचा कुंभमेळा पॅटर्न वारीत हवा आहे, कारण गर्दीच्या ठिकाणी रस्ते लहान आहे. मोठी दुर्घटना घडू शकते. शिवाय अनेक मंत्री वारीत येत असल्यामुळे त्यांचाही वारकर्यांना त्रास होतो. अनिकेत महाराज मोरे (देहू) म्हणाले, वारीत संविधान दिंडी बुध्दीभेदाचा प्रकार आहे, सेक्युलर विचार मांडण्याचा खटाटोप घुसखोरांनी केला आहे. विमर्श, अर्बन नक्षलवादचा धोका वेळीच ओळखा. भागवत चवरे महाराज म्हणाले, वारीत घुसलेल्यांचा वेळीच बंदोबस्त करा. निवृत्ती नामदास महाराजांनी, वारकरी संप्रदायाने परंपरा जपावी. वारीत गिटार वाजवले जाते. हा निंद्य प्रकार आहे. आणखी पुढे कोणकोणती वाद्ये घुसखोर मंडळी आणतील याचा नेम नाही, असे नमूद केले. पुष्कर गोसावी महाराज पैठणकर यांनी वारी करण्यापेक्षा वारी जगा, आचारसंहिता ठरवा. वारीचा दंडक असावा असे सांगितले. प्रकाश जवंजाळ महाराज आक्रमकपणे म्हणाले, हिंदु संस्कृती तोडण्याचा अर्बन नक्षलवाद्यांचा डाव आहे. सप्ताह, वारी, हरिपाठमध्येही त्यांची घुसखोरी झाली आहे. अर्बन नक्षलवाद शिरला आहे. संत ज्ञानोबा आणि संत तुकोबा यांचा विचार संविधानाचा आहे. वारकरी समतेचा विचार मांडतो. कीर्तन, शाहिरी, कवितेतून वारकरी भक्तांचा बुध्दीभेद केला जात आहे.

रामकृष्ण वीर महाराज यांनी मंदिराचे सरकारीकरण नको अशी मागणी केली, विहिंपची देखील हीच मागणी आहे, मुख्यमंत्र्यांचे भाष्य अस्वस्थ करणारे आहे. या रे या सारे या, म्हणजे काय? अजेंडा राबवायला वारीत येऊ नका. फड, परंपरा मजबूत करा, असेही वीर महाराज म्हणाले. रामेश्वर शास्त्री यांनी या प्रकाराबाबत चिंता व्यक्त केली. यासाठी वारकर्यांची चिंतन बैठक घ्या. याकडे त्यांनी लक्ष वेधले. डॉ. महेश महाराज देहूकर यांनी वारीत प्रदूषण नको त्या महाराज लोकांचे झाले आहे, असे सांगितले. सनातन हिंदू राष्ट्रचे सुनील घनवट म्हणाले, पंढरपूरसह राज्यातील अन्य तीर्थक्षेत्र कायम मांस, मदिरामुक्त करा. परशुराम डोंबे महाराज (बार्शी) म्हणाले, फडकरी सुधारला की, वारकरी सुधारतो. महादेव यादव महाराज, अभय कुलकर्णी इचगावकर, संदीपान महाराज हासेगावकर, अक्षय महाराज भोसले, उध्दव महाराज कुकुरमुंडे यांच्यासह अन्य वारकरी महाराज मंडळी यांनीही मनोगत व्यक्त केले.

धर्माचार्य बैठकीचे सूत्रसंचालन विहिंप प्रांत धर्माचार्य संपर्क प्रमुख माधवदास राठी यांनी केले. याप्रसंगी धार्मिक विभाग महाराष्ट्र राज्य प्रमुख संजय मुद्राळे, संघटनमंत्री अनिरूध्द पंडित, सहसंपर्क प्रमुख नागनाथ बोंगरगे, विभाग सहमंत्री विजयकुमार पिसे, समीर पायगुडे, तुकाराम मांडवकर, धनंजय वासाडे (विदर्भ), परशुराम दुबे (कोकण), नंदकुमार कोनाळे (देवगिरी) विहिंप जिल्हाध्यक्ष अभिमन्यू डोंगरे महाराज, जिल्हा मंत्री संजय जमादार, शिवाजीराव जाधव, सहमंत्री गोपाळ सुरवसे, बापूसाहेब कदम, अविनाश माने, बजरंग दल संयोजक श्रीनाथ संगीतराव, भाग्यश्री लिहिणे, रेखा टाक, संतोष पापरीकर, प्रवीण कुलकर्णी, कौस्तुभ देशपांडे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## ।। श्रीनाथ म्हस्कोबा प्रसन्न ।।

# श्रीनाथ म्हस्कोबा साखर कारखाना लि; श्रीनाथनगर,

पाटेठाण, पो. राहू, ता. दौंड, जि. पुणे - ४१२२०७

कारखाना साईट : EXABX No. ९९२३००२९२४ / ८५५१८५८८९९

ईमेल : smskl@rediffmail.com, smskl@shreenathsugar.com

## कारखान्याची ठळक वैशिष्टे

- ✻ १० MW क्षमतेचा पॉवर प्लँट
- ✻ ४५०० TCD ऊस गाळप क्षमता
- ✻ ८० KLPD क्षमतेचा डिस्टीलरी व इथेनॉल प्लँट
- ✻ १० मे. टन प्र. दिन क्षमतेचा CNG प्रकल्प
- ✻ ३० टन प्र. क्षमतेचा $CO^2$ प्रकल्प
- ✻ शेतकरी बांधव व समाज सेवेसाठी कटिबद्ध
- ✻ ३ KLPD क्षमतेचा बायोमास पासून इथेनॉल निर्मिती (2G R & D) प्लँट

---

**मा. श्री. पांडुरंग आबाजी राऊत**
अध्यक्ष व कार्यकारी संचालक

**मा. ॲड. श्री. विकास रामचंद्र रासकर**
कार्याध्यक्ष

---

## संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री. महेश संभाजीराव करपे | श्री. हेमंत संभाजीराव करंजे | श्री. योगेश दत्तात्रय ससाणे |
| श्री. अनिल जयवंतराव भुजबळ | श्री. किसन दिनकर शिंदे | श्री. ज्ञानदेव तुकाराम कदम |
| श्री. अनिल लक्ष्मण बधे | श्री. प्रदिप दत्तात्रय लांडगे | श्री. माधव पांडुरंग राऊत |
| सौ. लता सतिष केंढे | श्री. हनुमंत बबन शिवले | श्री. भगवान दशरथ मेमाणे |

श्री. दत्ताराम मारूती रासकर (मुख्य कार्यकारी अधिकारी) व सर्व प्रवर्तक मंडळ

---

## - मुख्य कार्यालय -

मेघदुत बिल्डींग, २ रा मजला, स. नं. १२/२, भारत पेट्रोल पंपाच्या बाजूला, जुना लोखंडी पूल रस्ता
आकाशवाणी केंद्रासमोर, हडपसर, पुणे २८

**EPABX : 8551868899, 9923002924; Super Fax No. 011-43850261**

**Email : smsklho@rediffmail.com; smsklho@shreenathsugar.com**

# चांगल्या बातम्या

नुकत्याच घडलेल्या व देशाच्या दृष्टीने चांगल्या, अशा खूप गोष्टी आहेत. पण त्यातील काही बातम्या खाली देत आहे. आपण यातील काही बातम्या कदाचित वाचल्या असतील. तरी पण आपणासाठी परत एकदा पाठवत आहे.

१) ९ जून २५ रोजी श्री नरेंद्र मोदीजी यांच्या पंतप्रधान पदाला ११ वर्षे पूर्ण झाली. या कालावधीत देशाची खूप चांगली प्रगती, अनेक क्षेत्रांत झाली.

रस्ते, रेल्वे, वीजपुरवठा, आर्थिकस्थिती, संरक्षण क्षेत्र. आत्मनिर्भर भारत या अंतर्गत भारतात उत्पादन, जहाज–विमान निर्मिती, वगैरे. याचबरोबर सर्वसामान्यांसाठी जनधन योजना, विमा, उज्वला, शेतकरी सहाय्य, मोफत अन्नधान्य, घरोघरी शौचालय, सर्वांसाठी घरे अशा अनेक गोष्टी केल्या गेल्या व केल्या जात आहेत.

१७.१० कोटी नवीन नोकऱ्या, वैद्यकीय महाविद्यालयांची संख्या दुप्पट, २५ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढणे.

याशिवाय जम्मू–काश्मीरमधील कलम ३७० रद्द, तिहेरी तलाक रद्द, वक्फ मध्ये सुधारणा, नोटाबंदी, महिला आरक्षण, वगैरे धाडसी निर्णय झाले. सर्जिकल स्ट्राइक, बालाकोट, सिंदूर चा पाकिस्तानला दणका, तर चीनला डोकलाम, गलवान, या ठिकाणी जशास तसे उत्तर. यामुळे देशाची प्रतिमा बदलली. सैन्याला सरकार आपल्या मागे भक्कमपणे उभे आहे. हे लक्षात आले.

महत्त्वाचे म्हणजे लोकांची मानसिकता बदलली. सैन्य शास्त्रज्ञ यांच्याकडे लोक आदराने पाहू लागले. रस्ते, रेल्वे वगैरे आपल्याकडेही चांगल्या प्रतीचे असू शकतात आणि तसेच असायला हवेत. तसेच जगामध्ये ही भारताला मान आहे. भारतात आणि परदेशात सुद्धा अडीअडचणीच्या वेळी सरकार व जनता आपल्या पाठीशी आहे, ही सर्व सामान्यांची भावना दृढ झाली.

भारताने अनेक देशांना करोना काळात मोफत लस पुरवली. युद्धाच्या वातावरणात भारतीयांबरोबर अन्य देशांच्या नागरिकांची सुटका आपल्या सरकारने केली. त्यामुळे अनेक देशांना भारत आधार वाटू लागला आहे.

२) फ्रान्समधील राफेल लढाऊ जेट विमाने बनवणारी दस्सू एव्हिएशन कंपनी आणि टाटा डव्हान्स सिस्टीम मध्ये ५ जून रोजी ४ करार झाले. त्या अंतर्गत राफेलचा पूर्ण सांगाडा आता भारतात, टाटांच्या हैद्राबाद कारखान्यात बनवला जाणार आहे. २०२८ साली पहिला सांगाडा बनेल. त्यानंतर दर महिन्याला २ सांगाडे बनवले जातील. हे सांगाडे भारतातील तसेच जगातील राफेल विमान जोडणी साठी वापरले जातील. प्रथमच फ्रान्सच्या बाहेर हे सांगाडे बनवले जाणार आहेत.

तसेच भारताकडे सध्या असलेल्या ३६ राफेल विमानांच्या देखभालीसाठी लागणारे पार्ट्स व त्यांची देखभाल ही भारतात केली जाणार आहे. भारत सरकार अजून ११४ राफेल विमाने खरेदी करणार असून, नौदलासाठीच्या २६ विमानांचा करार नुकताच झाला आहे.

३) डीआरडीओ चे चेअरमन श्री समीर कामत यांनी एनडीटीव्ही ला दिलेल्या मुलाखतीत सांगितले, की डीआरडीओ मध्ये भारताची हवाई, आरमाराची आणि जमिनी वरील संरक्षण क्षमता वाढवण्यासाठी योजना राबवली जात आहे.

सध्या ब्रम्होस क्षेपणास्त्र फक्त ड्ढग–३०चघख या जेट विमानातून डागले जाते. लवकरच नेक्स्ट जनरेशन ब्रम्होस बनवले जात आहे. ते आताच्या ब्रम्होस पेक्षा लहान व वजनाला हलके आहे. व अन्य विमानावरुन ही ते डागता येईल. तसेच हायपरसॉनिक क्रूझ मिसाईल व ग्लाईड व्हेईकल मिसाईल ही डेव्हलप केले जात आहे. हवेतून हवेत मारा करणारी चघ व हवेतून जमिनीवर मारा करणारी रुद्रम ही जी क्षेपणास्त्रे आहेत. त्यांची आता सुधारित व लांब पल्ल्याची क्षेपणास्त्रे ही बनवली जात आहेत. कुश प्रकल्पा अंतर्गत जमिनीवरून हवेत मारा करणारी यंत्रणा बनवली जात आहे, जी रशियाच्या ड–४०० प्रणालीच्या तोडीची असेल. डिआरडिओ मध्ये डायरेक्ट एनर्जी क्षेपणास्त्रे जी हाय पॉवर्ड लेसर व मायक्रोव्हेव आधारित बनवली जात आहेत. ज्याचा उपयोग ड्रोन व हवेतून होणाऱ्या हल्ल्याला तोंड देण्यासाठी होईल.

तसेच सर्व क्षेपणास्त्रे ही जीपीएस किंवा अन्य कम्युनिकेशन शिवाय मारा करू शकतील, अशी बनवणे ही चालू आहे. त्याचा उपयोग जेथे इलेक्ट्रॉनिक क्षेत्र, शत्रूने बंद केले असते. तेथे होईल.

४) १८ जून रोजी अर्नाळा ही युद्धनौका विशाखापट्टणम येथे नौदलाच्या ताब्यात दाखल झाली. या युद्धनौकेची लांबी ७७.६ मीटर असून रुंदी १०.५ मीटर आहे. तसेच २.७ मीटर समुद्र खोली या युद्ध नौकेला पुरत असल्याने, समुद्र किनाऱ्याच्या जवळील कमी खोली असलेल्या भागात काम करणारी ही पाणबुडी विरोधी युद्धनौका आहे. याचे आरेखन आणि उत्पादन पूर्णपणे भारतीय आहे. ही युद्ध नौका नवीन पद्धतीप्रमाणे पाण्याच्या जेट ने मार्गक्रमण करते. त्यामुळे समुद्रात खूप कमी लहरी निर्माण होतात. व शत्रू च्या रडार ला नौका सहज सापडत नाहीत. यावर ५७ सैनिक तैनात केले जाऊ शकतात. अशा एकूण १६ युद्धनौकांची ऑर्डर कोची व गार्डन शिपयार्डला सरकारने दिलेली आहे.

५) ५ जून, जागतिक पर्यावरण दिवस या अनुषंगाने केंद्रीय मंत्री श्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की मागील वर्षी २०२४-२५ मध्ये ७०० कोटी पेक्षा अधिक लोकांनी भारतीय रेल्वेने प्रवास केला. रेल्वेचा प्रवास हा सुखदायी आणि आरामदायी असतो. पण त्याबरोबर तो अधिक स्वच्छ आणि हरित भारतासाठी पूरक ठरणारा असतो. रस्त्यावरील रहदारी रेल्वे कडे वळवून, तसेच स्वच्छ, हरित ऊर्जा स्त्रोतांद्वारे बनवलेल्या ऊर्जेचा जास्तीत जास्त वापर रेल्वे गाड्या चालवण्यासाठी केला जात आहे. त्यामुळे प्रदूषण कमी होत आहे. तसेच कार्बन उत्सर्जनही कमी होत आहे.

२०१३-१४ मध्ये रेल्वे ने मालवाहतूक १०,५५० लाख टन प्रति वर्ष होत होती. तर २०२४-२५ मध्ये १६,१७० लाख टन झाली. तज्ञांच्या मते रस्त्यापेक्षा रेल्वेने वाहतूक झाल्यामुळे १,४३० लाख टनाहून अधिक कार्बन उत्सर्जन टाळण्यास मदत झाली. त्यामुळे १२१ कोटी वृक्ष लागवडीमुळे होणारा परिणाम साधला गेला आहे. रस्त्याच्या वाहतुकीपेक्षा रेल्वे द्वारे मालाची वाहतूक केल्यास जवळपास निम्मा खर्च येतो. म्हणजे गेल्या दशकात मालवाहतुकीच्या खर्चात ३.२ लाख कोटी रुपयांची बचत झाली.

रेल्वे वाहतूक अधिकाधिक स्वच्छ व प्रदूषणमुक्त झाली आहे. ती ट्रक पेक्षा ९०% कमी कार्बन-डाय-ऑक्साईड उत्सर्जित करते. त्यामुळे हवा प्रदूषण कमी झाले आहे. रेल्वेमुळे २,०१,८५७ कोटी लिटर डिझेलची बचत झाली आहे. म्हणजे इंधन खर्चही अंदाजे २ लाख कोटींनी कमी झाला. २०१४ पर्यंत भारतीय रेल्वेच्या २१,००० किलोमीटर मार्गाचे विद्युतीकरण झाले होते. मात्र गेल्या ११ वर्षात नवीन ४७ हजार किलोमीटर मार्गाचे विद्युतीकरण झाले. ब्रॉड गेज मार्गांचे तर ९९% विद्युतिकरण पूर्ण झाले आहे. तसेच रेल्वेची स्थानके, कारखाने, आणि कार्यालयांमध्येही हरित ऊर्जेचा अधिकाधिक वापर केला जात आहे.

फक्त मालवाहतूक करणाऱ्या २,७४१ किलोमीटर मार्गाचे विद्युतीकरण झाले आहे. त्यामुळे रस्त्यावरील गर्दी कमी होण्याबरोबरच डिझेलचा वापर आणि कार्बन उत्सर्जनात ही लक्षणीय घट झाली आहे. हायड्रोजन वर धावणारी पहिली रेल्वे गाडी चाचण्या संपवून लवकरच राष्ट्राला अर्पण केली जाणार आहे. २६० प्रवाशांची वाहतूक करण्याची तिची क्षमता असेल. ही जगातील सर्वात शक्तिशाली आणि सर्वात लांब १० डब्यांची हायड्रोजन गाडी असेल.

६) काश्मीर खोऱ्याला रेल्वे मार्गाने जोडणाऱ्या जगातील सर्वात उंच चिनाब रेल्वे पुलाचे लोकार्पण ६ जून रोजी आपल्या पंतप्रधानांनी केले. या रेल्वे मार्गामुळे काश्मीर खोरे उर्वरित भारताशी बारमाही जोडले गेले. त्यामुळे जम्मू-काश्मीरच्या अर्थव्यवस्थेला बळकटी मिळणार आहे

उधमपुर - कटरा - श्रीनगर - बारामुल्ला हा २७२ किलोमीटर लांबीचा मार्ग आहे. या मार्गावरील चिनाब नदीवर असलेला पूल १,३१५ मीटर लांबीचा असून, नदीपासून पुलाची उंची ३५९ मीटर आहे. हा जगातील सर्वात उंच रेल्वे आर्च ब्रिज आहे. हा विस्फोटकविरोधी, भूकंप विरोधी, तसेच २६६ किमी प्रति तास वाहणाऱ्या वाऱ्याला तोंड देणारा व १२ महिने वापरण्यास योग्य पूल आहे. हा पूल १२० वर्षे आयुष्य व १०० किमी प्रति तास वेगाने जाणाऱ्या रेल्वे साठी योग्य बनवला आहे. या पुलाचे डिझाईन भारतीय विज्ञान संस्था बेंगळुरू यांचे असून मोठा वाटा जेष्ठ प्रा. माधवी लता यांचा आहे.

**कुमार आठवले**

# ५० वर्षापूर्वीच संविधान बदलले होते!

● **२५ जून १९७५ आणीबाणीचे काळे पर्व**

मोदी सरकार संविधान बदलणार, हा नॅरेटिव्ह सेट केल्यामुळे लोकसभा (२०२४)निवडणुकीत भाजपाला मोठा फटका बसला, असा निष्कर्ष समोर येत आहे. पण ही स्थिती असेल तर मग ओरिसा विधानसभेत सत्तांतर तर झाले, भाजपाने मोठ्या संख्येने जागाही लोकसभेत जिंकल्या. आंध्र आणि तेलंगणातही सरस कामगिरी झाली. उत्तर प्रदेश, हरियाणा, महाराष्ट्र, राजस्थानात अनेकांचा अंदाज चुकला. संविधान बदलणार ही चर्चा झाली, ती फैजाबादेतील (अयोध्या) भाजपा उमेदवार लल्लनसिंग यांच्या वक्तव्यामुळे. आणि ते समाज माध्यमात व्हायरल झाले. ही एक बाजू. पण संविधान खरेच बदलले या घटनेस आज ५० वर्षे झाली. २५ जून १९७५. भारताचे हुकूमशहा पंतप्रधान इंदिराजी गांधी यांनी आणीबाणी लागू केली. ह्या काळ्या दिवसाचे स्मरण आज कितीजण करतील? केंद्रात जे (इंडी) आघाडीचे घटक आहेत, महाराष्ट्रात महाविकास आघाडी म्हणून त्यांची ओळख आहे. हे सारे जण तेव्हाही इंदिराजींच्या आणीबाणीचे समर्थक होते. मग आता मोदी यांना हुकूमशहा म्हणून संबोधने आणि घटना बदलाची भीती आणि चर्चा यामध्ये कितपत तथ्य असू शकेल. त्या पार्श्वभूमीवर २५ जून १९७५ मध्ये आणीबाणीचे काळे पर्व याचे स्मरण आणि चिंतन केले तर या लोकसभा निवडणुकीत संविधान बदलाचा केलेला नॅरेटिव्ह सेट, आणि त्या माध्यमातून देशात सत्तांतराचा प्रयत्न म्हणजे एक कट कारस्थानाचा भाग होता का? यामध्ये कदाचित काही विदेशी शक्तींचा देखील हात असू शकतो का? अशी शंका उपस्थित होते.

१९७४ मध्ये अलाहाबाद न्यायालयाने दिलेल्या एका निर्णयाने इंदिराजी गांधी या संवैधानिकरित्या अपात्र ठरवल्या गेल्या. पण न्यायालयाचा निर्णय अमान्य करून पंतप्रधान पदावरील सर्वोच्च नेत्यानी तत्कालिन राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद यांच्या स्वाक्षरीने रातोरात वटहुकूम जारी केला. देशात आणीबाणी लागू केली. त्यासाठी ना संसदेचे अधिवेशन बोलावले, ना मंत्री परिषदेची मान्यता घेतली. आज माध्यमांमध्ये जी कथित चर्चा होते, मेरी मर्जी. तशी इंदिराजींचीही मेरी मर्जी. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली घटना, संविधान त्यांनी पायदळी तुडविले. त्या काळ्याकुट्ट इतिहासाचे आज स्मरण करणे क्रमप्राप्त आहे. अन्यथा मोदी संविधान बदलणार, केंद्र सरकारला चारसौ पार याचसाठी हवे, हा जो नॅरेटिव्ह सेट केलाय, तोच इतिहास होईल. तोच इतिहास सांगितला जाईल. इंदिराजींचा ५० वर्षापूर्वीचा घटना बदलाचा इतिहास गाळीव (पुसला) होईल. इंदिरा गांधी, ज्या देशाचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांची कन्या. स्व. राजीव गांधी यांच्या मातोश्री आणि सोनिया गांधी यांच्या सासू, तसेच राहुल आणि प्रियांका गांधी यांच्या आजी. ७८ वर्षांपासूनची अखंड काँग्रेसी परंपरा आहे, त्यांना घटनाकारांचे संविधान मान्य आहे का? लोकशाही मान्य आहे का, हा संवैधानिक प्रश्न उपस्थित केला पाहिजे.

● **माध्यमांवरही निर्बंध**

२५ जून १९७५ रोजी लोकशाहीचा गळा घोटला, इतकेच नव्हे तर सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांना व सामाजिक क्षेत्रात कार्यरत व्यक्तींना (जे इंदिराजींचे विरोधक होते) त्यांना तुरुंगात डांबले. मिसा कायद्याखाली अटकसत्र चालवले. माध्यमांवर सर्वंकश निर्बंध आणले. आज अनेक माध्यमं मोदी सरकारच्या कथित निर्बंधाची हाकाटी करतात, तेव्हाच्या घटनेची आणि आजच्या लोकशाहीची कितपत चर्चा करतात. किमान त्या काळ्या पर्वाचे आणीबाणीचे स्मरण तरी करतात का? वास्तविक आपल्याला निरंकुश लोकशाही हवी असते. त्याचा लाभ देखील घेतो. पण याच लोकशाहीत आपल्या मर्जीने कोणते विचार मांडतो. सांगतो. लिहितो. आणि तरीही संविधान खतरे मे ची बांग देतो. ५० वर्षापूर्वी लोकशाहीचा गळा घोटला, हुकूमशाहीचे काळे पर्व होते, लोकशाहीचे स्वातंत्र्य इंदिरा गांधी यांनी हिरावले होते. तेव्हा काँग्रेसची अनिर्बंध सत्ता होती, सरकार त्यांचे होते. त्याचे स्मरण आणि इतिहास सांगण्याचे धाडस आजची माध्यमं करतील?

५० वर्षानंतरच्या अर्थात आजच्या पिढीला हे सांगण्याची आवश्यकता आहे, की संविधान, घटना म्हणजे काय? २५ जून १९७५ रोजी काय घडले. लोकशाहीची क्रूर हत्या कुणी केली. त्याचे समर्थक कोण होते. आणि आज लोकशाही, संविधान धोक्यात आल्याची जी हाकाटी विरोधक, राजकीय पक्ष, विचारवंत, बुध्दीवादी करतात, त्यामागचा त्यांचा हेतू काय हे देखील ओळखण्याची गरज आहे. जयप्रकाश नारायण यांनी १९७५ मध्ये संपूर्ण क्रांतीची घोषणा केली होती. बिहार आणि गुजरातमध्ये विद्यार्थ्यांनी मोठा उठाव केला होता. त्याचे लोण देशभर पसरले होते. तेव्हा इंदिरा गांधी यांनी भारतीय संविधान अनुच्छेद ३५२ अन्वये देशात आणीबाणी लागू केली. नागरिकांच्या मूलभूत अधिकारावर आणि माध्यमांवर सेन्सॉरशिप आणले गेले. तेव्हा मिसाखाली लाखापेक्षा अधिक जणांना तुरुंगात डांबले. सर्व प्रक़ारच्या चळवळींवर निर्बंध घातले. रा.स्व.संघावरही बंदी घातली. अनेक स्वयंसेवकांनाही अटक करण्यात आली. या आणीबाणीच्या विरोधात रा.स्व.संघाच्या नेतृत्त्वाखाली सर्व राजकीय पक्ष व सामाजिक संघटना एकत्रित झाले. देशभरातून चळवळ उभारली गेली. अखेर २१ मार्च १९७७ रोजी आणीबाणी हटवण्यात आली. दरम्यान तेव्हा देशात सत्तांतर झाले होते. इंदिराजी, संजय गांधी हे मायलेक पराभूत झाले होते. या काळात इंदिराजींची २० कलमी योजना आणि संजय गांधी यांची ४ कलमी योजनेची खूप चर्चा झाली. या दोन्ही योजनांचे नाव ४२० (चारसौ बीस) असे केले गेले होते. तसेच सक्तीने नसबंदी करण्यात आली. त्यामुळे जनक्षोभ उसळला. परिणामी सार्वत्रिक (लोकसभा) निवडणुकीत इंदिराजी पराभूत झाल्या. जनता पक्ष सत्तेवर आला. मुरारजी देसाई प्रधानमंत्री झाले. त्यांनी आणीबाणीचे निर्बंध हटवले.

- **राजीव गांधी यांनीही संविधान बदलले...**

इंदिरा गांधी देशातील पहिल्या हुकूमशहा ठरल्या. विशेष म्हणजे आणीबाणी पर्व संपल्यानंतरही संविधान, घटना बदलण्याचा प्रकार घडला. पंतप्रधान राजीव गांधी यांना निरंकुश (१९८६) बहुमत होते. त्यांनी तुष्टीकरणासाठी शहाबानो खटल्याचा सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल नाकारला. आणि पाशवी बहुमताने घटनेत बदल करीत घटस्फोटानंतर मुस्लिम महिलांना मूलभूत देखभालीचा अधिकार संसदेत नामंजूर केला. आपली व्होटबँक मजबूत करण्यासाठी राजीव गांधी यांनी १९८६ मध्ये घटना बदलली. त्या संविधान बदलाविषयी आज कुणी आवाज उठवत नाही. संविधान बदलाची चर्चा देखील होत नाही. त्यानंतर राहुल गांधी, खटाखटची भाषा वापरून सामान्यांना गुमराह करणारे आणि हातात संविधानाची प्रत घेवून आपणच घटनेचे रक्षणकर्ते आहोत, असा दावा करतात. राहुल गांधी यांनी आपल्याच सरकारने मंजूर केलेला अध्यादेश संसदेबाहेर फाडून टाकला. विशेष म्हणजे पंतप्रधान (मनमोहनसिंग) त्यांच्याच पक्षाचे होते. ही घटना अलीकडची म्हणजे सन २०१३ मधील आहे. त्यामुळे इंदिराजी गांधी, राजीव गांधी आणि राहुल गांधी यांना संविधानविषयी किती आस्था आहे, होती, हे किंबहुना लक्षात येईल. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत संविधान बदलाचे नॅरेटिव्ह सेट करताना आणीबाणीचे काळे पर्व, शहाबानोचा खटला. आणि राहुल गांधी यांचे वर्तन लोकशाही संवर्धनासाठी किती पोषक आणि पूरक होते, ही बाब अधोरेखित झाली पाहिजे. माध्यमांनी देखील हे तथ्य समोर आणणे आवश्यक वाटते. तेव्हाच आपण सारे लोकशाहीवादाचे पुरस्कर्ते आहोत, संविधान मजबूत करतो असे अभिमानाने म्हणता येईल. जय संविधान।

**विजयकुमार पिसे**

◈ ◈ ◈



# संविधान आणि त्याची समरसता

आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये 'भगवद्गीता' हा जसा महत्त्वपूर्ण व प्रार्थनीय ग्रंथ आहे. त्याचप्रमाणे कायदेशीर पुस्तकांसाठी 'भारतीय संविधान' हा भगवद्गीतेप्रमाणेच महत्वपूर्ण ग्रंथ आहे. कारण, आपल्या देशातील लोकशाहीचा कारभार शांततापूर्वक आणि उत्तमरित्या सांभाळण्यासाठी 'संविधान' हाच ग्रंथ आधारवड म्हणून सतत कार्य करत असतो.

आज भारताचा सर्व कारभार ज्या नियम कायद्याच्या आधारे चालतो, त्या कायद्याचे पुस्तक म्हणजे 'भारताचे संविधान.' प्रत्येक भारतीय नागरिकासाठी 'संविधान' हा जणू धर्मग्रंथच आहे, कारण हा ग्रंथ म्हणजे एक उत्तम मार्गदर्शकच नाही तर एक प्रवर्तक देखील आहे.

भारतीय संविधानाचा थोडक्यात इतिहास पाहता, भारतीय संविधान तयार करण्यासाठी सर्वप्रथम 'घटना समिती' स्थापन करण्यात आली होती. त्यामध्ये सुरुवातीला २९६ सदस्य होतेय भारताच्या स्वातंत्र्यानंतर ही संख्या फेरबदल करून २९९ करण्यात आली. ९ डिसेंबर १९४६ रोजी संविधान सभेची पहिली बैठक घेऊन ११ डिसींबर रोजी डॉ. राजेंद्रप्रसाद यांची समितीचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. मुख्य समित्या आणि १३ उपसमित्यांची रचना केली.

'मसुदा समिती' ही घटना समितीमधील, तसेच घटनेच्या निर्मितीसाठी मुख्य समिती होती. त्यामध्ये ७ सदस्य होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष होते. मसुदा बनविण्याचे प्रमुख काम श्री. एस. एन. मुखर्जी यांनी पाहिले. भारतीय संविधानाची निर्मिती करताना घटनाकर्त्यांनी जगातील जवळपास ६० देशातील घटनांचा विचारपूर्वक अभ्यास केला. एकूण २ वर्षे ११ महिने व १८ दिवसांच्या कालावधीनंतर भारताचे संविधान तयार झाले. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी राज्यघटनेच मसुद्याचा ठराव संमत झाला म्हणूनच तो दिवस 'संविधान दिवस' म्हणून ओळखला जातो. तर २६ जानेवारी १९५० हा घटनेच्या प्रारंभाचा दिवस होता म्हणूनच तो आपण 'प्रजासत्ताक दिन' किंवा 'गणराज्य दिन' म्हणून साजरा करतो.

मूळ संविधानात १ प्रास्ताविका, ११ अनुसूची, २२ अनुसूची भाग, ४४८ कलमे व ५ परिशिष्टे आहेत. भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे लिखित संविधान आहे. समता, बंधुता, स्वातंत्र्य व न्याय यांच्याबरोबरीने प्रज्ञा, शील, करुणा व मैत्री या मूल्यांची देखील घटना निर्मितीत बीजे रोवली गेली आहेत. आपले संविधान म्हणजे भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातून आलेले अनुभव आणि तत्कालीन विचार यांतून जे विचार निपजले त्यांचा एकूण परिपाकच आहे. म्हणूनच हल्ली बरेच कार्यक्रमांचे आयोजन करुन लोकांमध्ये जनजागृती केली जात आहे कारण सद्यपरिस्थितीत संविधानाची सजगता वाढणे गरजेचे आहे.

भारताच्या शासनाला लागणाऱ्या मूलभूत असणाऱ्या स्वतंत्रता, समानता, न्याय व वैशिष्ट्यांसह जनतेचे सार्वभौमत्व, धर्मनिरपेक्ष–लोकशाही, प्रजासत्ताक गणराज्य, मूलभूत अधिकार नोंद, संसदीय शासनपद्धती, स्वतंत्र न्यायव्यवस्था, द्विगृहात्मक कायदेमंडळ, अल्पसंख्यांक संरक्षण, प्रौढमताधिकार अशी विविध वैशिष्ट्ये देखील यामध्ये आहेत.


इतके वैशिष्ट्यपूर्ण असणारे आपले संविधान प्रत्येक भारतीयापर्यंत पोहोचले आहे का? हा प्रश्न मात्र भारत स्वतंत्र होऊन ७५ वर्षे झाल्यानंतर देखील पडतो, कारण लोकांना बरेच धर्मग्रंथ माहित आहेत पण ज्या ग्रंथावर आधारित आपली लोकशाही टिकून आहे त्यापासूनच बरेच लोक अज्ञात आहेत. म्हणजे संविधान हे नेमके काय आहे हेच लोकांपर्यंत नीटसे पोहोचलेले नाही. आजही असे वाटते संविधान खरंच नागरिकांमध्ये किंवा त्यांच्यासाठी समरस झाले आहे का? की लोकशाहीच्या नावाखाली राजकारणासाठी संविधानाचा मूळ अर्थच मागे पडू लागला आहे. असा प्रश्न मात्र निश्चितच उपस्थित राहू लागला आहे. कारण बऱ्याच लोकांना संविधान काय आहे हे एक भारतीय नागरिक म्हणून फारसे माहित नसते त्यामुळे लहानपणापासूनच इतर विषयांबरोबर 'नागरिकशास्त्र' हा विषय अधिक व्यापकरित्या शिकवणे गरजेचे आहे.

भारतीय संविधानातील अनेक नवनव्या तरतुदींमुळे किती शांतता टिकून राहते किंवा त्या त्या मुद्यांच्या जोरावर भारतात अराजकता पसरते हे ही पाहणे तितकेच गरजेचे आहे. जसे की, आपल्या मूळ घटनेमध्ये समाजवादी, धर्मनिरपेक्ष हे शब्द नव्हतेच परंतु १९७६ साली माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी आमचे सरकार कसे सर्व समाजातील लोकांना एकसंध घेऊन चालते हे दाखविण्याकरिता 'समाजवादी' व 'धर्मनिरपेक्ष' या शब्दांना संविधानात सामील करून घेतले. मग, आता प्रश्न असा उपस्थित राहतो की, आता आपला भारत देश खरोखरच धर्मनिरपेक्ष झाला आहे का? खरे पाहता आपल्या प्रतिज्ञेतील वाक्यांप्रमाणे 'आम्ही सारे भारतीय आहोत' हीच संकल्पना पूर्णपणे अस्तित्वात येणे अपेक्षित होते असे असताना मात्र आपल्याच देशातील काही बांधव जातीयवादाखाली, प्रांतीयवादाखातर आपल्याच संसदेवर, लाल किल्ल्यावर किंवा ऐतिहासिक वास्तूंवर हल्ले घडवून आणतात. ज्या लोकशाहीचे आपण गोडवे गातो तिलाच अशा वागणुकीने लाजिरवाणे करतो. संविधानाने दिलेल्या अधिकारांचा चुकीच्या पद्धतीने वापर करतो.

खरे म्हणजे, संविधानाने आपल्याला मूलभूत हक्क व अधिकार दिले आहेत...ते प्रत्येक भारतीय नागरिकाचे स्वतंत्ररित्या अस्तित्व टिकविण्यासाठीच! परंतु, ते सुद्धा संविधानाच्या सीमारेषेत राहून वापरावे लागतात. अन्यथा बेकायदेशीररित्या केलेल्या कृत्याला व मूलभूत अधिकारांच्या नावाखाली शोधलेल्या पळवाटेला कायदेशीररित्या घटनाबाह्य कृत्य म्हणून संबोधले जाते. तसेच, घटनेमध्ये काही कालानुरूप दुरुस्त्या करणे गरजेचे असते पण त्या करताना देखील संविधानात दिलेल्या तरतुदींमध्येच राहूनच त्या करणे अपेक्षित असते. घटनाबाह्य दुरुस्त्या या स्वीकारल्या जात नाहीत.

याचे फार दिवसांपासूनचे चर्चेत असणारे उदाहरण म्हणजे आरक्षण. संविधानामध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांचा विरोध पत्करुन काही ठराविक समाज जो भारताच्या स्वातंत्र्याच्या काळात दाबून गेला होता त्या समाजाला सशक्त करण्याच्या चांगल्या हेतूने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ठराविक काळासाठी आरक्षण ही तरतूद संविधानामध्ये घेतली होती व त्या तरतुदीप्रमाणे दर १० वर्षांनी त्याचा पुनर्विचार होणे अपेक्षित होते. परंतु झाले उलटेच आता त्या कुठल्याही दृष्टीने आरक्षणाची गरज नसताना खोटे दाखले बनवूनसुद्धा विविध समाजातील लोक फायदा करून घेतांना आपण पाहतो.

खरंतर, आतापर्यंत कुणालाही त्याच्या जाती-पोटजाती वरुन आरक्षण देऊन वेगळा समाज करुन देणे ही संकल्पनाच मुळी अस्तित्वात राहणार नाही हे संविधानाप्रमाणे क्रमप्राप्त लक्ष होते. खरंतर... आरक्षण हे आर्थिक परिस्थितीनुसार हवे होते पण समाजातील पीडित असणाऱ्या जनतेपेक्षा बऱ्याचदा सधन राजकारण्यांनीच आरक्षणाचा मुद्दा जास्त उचलून धरलेला दिसतो. कारण आरक्षण हा मुद्दा राजकारणासाठी वोटिंग मिळविण्याचे पॉलिटिकल साधन झाले आहे. जातीप्रमाणे राजकारणी त्यांचा पक्ष निवडून सामाजिक जातीयवाद उपस्थित करतांना दिसतात. सगळ्यात मोठे हिंदू राष्ट्रातील नागरिक संविधानातील समाजवादी-धर्मनिरपेक्ष या संकल्पनांना मात्र कागदोपत्रीच पाहतो. तेव्हा वाटते खरंच संविधानामूळे सर्व भारतीयांमध्ये सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक या बाबींमध्ये संतुलन राखले गेले आहे का?



जेव्हा भारत–पाकिस्तान फाळणी झाली ती धर्मांच्या आधारावर करण्यात आलेली सगळ्यात मोठी सांप्रदायिक फाळणी होती. म्हणून आपले संविधान तयार करताना कलम ३७० प्रमाणे जम्मू काश्मीरला विशेष दर्जा दिला होता.

वास्तविक हे जर तेव्हाच टाळले असते आणि जम्मू काश्मीरला कुठलाही भेदभाव न करता इतर राज्यांप्रमाणे मानाने संविधानातील तरतुदींमध्ये समाविष्ट करून घेतले असते तर आपल्याच काश्मीर बांधवांवरील बरेच आतंकवादी हल्ले टळले असते आणि त्यांनाही गेल्या अनेक वर्षांत भारतीय होण्याचा अभिमान जाहीररित्या प्रकट करता आला असता, हो ना! पण, गेल्या काही वर्षांत हे कलम वगळून टाकल्याने आपल्या भारतमातेचा शिरपेचच परत मिळवल्यासारखे आहे.

संविधानाप्रमाणे प्रत्येक भारतीयाला अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे. परंतु ते चुकीच्या पद्धतीने कसे वापरले जाऊ नये याचा मात्र प्रत्येक भारतीयाने विचार केला पाहिजे.

संविधानाने कलम ४४ प्रमाणे 'समान नागरी कायदा' म्हणजेच 'Uniform Civil Code' हे ही वैशिष्ट्य सगळ्यांना प्रदान केले. जेणेकरून जातीयवाद, प्रांतवाद असे वाद सामाजिक तत्वावर उपस्थित राहणार नाहीत. परंतु, भारतात असणाऱ्या अनेक जाती– पोटजातींमुळे किंवा विविध धर्मांच्या लोकांच्या त्यांच्या स्वतंत्र अशा स्वतःच्या वेगवेगळ्या असणाऱ्या धार्मिक भावना व तत्वांमुळे ह्या तरतूदीला तितके महत्त्व मिळालेले दिसून येत नाही. प्रत्येक भारतीयाला, मग स्त्री असो वा पुरुष यांना समान जगण्याचा समान हक्क प्राप्त आहे परंतु, आजही आपल्या देशात स्त्री ही पुरुषाच्या बरोबरीने स्वतंत्र व सुरक्षित आहे का? अशावेळी वाटते संविधानातील तरतूदी अजूनही समरस होणे गरजेच्या आहेत.

आज आपला देश विकसित देश होताना दिसत आहे. तसेच प्रत्येक ठिकाणी जगामध्ये भारत देश प्रगतीपथावर आहे. अशावेळी प्रत्येक भारतीय नागरिकाचे हे कर्तव्य आहे की, आपल्याला लाभलेल्या संविधानाला आपण 'शासनाची किंवा कायद्याची गीता' मानून तिचा लोकशाही टिकवण्यासाठी सन्मान केला पाहिजे.

आपल्या संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर सुद्धा म्हणाले होते की, 'संविधान कितीही चांगले असू देत पण ते चुकीच्या पद्धतीने वापरले गेले तर ते चुकीचेच वाटेल आणि संविधान जरी वाईट असेल परंतु ते वापरणारे लोक चांगल्या पद्धतीने ते वापरतील तर ते चांगलेच सिद्ध होईल'.

तेव्हा आपले संविधान हे सगळ्या भारतीयांमध्ये समरस होण्याकरिता समाजातील प्रत्येक घटकाने ती जबाबदारी घेणे निकडीचे आहे तरच आपले लोकतंत्र टिकेल आणि अराजकता मिटेल!

**ॲड. स्वाती जेरे**

◈ ◈ ◈

**विचारधन...**

आपल्या देशाच्या संविधानाचे सर्व श्रेय महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना दिले जाते, यावरून अनेकांच्या मनात संभ्रम आहेत कारण कोणताही कायदा, घटनात्मक तरतुदी या अनेकांच्या साहाय्याने कायदा अमलात आणल्या जातात त्यासाठी सर्वांचे सहकार्य, योगदान असते. भारताच्या संविधान सभेत संविधान सभेचे प्रमुख सल्लागार व तज्ञ बेनेगल राव, डॉ. राजेंद्र प्रसाद, सरदार वल्लभभाई पटेल, पंडित नेहरू यांचाही समावेश आणि योगदान आहे. परंतु संविधानाचे जनक, शिल्पकार डॉ. बाबासाहेबांनाच मानले जाते याचे कारण म्हणजे, बाबासाहेबांकडे विद्वता, वकृत्व, तर्कनिष्ठा, कल्पनाशक्ती, कायद्याचा अभ्यास, ज्ञान, अनुभव, प्रभावी युक्तिवाद, सर्वांना समजणारे स्पष्टीकरण, कोणत्याही मुद्द्याला प्रतिवाद करून वाद संपुष्टात आणण्याची हातोटी होती, जी त्यांच्याशिवाय संविधान सभेच्या अन्य कोणत्याही सदस्यांकडे नव्हती. त्यांच्याइतका कायदाचा अभ्यास असलेले दुसरे कोणीच नव्हते. बाबासाहेबांमुळे आपले संविधान अतिशय स्पष्ट बनले गेले. ते नसते तर आता आहे तितके सुस्पष्ट संविधान कदाचित झालेही नसते. बेनेगल राव यांचेही खूप मोठे योगदान आपल्या संविधान निर्मितीत आहे. पण जसे एखादया कंपनीने मोठा नफा, नाव कमावल्यावर प्रशंसा कौतुक त्या कंपनीच्या मालकाचे होते, इतर सदस्यांचे, कामगाराचे नाही त्याप्रमाणे संविधानाचे श्रेय समितीचे अध्यक्ष म्हणून बाबासाहेबांना दिले जाते इतर सदस्यांना नाही. तर मग संविधानाच्या श्रेयावरून वाद घालण्यात अर्थ नाही. अनंत अडचणींचा सामना करून, आपल्या विचारांना कडाडून झालेला विरोध झुगारून निर्माण केलेले संविधाने सादर करताना बाबांच्या डोळ्यात पाणी आले होते कारण त्यांना विश्वास नव्हता संविधान जसेच्या तसे अमलात आणले जाईल आणि आज तेच झालं आहे, त्यांची भीती खरी ठरली आहे...

**बाबासाहेबांना विनम्र अभिवादन**

# २५ जून १९७५ : एका काळ रात्रीची सुरुवात!

आज २५ जून २०२० ला ५० वर्ष पूर्ण झाली आणीबाणी पर्वाला. या काळातील राजकीय नेते, सामाजिक नेतृत्व करणारे आणि त्यांचे अनुयायी या जगात आता बहुतांश नाहीत. त्या काळात तरुण असलेले अनेक जण वेगवेगळ्या पक्षात नेतृत्व करत आहेत. देशाच्या स्वातंत्र्योत्तर काळातील एक काळ रात्र म्हणून ज्या पर्वाचा उल्लेख करावा लागेल तो काळ म्हणजे हा आणीबाणीचा काळ. २५ जून १९७५ ते २० मार्च १९७७.

**पार्श्वभूमी :** १९७१ साली प्रचंड मताने गरिबी हटाव! नारा देत इंदिरा गांधी सत्तेत आल्या. बांगला देश निर्मिती आणि पाकिस्तानचा पराभव यामुळे त्यांची लोकप्रियता अधिकच वाढली. त्याच काळात इंदिराजी यांच्या निवडणुकी संदर्भातील खटला अलाहाबाद कोर्टात दाखल झाला होता. तो राज नारायण या इंदिराजी यांच्या विरोधातील उमेदवाराने दाखल केला होता. निवडणुकीतील भ्रष्ट मार्ग अवलंबून त्यांनी निवडणूक जिंकली असा राज नारायण यांचा आरोप होता! गरिबी हटाव नारा देवून सत्तेत आलेल्या इंदिरा गांधींना गरिबी तर दूर करता आली नव्हती पण भ्रष्टाचार मात्र वाढत चालला होता. नगर वाला प्रकरण, तुलमोहन राम प्रकरण गाजत होते. त्यातच ललित नारायण मिश्र यांची हत्या झाली.

संसदेत असलेले पाशवी बहुमत आणि त्यातून निर्माण झालेली उन्मादक वृत्ती! यातून पक्षात न राहिलेला विरोध या मुळे इंदिरा गांधी यांची मानसिक अवस्था ही हुकुमशहा सारखी झालीच होती. चंद्रशेखर, मोहन धारिया, रामधन या सारखे तरुण तुर्क आवाज उठवत होते पण त्यांचा आवाज दाबला जात होता. अशातच बिहारमध्ये नवनिर्माण आंदोलन जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली सुरू झाले. गुजराथ मध्ये चिमण भाई पटेल यांच्या विरोधात आंदोलन सुरू झाले. विद्यार्थी आंदोलनाचे नेतृत्व जयप्रकाश नारायण यांनी करायचे मान्य केले. विरोधी पक्ष जयप्रकाश जी यांच्या नेतृत्वाखाली संघटित झाला. गुजरातमध्ये निवडणुका टाळल्या जात होत्या. मोरारजी देसाई यांच्या उपोषणामुळे निवडणुका घ्याव्या लागल्या ज्यात काँग्रेस पराभूत झाली. अजून त्यात भर म्हणून तो ऐतिहासिक निर्णय जस्टिस जगमोहन सिन्हा यांनी दिला. रायबरेली मध्ये १९७१ साली झालेल्या निवडणुकीत इंदिराजी नी गैर मार्ग अवलंबून भ्रष्टाचार केला हा आरोप मान्य करत त्यांनी त्यामुळे ती निवड रद्द समजावी असा निकाल दिला आणि निवडणूक लढवण्यास

इंदिरा गांधींना सहा वर्ष बंदी घातली. खरे तर यात राजीनामा द्यायचा आणि सुप्रीम कोर्टात दाद मागायची हा सरळ सरळ पर्याय समोर असताना त्यांनी राजीनामा न देण्याचा अनाकलनीय निर्णय घेतला. अर्थात या मागे इंदिरा इज इंडिया अँड इंडिया इज इंदिरा ! असे म्हणणारे देवकांत बारुवा, सिद्धार्थ शंकर रे, बन्सीलाल आणि मुख्य म्हणजे सुपुत्र संजय गांधी होते. इतर ज्येष्ठ नेत्यांना (स्वरणसिंग ,यशवंतराव किंवा जगजीवन राम) याना धाडस नव्हते. (देशाच्या इतिहासात घटनेची झालेली अशी पायमल्ली कधीच झाली नव्हती. जाता येता संविधान बचाव म्हणून बाँब मारणारे आणि त्यांचे राजकीय पूर्वज त्यावेळेस शेपूट घालून बसले होते आणि या उलट ज्यांना देशाच्या घटनेचे हत्यारे असे संबोधले जाते त्याच विचारसरणीच्या लोकांनी आपला जीव आणि आयुष्य पणाला लावून घटना वाचवली हे विसरता कामा नये.)

देशभरातील असंतोष आणि हा निकाल यातून हुकुमशाही वृत्तीतून आणीबाणी चा निर्णय त्यांनी घोषित केला. या पार्श्वभूमिवर लोक संघर्ष समितीची स्थापना झाली होती. नानाजी देशमुख त्या समितीचे कार्यवाह होते आणि जयप्रकाश जी अध्यक्ष. आणि काळ रात्र सुरू झाली: आणि बाणी लागू झाली तसे देशातील प्रमुख विरोधी पक्षाच्या नेते मंडळींची धरपकड सुरू झाली. त्या पाठोपाठ राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या सर्व कार्यक्रम वर बंदी घालण्यात आली. कार्यालये सील झाली. अनेक कार्यकर्त्यांना पकडून डांबण्यात आले. मिसा सारखा कायदा मंजूर करण्यात आला त्या कायद्या ने सरकारला विनाचौकशी, विना जामीन कुठल्याही व्यक्तीला तुरुंगात डांबून ठेवण्याचे

अधिकार प्राप्त झाले आणि मग लाखो देशभक्त संघ कार्यकर्ते, विरोधी पक्षातील ज्येष्ठ मंडळी आणि जिल्हा तालुका पातळीवर काम करणारे कार्यकर्ते तुरुंगात गेले. वीस कलमी नावाचा एक कार्यक्रम आखला गेला. त्यात लोकसंख्या रोखण्यासाठी नसबंदी हा उपाय दिला गेला. त्या नावाखाली सगळ्या सरकारी कार्यालयांना टार्गेट दिल्याने त्या मुळे लोकांवर खूप अत्याचार सुरू झाले. लग्न न झालेले तरुण आणि म्हातारे पुरुष सर्वांचीच नसबंदी सुरू झाली. तुर्क मान गेट प्रकरण अजून ही विसरले जाऊ शकत नाही. न्याय व्यवस्था हतबल झाली. संसद मूक झाली. वृत्तपत्र, रेडिओ आणि इतर माध्यमे यावर सेन्सॉर शिप लादली गेली. सरकारला हवे ते, हवे तसे छापायचे त्यांना हवे ते बोलायचे अशी स्थिती होती. अनेक वेळा स्वाभिमानी वृत्त पत्रांचे अग्रलेख कोरे असायचे. विद्याचरण शुक्ल हे नभोवाणी मंत्री होते. काँग्रसच्या अधिवेशनात किशोर कुमार यांस गाणी म्हणण्यास बोलावले होते त्यांनी नकार दिला त्या नंतर आणि बाणी उठे पर्यंत आकाशवाणी केंद्रावर त्यांची गाणी लावली जात नव्हती. आंधी हा गुलजार यांचा सिनेमा. केवळ इंदिरा गांधी यांच्या खासगी जीवनाशी मिळते जुळते कथानक म्हणून त्यावर बंदी घालण्यात आली. काळरात्र अधिकच गडद होत चालली होती आणि पहाटेची चिन्ह दिसत नव्हती. सर्वत्र अंधार पसरला होता. अमावस्या एव्हढी दीर्घ कशी? असा प्रश्न पडत होता. स्वातंत्र्य मिळून जेमतेम २८ वर्ष होत नाही तर देश पुन्हा पारतंत्र्यात गेल्यासारखी स्थिती होती. त्या वेळेस तरी राज्यकर्ते परकीय होते पण हे तर आमचेच! ज्यांना जनतेने विश्वासाने प्रचंड मताधिक्याने निवडून दिले ते. पाशवी बहुमत या शब्दाचा अर्थ कळत होता. महाभारतातील हतबल कृपाचार्य, द्रोणाचार्य, भीष्माचार्य जिकडे तिकडे दिसत होते. भारतमातेचे, लोकशाहीचे वस्त्रहरण रोज लोकशाहीच्या मंदिरात होत होते. राष्ट्रपती आणि न्याय व्यवस्था रबरी स्टॅम्प झाली होती. पांडव वनवासात होते. आणि कृष्णाची चाहूल लागत नव्हती. भारत मातेच्या कपाळी फाळणी नंतर पुन्हा एक संकट कोसळले होते. काळ रात्र संपत नव्हती. जयप्रकाश जी यांनी अटक होत असताना सूचक वाक्य उच्चारले  विनाशकाले विपरीत बुद्धी! दुर्योधनाने जमा केलेली चांडाळ चौकडी येथे ही जमली. फक्त नावे बदलली होती. कृती तीच होती. धृतराष्ट्र नव्हते पणं गांधारी डोळ्यावर पट्टी ओढून बसली कारण सिंहासनाच्या सुखापुढे सगळे मूल्य गळून पडली.

आणि संधी काल सुरू झाला: रात्र आणि पहाट यात एक असा काळ येतो ज्यात अंधकार तर गेलेला नसतो पण त्याची जाण्याची आणि पहाट उगवण्याची चिन्ह मात्र दिसत असतात. तोच तो संधी काळ. संघाने या अन्याया विरूद्ध रणशिंग फुंकले आणि तो संधी काळ दिसू लागला. भारतीय जनसंघ आणि अभाविप भ्रष्टाचाराच्या विरोधातील जयप्रकाश जी यांच्या आंदोलनात सामील झालेच होते. पण लोकशाहीच्या लढ्या साठी संघाने उतरायचे ठरवले. बाळासाहेब देवरस येरवडा येथे होते त्यांच्याशी संपर्काचे सूत्र ठरवले गेले. संघाच्या कामाचे केंद्र मुंबई ठरले. राजेंद्र सिंह जी उत्तर, यादवराव जोशी दक्षिण ,मोरोपंत पिंगळे पश्चिम आणि भाऊराव देवरस  यांनी पूर्व भाग अशी  प्रमुख म्हणून जबाबदारी घेतली. माधवराव मुळे समन्वय करत होते. एकनाथजी रानडे सरकारी अधिकाऱ्यांशी संपर्क करत होते. सत्याग्रह अत्यंत योजना करून ठरले. कुठलेही निरोप शेवटपर्यंत पोहचवण्याची व्यवस्था वाटून दिली गेली. देशभरात सत्याग्रह झालेल्या पैकी ७५ टक्के म्हणजे जवळ जवळ ८०००० स्वयंसेवक सत्याग्रहात सहभागी झाले. नानाजी यांस अटक झाल्यावर रवींद्र वर्मा आणि त्यांस अटक झाल्यावर लोक संघर्ष समितीची सूत्रे दत्तोपंत ठेंगदि यांच्या कडे आली. क्रांतीच्या गप्पा मारणारे आणि परिवर्तनाच्या वल्गना करणारे सगळे डावे काही अपवाद वगळता गलीत गात्र झाली होती. मराठी बांधवांसाठी रस्त्यावर येवुन आपल्याच अन्य बांधवांची डोकी फोडणारी मंडळी पण परिस्थितीला शरण गेले होते. पण संघाचे अनेक प्रचारक भूमिगत होवून त्यांनी सत्याग्रहाची चळवळ संघटित करण्यास सुरुवात केली होती. इंदिरा गांधी यांना हे अपेक्षित नव्हते. सर्व प्रकारच्या निर्बंध व दडपशाही असून ही पत्रके छापली जात होती ठरलेल्या वेळी ठरलेल्या ठिकाणी सत्याग्रह होत होते पत्रके वाटली जात होती. सत्याग्रह केलेल्या कार्यकर्त्यांच्या घरी अनन्वित अत्याचार होत होते. सत्याग्रह करणाऱ्यांच्या घरी किंवा मिसाबंधुंच्या घरी आर्थिक मदत, घरातील वयोवृध्द मंडळींची औषध व्यवस्था, प्रसंगी त्यांची हॉस्पिटल मध्ये रवाळीं करण्याची व्यवस्था, त्यांच्या घरातील शुभ कार्य किंवा घडणाऱ्या दुःखद घटना हे सगळे प्रचारक आणि भूमिगत राहून काम करणारे कार्यकर्ते करत होते.

सत्याग्रह ची शिक्षा पूर्ण झाल्यावर लगेच अनेकांना मिसा मध्ये अटक केली जात होती. पण सत्याग्रहाचा ओघ काही

थांबत नव्हता ही सरकारच्या दृष्टीने चिंता वाढवणारी गोष्ट ठरत होती. कार्यालये सील होती पण कार्यकर्त्यांची घरे कार्यालय बनली होती. भूमिगत कार्यकर्ते त्या घरचे भाऊ, मामा, काका बनले होते. जेल मध्ये जाणाऱ्यांना किती वर्ष राहवे लागेल हे माहीत नव्हते कदाचित तुरुंगातच आपला मृत्यु येणार अशी स्थिती होती पण कुणीही माफी मागून जेल मधून बाहेर येण्यास तयार नव्हते मनोबल उंच होते. जेल हीच प्रशिक्षण केंद्र बनली होती. जेथे अन्य विचाराची मंडळी धीर सोडून नकारात्मक बोलत होते तिथे संघाचा फाटका कार्यकर्ता धीरोदात्त पणे उभा होता.

दोन, दोन भाऊ जेल मध्ये असताना तीसरा भाऊ सत्याग्रह करतो आहे, वडील मिसात आहेत आणि एकुलता एक मुलगा सत्याग्रह करतो आहे अशी असंख्य उदाहरणे सर्वत्र दिसत होती. घरात एक ही कर्ता पुरुष नसताना स्वाभिमानाने असंख्य उर्मिला रुपी माता, भगिनी संसाराचा गाडा ओढत होत्या मुलाला, दीरा ला सत्याग्रह करण्यास प्रोत्साहन देत होत्या आणि माफी मागून आला तर मी कधी माफ करणार नाही असे पतीला सांगणाऱ्या पण वीरांगना हा लढा यशस्वी करत होत्या.

जेल मध्ये सुद्धा कार्यकर्त्यांचे मनोधैर्य वाढवण्याचे काम संघाचे अधिकारी करत होते. अन्य संघटना , पक्ष अगदी मुस्लिम समाजाचे नेते मंडळी संघाच्या कार्यकर्त्यांचे धीरोदात्त वागणे बघून प्रभावित होत होते.

संघाबद्दल असणारे समज गळून पडत होते. संघ कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण वर्ग जणू भरले होते. अनेक विषयातले तज्ञ वेगवेगळ्या कारागृहात डांबले गेले होते. ते आपल्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा फायदा सहकारी कार्यकर्त्यांना करून देत होते. या प्रक्रियेतून च आज भारतातील विविध पक्षातील नेतृत्वाची फळी उभी राहिली आहे हे येथे लक्षात घ्यावे लागेल. परिणाम दिसू लागले: जसा जसा काळ पुढे जाऊ लागला तसा तसा सरकारकडून संयम सुटायला लागला अत्याचार वाढले. नांदेडला संजय गांधी च्या उपस्थितीत सत्याग्रह झाल्यावर भास्करराव ब्रह्मनाद कर आणि त्यांच्या मित्रांना प्रचंड मारहाण झाली होती. कारण मुख्यमंत्र्याच्या गावात (शंकरराव चव्हाण) हे घडले होते. लाचारी किती असावी? संजय गांधी यांची चप्पल उचलणारे मुख्यमंत्री लोकांनी बघितले.

नगर जिल्ह्यात एका मेळाव्यात मुख्यमंत्री बोलत असताना मागून संजय गांधी यांनी कोट ओढल्यावर अर्धे वाक्य सोडून भाषण थांबवणारे मुख्यमंत्री सर्वांनी बघितले. महाराष्ट्राचे जाणते राजे, त्यांचे राजकीय गुरू आणि समस्त काँग्रेस जन या राजपुत्राला शरण गेले होते लाचार झाले होते. (ज्या महाराष्ट्रातून छत्रपती शिवाजी महाराज जन्माला आले ज्यांनी की थेट आग्र्यात जाऊन औरंगजेबाला आव्हान दिले ,स्वतःचा जीव धोक्यात घातला पण अपमान सहन केला नाही त्याच महाराष्ट्रातील नेतृत्व लाचार आणि मिंधे झालेले बघवत नव्हते.) एकेकाळी लाल, बाल आणि पाल ज्यांनी काँग्रेस ला स्वातंत्र्य चळवळीचे प्रतीक बनवले होते त्या काँग्रेसची ही दुरवस्था झाली होती. याविरुद्ध बंड उभारणारे काँग्रेस कार्यकर्ते चंद्रशेखर, मोहन धारिया, रामधन अशी माणसे पण जेल मध्ये गेली होती. लेखण्या सगळ्या सत्तेपुढे झुकल्या होत्या.

कला आणि कलाकार चाकरी करण्यात धन्यता मानत होते अशा वेळेस महाराष्ट्रात एक दुर्गा कडाडली आणि ती सगळ्यांनी बघितली आणि ती दुर्गा होती दुर्गा भागवत! निमित्त होते साहित्य संमेलनाचे! यशवंतराव चव्हाण यांच्या उस्थितीमध्ये अध्यक्ष पदावरून दुर्गा भागवत यांनी केलेले ऐतिहासिक भाषण म्हणजे मराठी सारस्वतातील सोनेरी पान ठरले. देशात असे वातावरण पेटत असताना बाहेर पण फ्रेंडस ऑफ इंडिया म्हणून जगातील लोकांना भारतात होत असलेला लोकशाहीचा खून आणि अत्याचार सांगितला जात होता. त्याचे नेतृत्व सुब्रमण्यम स्वामी सारखे विद्वान मंडळी करत होते. केदारनाथ सहानी, वाढता आंतरराष्ट्रीय दबाव आणि भारतातील पण सत्याग्रह यातून निवडणूक लढवून लोकांचा पाठिंबा आपल्यालाच आहे हे सिद्ध करू आणि मग पुन्हा आपला मार्ग सुरू करू या कल्पनेतून इंदिरा गांधी यांनी १९ महिन्यांनी निवडणुका घोषित केल्या.

रक्तहीन क्रांती : सुरुवातीला ही निवडणूक आपण सहज जिंकू अशी कल्पना इंदिराजी यांची होती. विस्कटले गेलेले विरोधी पक्ष एकत्र येणे अशक्य हा आडाखा होता. पक्षाचे कार्यकर्ते जरी जेल मधुन सुटले होते तरी अन्य सर्व संघटनांचे आणि संघाचे कार्यकर्ते जेल मध्येच होते. विरोधी पक्षाकडून प्रचाराला पैसा आणि कार्यकर्ते दोघे ही नाहीत त्यामुळे निवडणूक आपण जिंकणारच असा राजकीय होरा होता. पण जयप्रकाश जी, नानाजी, दत्तोपंत ठेंगडी आणि संघाचे सर कार्यवाह माधवराव

मुळे, आचार्य कृपलानी यांनी प्रयत्न करून सर्व पक्ष एकत्र आणली . जनता पक्ष स्थापन झाला. निवडणुका एकत्र लढवल्या. पहिलीच ऐतिहासिक सभा रामलीला मैदानावर झाली. सभेतील उस्फुर्त प्रतिसाद आणि गर्दी यांनी इंदिरा आणि चांडाळ चौकडी यांची झोप उडवून दिली. रामलीला मैदानावर अटलजी यांनी काढलेले तीन उद्गार सभेत टाळ्यांचा पाऊस पाडून गेले. बहुत मुद्दत के बाद मील रहे हैं! हे त्यातील पहिले वाक्य होते. अटलजी यांचे भाषण आणि लोकांचा प्रतिसाद या मुळे सभा ऐतिहासिक ठरली. आपल्या आजूबाजूला असणाऱ्या सज्जन आणि देशभक्त लोकांना विनाकारण तुरुंगात डांबले आहे याबद्दल लोकांच्या मनात प्रचंड क्षोभ होता. आणि तो संघटित केला होता संघाच्या असंख्य अनामिक स्वयंसेवकांनी.

संपूर्ण भारतात विशेषतः उत्तर आणि पश्चिम भारतात इंदिरा गांधी यांच्या विरोधात प्रचंड मोठी सुप्त लाट होती. पण सरकारच्या दडपशाहीला भिणारे आणि लाचार मंडळी खरे बोलत नव्हते. बाबू जगजीवनराम यांनी त्यात काँग्रेस पक्षाचा राजीनामा दिला यामुळे अधिकच भर पडली. आणि निवडणुकांचे निकाल एकदम धक्कादायक लागले. इंदिरा गांधी आणि संजय गांधी सहित सगळे आणीबाणी तील गुन्हेगार पराभूत झाले. जनता पार्टी पूर्ण बहुमताने सत्तेत आली. स्वातंत्र्या नंतर प्रथमच गैर काँग्रेस सरकार केंद्रस्थानी आले. सगळ्या मिसा बंधूंची सुटका झाली. देशद्रोही म्हणून तुरुंगात अटकेत पडलेले स्वातंत्र्य योध्दे म्हणून बाहेर आले! सगळीकडे त्यांच्या मिरवणुका काढून समाजाने स्वागत केले.

ताळेबंदः हा सगळा इतिहास झाला. पण यात देशाने काय मिळवले काय गमावले? का ह्या आठवणी पुन्हा काढायच्या? एव्हढ्या ४५ वर्षापूर्वी च्या घटनेचे महत्व काय? हे आठवणे अशासाठी गरजेचे आहे कारण इतिहास विसरल्या मुळे आमच्या देशाने खूप भोगले आहे. इतिहास विसरलो म्हणून पारतंत्र्यात गेलो. इतिहास विसरलो म्हणून इस्लामी राजवटी खाली आम्ही अत्याचार सहन करत राहिलो.

इतिहास विसरलो म्हणून आम्हाला आमच्या देशाची फाळणी पहावी लागली. इतिहास विसरलो म्हणून पुन्हा काश्मीर आणि पंजाब मध्ये दहशतवादाने डोके वर काढले. घराणेशाही, व्यक्तिवादी राजकारण, सामूहिक निर्णयाचा अभाव आणि विचार आचार यात भारतीय मूल्यांचा अभाव ही स्वातंत्र्या नंतर आम्हाला राजकारण्यांनी दिलेली देणगी होती. त्यातूनच भ्रष्टाचार आणि एकाधिकारशाही वृत्ती वाढीला लागली आणि यातूनच आणीबाणीचा जन्म झाला. त्या वेळेस काँग्रेस पक्षात एकही जण असा नव्हता जो या हुकुमशाही वृत्तीला विरोध करेल! आज दुर्दैवाने काँग्रेस जन हे विसरल्यामुळे काँग्रेस आणि एकूणच सगळे राजकीय पक्ष एका घरासाठी जन्माला आल्यासारखे झाले आहेत.जाहीरनाम्यात काही पण लीहले तरी अलिखित धोरण कुणाला तरी मुख्यमंत्री किंवा पंतप्रधान करण्यासाठी हे पक्ष जन्म घेतात आणि आणीबाणी सारखा इतिहास माहीत नसल्यामुळे किंवा विसरल्या मुळे पुन्हा पुन्हा ती चूक लोक करत राहतात.

आपल्याला मिळालेले पाहिले स्वातंत्र्य आणि त्याला लागलेले ग्रहण दूर करत मिळालेले दुसरे स्वातंत्र्य दोन्ही खूप किंमत देवून मिळाले आहेत. स्वातंत्र्याचा इतिहास काही प्रमाणात का होईना पाठ्यपुस्तकात शब्दबद्ध आहे पण आणीबाणीचा इतिहास आज च्या पिढ्यांना खूप कमी माहिती आहे.

आणीबाणीच्या लढ्यात असंख्य लोकांचा संसार उध्वस्त झाला. अनेकांचे आर्थिक कंबरडे असे मोडले की परत उभे राहणे मुश्किल झाले. केवळ मला नगर जिल्ह्यातील माहित असल्या मुळे, कोपरगाव येथील बडधे घरातील तीन कर्ते मुले जेल मध्ये गेले.

पुणंताब्यात चार वहाडणे जेल मध्ये गेले. नेवासा येथील तीन नळकांडे जेल मध्ये गेले. अशी उदाहरणं माहित आहेत पण देशभरात ही उदाहरणे होती. शेती दोन वर्ष पडीत झाली अशी असंख्य उदाहरणे देशभरात होती. काहींचे मेडिकल दुकान बंद झाले ते २० महिन्यांनी उघडले सगळी औषधं Expire झाल्यावर. काहींचे दवाखाने, काहींचे हॉस्पिटल बंद पडले. (मराठवाड्यात रुग्णसेवा द्यावी म्हणून सुवर्ण पदक मिळालेले माननीय अशोकराव कुकडे काका याना पण मिसा कायद्या खाली जेलमध्ये जावे लागले ज्यांना अलीकडे पद्मभूषण पुरस्कार मिळाला आणि भूकंप ग्रस्तांच्या कामापोटी फाय फाऊंडेशन ने गौरवले) अनेकांच्या खासगी नोकऱ्या गेल्या. काहींनी सत्याग्रह करायचे म्हणून नोकरीचे राजीनामे दिले. काहींना आयुष्य भरासाठी आजार पाठीमागे लागले.

जॉर्ज फर्नांडिस सारख्या माणसावर बडोदा डायनामाईट या घटनेच्या आरोपावरून जवळ जवळ फाशी देण्याची च तयारी

सुरू होती. भूमिगत कार्यकर्ते जे होते ते संघाचे प्रचारक होते. अनेक वेळा उपासमार. अनेक वेळा रात्री अपरात्री मिळेल त्या साधनाने प्रवास. अनेक वेळा आजाराकडे दुर्लक्ष करत अंगावर काढणे. अनेक मंडळींना कायमचे आजार पाठीमागे लागले. काहीजण यात गेले. पूजनीय बाळासाहेब देवरस याना जेल मधुन बाहेर आल्यावर पत्रकारांनी प्रश्न विचारला तुम्ही जेल मध्ये असताना हा लढा यशस्वी होईल याची तुम्हाला खात्री होती का? तुम्ही हे कसे साधले? पूजनीय बाळासाहेब म्हणाले अहो एक सरसंघचालक जेल मध्ये होता पणं बाहेर असंख्य सरसंघचालक भूमिगत होवून काम करत होते! त्यांनी निर्देश केलेल्या पैकी एक म्हणजे माधवराव मुळे!

माधवराव हे फाळणीच्या वेळेस तेथील हिंदू समाजासाठी कार्य करत होते. आणि नंतर आणीबाणीत लोकसंघर्ष समिती, सत्याग्रह, निवडणुकीत जनता पक्ष म्हणून निर्मिती या सर्व प्रक्रियेचे ते सूत्रधार होते. विदेशात इंडिया फॉर डेमोक्रसी, फ्रेंडस ऑफ इंडिया या संघटना स्थापन करण्याची प्रेरणा त्यांची. केदारनाथ सहानी, मकरंद देसाई आणि सुब्रमण्यम स्वामी याना लक्ष्मणराव भिडे यांच्याशी जोडून देत विदेशातून लोकशाहीसाठी केंद्र सरकार वर दडपण आणण्याचे काम भारतात राहून माधवराव यांनी केले. (येथे हे लक्षात ठेवावे लागेल आजसारखी आधुनिक साधने त्यावेळेस नव्हते) प्रकृतीची तमा न बाळगता त्यांनी काम केले. शेवटी एकदा डॉक्टरांनी बळेच १५ दिवस त्यांना विश्रांती घ्यायला लावली. मातृभूमी संकटात असताना मी कसा झोपून राहू शकतो? हे त्यांचे उद्गार होते. त्यावेळेस ते संघाचे सर कार्यवाह होते. आणीबाणी तील दगदग सहन न झाल्याने त्यांनी निवडणूक निकाल लागल्यावर आणि बंदी उठल्यावर माननीय राजेंद्रसिंह जी यांच्या कडे जबाबदारी सोपवली. त्यानंतर वर्षभरातच त्यांचे निधन झाले. जणू त्यांनी बाजीप्रभू सारखी खिंड लढवण्याची प्रतिज्ञा केली होती.

ह्या इतिहासाची आठवण यासाठी ठेवायची, कारण ज्यांनी देशावर दुसरे पारतंत्र्य आणले, ज्यांनी या सगळ्या काळात मूक साक्षीदार होणे पसंत केले अशांचे राजकीय किंवा पुढील पिढ्यातले वारसदार निर्लज्ज पणे संघावर टीका करताना संघाने स्वातंत्र्य लढ्यात काय केले हा प्रश्न विचारतात. घटनेची , संविधानाची मोडतोड करणारे आणि हे होत असताना त्यांच्या मांडीला मांडीला लावून बसणारे संघाला (ज्याने आपल्या असंख्य कार्यकर्त्यांचा बळी देवून संविधान वाचवले त्या संघटनेला) संविधानाचे मारेकरी ठरवतात.

पुरस्कार वापासी गँग चे पूर्वज याच घटना द्रोही कृत्याच्या वेळेस आणि होत असलेल्या, त्या वेळेस झालेल्या mob linching बाबतीत मूग गिळून बसले होते आणि आज हे जुन्या घटना सोयीस्करपणे विसरत आहेत. विचार स्वातंत्र्याच्या नावाने टाहो फोडणारे कला क्षेत्रातील पुरोगामी त्या वेळेस प्राण, किशोरकुमार किंवा देव आनंद यांच्यावरचा अन्याय विसरतात अहो एव्हढेच काय गुलजार स्वतः आंधी वरील बंदी विसरतात.

पूजनीय बाळासाहेब म्हणाले होते विसरा आणि क्षमा करा कारण हीच प्राकृत अवस्था आहे. प्रतिशोध कधी सकारात्मक नसतो त्यामुळे संघ नेतृत्व आणि स्वयंसेवक त्यानंतर लगेच स्वतःला रचनात्मक कामात गुंतून आपले भारतमाते प्रती कर्तव्य करण्यास लागले पणं ते संघटना आणि व्यक्ती म्हणून जरी विसरले तरी समाज म्हणून आम्ही हा इतिहास विसरणे म्हणजे खूप मोठी चूक ठरेल कारण इतिहास हा चुकांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी लक्षात ठेवायचा असतो. इतिहास हा प्रेरणा घेण्यासाठी लक्षात ठेवायचा असतो!

दुर्दैवाने आमच्या कडे इतिहास हा सत्याची मोडतोड करूनच मांडण्याची परंपरा निर्माण झाली त्यामुळे अर्वाचीन असो किंवा प्राचीन, मध्य युगातला असो किंवा आधुनिक आम्ही आमच्या पिढ्यांना खरा इतिहास कधी सांगितला नाही. आम्ही इतिहास हा व्यक्ती प्रेम किंवा व्यक्ती द्वेष या आधारावर लिहला. नायक नक्की केले आणि खलनायक पण! आणि मग इतिहासाची पटकथा बनली. इतिहास हा कधीच पटकथा नसतो हे ज्या समाजाला समजते तो समाज त्यातून शिकतो आणि उत्कर्ष पावतो. जपान, जर्मनी, इस्राएल यांस ते समजले ते उत्कर्ष पावले.

आज ह्या आठवणी मांडताना देशातील व्यक्तिवाद, घराणेशाही आणि भ्रष्टाचार याच्या विरोधात, लोकशाहीची मूल्ये ही जाती आणि प्रांत या पलीकडे जाऊन जपण्याची गरज आहे तरच लोकशाहीची जी मूल्ये आमच्या परंपरा आणि संस्कृतीने आम्हला दिली आणि पूजनीय बाबासाहेबांनी आधुनिक रुपात संविधानाच्या रुपात स्थापित केली ती मूल्ये टिकतील. आणीबाणीच्या कटू आठवणी एव्हढ्या च करता काढायच्या. या ऐतिहासिक लढ्यातील सर्व ज्ञात नेत्यांना आणि अज्ञात, अनामिक वीरांना भावपूर्ण आदरांजली!

**रवींद्र मुळे**

# स्वदेशी आकाश क्षेपणास्त्र
# भाग - १




नुकत्याच मे २०२५ मध्ये पाकिस्तानशी झालेल्या युध्दात ऑपरेशन सिंदूर या मध्ये भारताच्या हवाई सुरक्षा कवच ने अत्यंत उत्कृष्ट व चोख कामगिरी बजावली आणि जवळ जवळ सर्व पाकिस्तानी हवाई हल्ले हाणून पाडले, हवेच्या हवेतच नष्ट केले. बहुस्तरीय हवाई संरक्षण यंत्रणा (Multi-Layered Air Defence) या मध्ये स्वदेशी 'आकाश क्षेपणास्त्र' याने फारच महत्वाची कामगिरी बजावली आणि आपण सर्व जगाचे लक्ष वेधून घेतले. पाकिस्तानने दिल्लीच्या दिशेने सोडलेले 'फतेह-१' हे क्षेपणास्त्र अचुकतेने भेदून, नष्ट करून अत्यंत मोलाची भूमिका निभावल्याचे आपण पाहिले. एकाच वेळी अनेक 'शत्रुलक्ष्ये' याकडे बारकाईने लक्ष ठेऊन त्यातील सर्वात धोकादायक लक्ष्य यावर प्रथम हल्ला करणारी संगणकीय समंत्र प्रणाली यामुळे युद्धजन्य परिस्थितीत अनेक हवाई लक्ष्ये यांना अत्यंत परिणामकारकरित्या तोंड देण्याची क्षमता स्वदेशी आकाश क्षेपणास्त्राने जगाला दाखवून दिले की कोणत्याही हवाई हल्याचा यशस्वी प्रतिकार करण्याची क्षमता, मग ड्रोन, क्षेपणास्त्रे अथवा विमान, हेलीकॉप्टर अशा सर्व प्रकारचे हवाई धोके सक्षमतेने हाताळून विश्वसनीयरित्या हवेतल्या हवेतच उडवून लावले, भेदून टाकले. असे आकाश क्षेपणास्त्र याची माहिती या लेखामध्ये आपण घेणार आहोत. अत्यंत अचूक व बिनचूक पणे लक्ष्यभेद क्षमता ऑपरेशन सिंदूर च्यावेळी उपयोगाने सिद्ध झाली, आणि S-४०० या रशियन बनावटीच्या सुदर्शन क्षेपणास्त्रांबरोबर, बराक-८ बरोबर आणि भारतीय हवाई संरक्षक तोफा आकाशतीर यांच्या सह असणाऱ्या भक्कम अशा भारतीय हवाई सुरक्षा कवच (Bharatiya Multi-Layered Air Defence System) याचा अत्यंत महत्वाचा भाग असून, अत्यंत मोलाची भूमिका बजावत असणाऱ्या आकाश क्षेपणास्त्र व सहाय्यभूत असणाऱ्या स्वदेशी बनावटीच्या राजेन्द्र रडार यांच्या परस्पर अनुकूल भूमिकांमुळे वाढलेली जागतिक बाजारपेठेतील मागणी लक्षात घेण्याजोगी असून आत्मनिर्भर भारत अभियान ची मोठी उपलब्धी आहे.

आकाश क्षेपणास्त्राची डोळ्यात भरणारी वैशिष्ट्ये म्हणजे २५-३० किमी पल्ला असणारी, स्वनातीत (SuperSonic) वेगाने म्हणजे आवाजाच्या अडीच पट (Mach 2.5) वेगाने जाऊन अचूक लक्ष्यभेद, राजेंद्र रडार शी जोडल्याने एकाच वेळी चौसष्ट (६४) लक्ष्यांवर नजर ठेवून त्यातील सर्वात धोकादायक बारा (१२) लक्ष्यांवर अचूक व बिनचूक हल्ला करून शत्रूलक्ष्य हवेतच नष्ट करण्याची क्षमता. तिसरे म्हणजे अत्यंत गतिमानता (Mobility) व सुरक्षित पणे पूर्ण वाहनांचा जथ्था (Convoy) स्थान बदल करण्याची क्षमता, सर्वात महत्वाचे म्हणजे एका क्षेपणास्त्राची लस्यभेद शक्यता ८८% वरून दोन डागल्यावर ती ९८.५% पर्यंत वाढते.

अर्मेनिया बरोबर ६००० कोटींचा आकाश क्षेपणास्त्र विक्रिकरार व अमेरिकन डॉलर २०० मिलियन या फिलिपीन सरकार बरोबर होऊ घातलेला करार २०२५ मध्येच अपेक्षित आहे. भारताची स्थलसेना व वायूसेना यांच्या कडून संयुक्त पुरवठा २३३०० कोटीचा कार्यादेश देऊन आकाश क्षेपणास्त्रे सशस्त्र सेनादलांच्या सेवेत आहेतच. अजून दोन सैन्य वाहिन्या (Regiments) स्थापित करण्यात येत आहेत.

आकाश क्षेपणास्त्र हे डॉ. एपिजे अब्दुल कलाम यांच्या नेतृत्वात १९८०-९० च्या दशकात एकात्म निर्देशित क्षेपणास्त्र विकास कार्यक्रम (IGMDP) अंतर्गत विकसित करण्यात आलेल्या पहिल्या पाच क्षेपणास्त्रांपैकी एक आहे. आकाश हे मध्यम पल्ल्याचे जमिनी वरून डागण्यात येणारे व हवाई लक्ष्य भेदणारे (SAM) प्रकारचे क्षेपणास्त्र डॉ रामाराव प्रह्लाद यांच्या गटाने विकसित केले. मात्र आता त्यावेळचे आकाश क्षेपणास्त्र सेवानिवृत्त होऊन त्याच्या नवनवीन आवृत्या विकसित करण्यात आल्या व अत्याधुनिक व अद्ययावत तंत्रज्ञान विकसित करून बनवण्यात आल्या असून, आकाश-पी (Akash-Prime) आणि 'आकाश-एन् जी' (Akash New Generation) यांच्या यशस्वी चाचण्या होऊन ते सेवेत दाखल झाले आहेत. पहिल्या आकाश क्षेपणास्त्रापेक्षा बऱ्याच अत्याधुनिक यंत्रणा, अद्ययावत तंत्रज्ञान विकसित करून त्याच्या क्षमता अनेक पटींनी वाढवल्या आहेत. या क्षेपणास्त्राची सुरवाती पासूनची वाटचाल व माहिती आपण या पुढील भागामध्ये घेणार आहोत.


**काशीनाथ दामोदर देवधर**
**ज्येष्ठ शास्त्रज्ञ डीआरडीओ (निवृत्त)**

# जिहाद्यांनी केला विध्वंस, तर स्वयंसेवकांनी केली सेवाकार्ये

- **शोरकोटने रचला बलिदानाचा इतिहास - २७ ऑगस्ट १९४७**

फाळणीच्या वेळी शोरकोटची लोकसंख्या होती ६ हजार ५००. हिंदू मुस्लिमांची लोकसंख्या जवळजवळ समसमान होती. येथे संघाचे काम चांगले होते; त्यामुळे या भागात मुस्लिम लीगचा प्रभाव असूनही मुस्लिम हिंदूंची छेडछाड काढत नसत. १५ ऑगस्ट १९४७ उजाडला आणि सारेच चित्र पालटले. २० ऑगस्ट उजाडला. आसपासच्या गावांमधील मुस्लिम लीगच्या गुंडांनी अफवा पसरविली की, कोरवा या गावावर शिखांनी व संधवाल्यांनी हल्ला चढविला आहे. ते तेथील पठाणांना ठार करून शहराकडे चाल करून येत आहेत. संघाच्या नेतृत्वाखाली हिंदू एकत्र झाले. त्यांनी कडक मोर्चे बांधणी केली. ही तयारी पाहून गुलाम हुसेन नावच्या एका जमीनदाराच्या नेतृत्वाखाली एक शांतता समिती तयार करण्यात आली. परंतु हिंदूंना गाफील ठेवण्याची ही मुस्लिमांची चाल स्वयंसेवक आधीपासूनच ओळखून होते. २७ ऑगस्टला बाहेरच्या व आधीच जमा झालेल्या मुस्लिम गुंडांनी हल्ल्याची तयारी केली. पण संघवाले बधत नाहीत, हे पाहून त्यांनी काँग्रेसींना हाताशी धरले. काँग्रेसी त्यांच्या प्रस्तावाला भुलले. त्यांनी घोषित केले की, आज संध्याकाळी हिंदू-मुलिम संयुक्तरीत्या उत्सव साजरा करतील. झाले! इकडे स्वयंसेवक लोकांना तयार करत होते; तर तिकडे काँग्रेसी लोकांना दुकाने उघडायला सांगत होते! दुकाने उघडताच अचानक हत्यारबंद मुस्लिमांनी हल्ला केला. पण संघ स्वयंसेवक सावधच होते. पहिल्याच झटक्यात चार हल्लेखोर ठार झाले. पण आता बाहेरूनही हत्यारबंद मुस्लिम गुंडे येऊन मिळाले. लाठ्या काठ्यांनी त्यांच्याशी किती लढणार? एका पाठोपाठ एक असे, ४० स्वयंसेवक हुतात्मे झाले! हिंदूंनी जवळजवळ ५० महिलांची हत्या स्वहस्तेच केली.

पुन्हा एकदा हिंदूंनी धोका खाल्ला. त्यांना शिबिरात पोचविण्यात येईल, असे अश्वासन देण्यात आले. लोक बाहेरही आले. त्या सगळ्यांची कत्तल करण्यात आली. २०० महिलांचे अपहरण करण्यात आले. त्यातील १०० जणींना स्वयंसेवकांनी सोडविले. परंतु १०० जणींचा शेवटपर्यंत पत्ता लागलाच नाही. शोरकोटच्या ४ हजार हिंदूंमधील अवघे ३०० जण सुखरूप लुधियानाला शिबिरात पोचले.

- **धर्मांध-जिहादी मुस्लिमांची दगाबाजी-३ सप्टेंबर १९४७**

लायलपूर हे अखंड भारतातील एक अतिशय सुंदर असे शहर होते. गव्हाचे ते जणू कोठारच होते. शहरात ७० टक्के लोकसंख्या हिंदू-शीख होती व उरलेले मुस्लिम होते. येथे संघाच्या उत्तम शाखा चालत होत्या. पण राजनैतिक दृष्ट्या काँग्रेसच प्रभावी होती. काँग्रेसी सेक्युलॅरिझमचे चाहते होते. पाकिस्तानच्या स्वयंनिर्णयाच्या बाजूने कम्युनिस्टसुद्धा होते. ९ मार्च १९४७ पर्यंत परिस्थिती अत्यंत तणावपूर्ण झाली होती. रावळपिंडी, झेलम, मियांवाली इत्यादी ठिकाणांवर मुस्लिम लीगच्या जिहादी गुंडांनी योजनाबद्ध हल्ले करणे सुरू केले. जिहादी गुंडांनी शिखांचे पुढारी मास्टर तारासिंग यांचा संपूर्ण परिवारच जाळून भस्मसात केला होता. या इलाख्यातील विस्थापित हिंदू हजारोंच्या संख्येने लाहोर, सियालकोट, गुजरावाला व खुद्द लायलपूरला येऊ लागले. त्यांची सुरक्षा व सुविधा करण्यासाठी रा.स्व. संघाने पंजाब रिलीफ कमिटी बनविली होती. लायलपूरमधेसुद्धा जिल्हा संघचालक सेठ रामनारायण यांच्या कारखान्यात रिलिफ कमिटीचे शिबीर सुरू केले होते. जवळजवळ ५०० परिवारांची सगळी सोय तेथे करण्यात आली होती. निरंतर ५ महिने हे सेवाकार्य चालले.

शेवटी तो १९४७चा ऑगस्ट महिना आला. हिंदूंमध्ये घबराट पसरली. कारण संघाचे १५० स्वयंसेवक फगवाडा येथे संघ शिक्षा वर्गासाठी गेले होते. पण तेथील शिबीर वेळेपूर्वीच समाप्त करण्यात आले व स्वयंसेवक आपापल्या गावी परतले. संघाच्या भरवशावरच हिंदू १५ ऑगस्टनंतरही पाय रोवून तेथेच राहिले होते. ३ सप्टेंबरला डेप्यटी कमिशनरने एक शांतता समितीची एक बैठक बोलाविली. बैठकीला भरपूर हिंदू लोक उपस्थित होते. बैठक चालू असतानाच मुस्लिम लीगच्या गुंडांनी सशस्त्र हल्ला केला व कत्ले आम- चालू केले. शिखांचा तर हुडकून हुडकून ठार मारण्यात आले. स्टेशनजवळील मुस्लिमबहुल

वस्तीतही हिंदूंचे कत्ले आम चालू झाले. मास्टर लद्धाराम, ॲडव्होकेट पंडित दुर्गादास, लाला चत्रनदास, दौलतराम, सराफ लाला भवानीदास, सराफ सीताराम इत्यादी प्रतिष्ठित हिंदूंची हत्या याच गुंडागर्दीत झाली. गुंडांनी शहरातील प्रसिद्ध जॉर्ज स्टील प्रेसला आग लावली. एवढ्यात स्वयंसेवक पुढे सरसावले. ते स्वतःच सशस्त्र होऊन चौकाचौकात पहारा देऊ लागले. कार्यकर्त्यांनीसुद्धा एका खाकसाराचे एक दुकान जाळून भस्मसात केले. त्यामुळे मुस्लिमही भयचकित झाले. आता मृत्यू दिसू लागल्यावर कांग्रेसी संघ स्वयंसेवकांकडे रक्षेची भीक मागू लागले. अर्थात कोणताही भेदाभेद न करता स्व्यंसेवकांनी त्यांचे यथासंभव रक्षण केले. हिंदूसाठी आर्य कॉलेज व शिखांसाठी खालसा कॉलेजात कॅम्प्स बनविण्यात आले. हे कॅम्प्स शासनानेच बनविले होते. हिंदू व शीख बांधवांना सुरक्षिरपणे त्या कॅम्प्सपर्यंत आणण्याच्या कामी स्वयंसेवकांनी अपार साहाय्य केले. या शिबिरांचे व्यवस्थापन स्वयंसेवकांनीच बघितले. सर्व सरकारी हिंदू कर्मचारी, हिंदू पोलिस व अधिकारी जेव्हा जनतेला निराधार अवस्थेत सोडून भारतात आले तेव्हा, स्वयंसेवक काही क्षण सुन्न झाले. परंतु स्वयंसेवक भारतात प्रथम आले नाहीत. नारायणदास व रोशनलालसारखे स्वयंसेवक तर, कँप समाप्त झाल्यानंतरच १९४७च्या डिसेंबरमध्ये भारतात आले. आता पाकिस्तानात राहणेही संभव नव्हते, कारण पूर्व पंजाबातून आलेले मुस्लिम लोक हिंदूंना घराघरात घुसून, हुसकावून लावत होते व घरांचा कब्जा मिळवत होते. २३ डिसेंबर १९४७ नंतर जेव्हा भारतीय सेनेचे ट्रक हिंदूंना नेण्यासाठी आले तेव्हा, स्वयंसेवकांनी कोणालाही अडविले नाही. उलट भारतात येण्यासाठी पूर्ण साहाय्य केले. या ट्रक्समधून त्यांना लाहोर कॅम्प्समध्ये पाठविले जात असे. तेथेही स्वयंसेवकांचा बंदोबस्त असेच. लाहोरच्या दयानंद आर्य विद्यालयातील शिबिरातील देखभालीचे प्रमुख अमृतलाल व चूनीलाल हे दोन स्वयंसेवकच होते.

- **निर्वासितांच्या पुनर्वसनाचे कार्य**

१९४७ मधील फाळणीमुळे आलेल्या निर्वासितांच्या लोंढ्याला सहायता व त्यांचे संरक्षण करण्यात संघ स्वयंसेवकांनी जे मोलाचे कार्य केले ते अजरामर ठरले. सीमावर्ती क्षेत्रात तसेच दिल्लीसारख्या संवेदनशील भागात संघस्वयंसेवकांनी हिंदूंचे रक्षण करण्याचे मोलाचे कार्य केले. दिल्लीमध्ये त्या वेळी हिंदू सहायता समिती स्थापन झाली होती. त्या माध्यमातून विस्थापितांच्या पुनर्वसनाच्या कामी संघाने जबरदस्त मदतकार्य केले. बिडला मीलच्या समोर एक मोठे मैदान होते, तेथे विस्थापितांना राहण्यासाठी मोठा कँप उभारला. शहरातील सर्व धर्मशाळांमध्ये विस्थापितांकरिता राहायची जागा उपलब्ध करून दिली. दिल्ली रेल्वे स्टेशनसमोर, किशनगंज स्टेशन, चांदनी चौक, हवाई अड्डयासमोर कँप उभारले. या सर्व ठिकाणी निर्वासित हिंदू बांधवांची राहण्याची व्यवस्था होत होती. विस्थापित झालेल्यांची संख्या अगणित होती. प्रत्येक वेळेला कमीत कमी २५,००० लोकांचा लोंढा यायचा. अशा मदत कार्यामुळे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने सर्वांची मने जिंकली, विश्वास संपादला व तो एक श्रद्धेचा केंद्र बनला. जनतेनेही पुष्कळ साथ दिली. स्वतः बिडलाजींनी मदतीचा हात पुढे करून त्यांचे दोन प्रमुख अधिकारी कँपच्या देखरेखीकरिता नेमले. कोठेही काही कमी पडले तर, ते त्यांच्याकडून पुरवण्यात आले. विस्थापितांच्या राहण्या–जेवण्याची व्यवस्था करणे एवढ्यावरच न थांबता संघस्वयंसेवकांनी काहीजणांना रोजगारही उपलब्ध करून दिला. मुस्लीम मोहल्ल्यातील ओस पडलेली घरे हिंदू निर्वासितांना उपयोगी पडली. अशा प्रकारे विस्थापित हिंदूंची बहुमोल सेवा व त्यांचे संरक्षण करण्यात संघस्वयंसेवकांचे योगदान होणे हा एक जाज्वल्य इतिहास बनला.

- **मी सगळ्यात शेवटी भारतात जाईन!**

कमालिया हे लायलपूर जिल्ह्यातील एक छोटेसे गाव. तेथील रायसाहेब एक अत्यंत संपन्न गृहस्थ होते. त्यांची एक किल्लेवजा गढी होती. ते संघाचे एक चांगले कार्यकर्ता होते. मुसलमानांवरही त्यांनी उपकार करून चांगले संबंध ठेवले होते. त्यांच्या शेतावर काम करणारे मुस्लिमच होते. त्या गावचा स्टेशन मास्टर हा जरी मुस्लिम असला तरी, त्यांच्या उपकारांखाली दबलेला होता. त्याच्याशी त्यांचे अगदी घरगुती संबंध होते. स्टेशन मास्टरवर आत्तापर्यंत तरी जिहादचे भूत सवार झाले नव्हते.

कालांतराने परिस्थिती बदलली. सगळीकडे परिस्थितीच अशी बनली की, जीव वाचविण्यासाठी हिंदूंना भारतात पळून जाण्याशिवाय पर्यायच नाही. अशा वेळी त्या स्टेशन मास्तरने स्वतःच रायसाहेबांचा परिवार व त्यांचे सामान यांसाठी एक पूर्ण डबाच आरक्षित केला. सामानाचे एकूण ३०० नग झाले. रायसाहेबांची पत्नीच या सगळ्यांवर देखरेख करत होती. परंतु रायसाहेबांना जेव्हा ही गोष्ट समजली, तेव्हा ते म्हणाले, मी व माझा परिवार आत्ता भारतात जाणार नाही. मी संघाचा कार्यकर्ता आहे. आमच्या भरवशावर कमालियाचेच नव्हे तर, आसपासच्या

गावांचेही हिंदू लोक सुरक्षित राहत आहेत. त्यांना जर कळले की, रायसाहेब व त्यांचा परिवारच पळून गेला तर, त्यांचे मनोबल नष्ट होईल व सर्वत्र पळापळ होईल. मी आपल्या संघटनेला व समाजाला दगा दिला, असे म्हणून ते माझ्यावर थुंकतील. असे म्हणून आपल्या विश्वासातील अजीम भाई या माणसाला त्यांनी स्टेशनावर रवाना करून तसा निरोप स्टेशन मास्तरांना कळविला. स्टेशन मास्तर आश्चर्यचकितच झाले! स्टेशन मास्तर स्वतःच रायसाहेबांकडे आले व म्हणाले, रायसाहेब, आम्ही आपले मीठ खाल्ले आहे. आपल्याला प्रामाणिक सल्ला देत आहोत की, आपण आता जुन्या गोष्टी विसरा. मी मुसलमान आहे. मी त्यांची मानसिकता जाणतो. आता जर उशीर केलात तर, भारतात जाऊ तरी शकाल की नाही, हेही खात्रीपूर्वक सांगता येणार नाही. तर तुम्ही माझी विनंती स्वीकारा व सकाळच्याच गाडीने भारतात रवाना व्हा. परंतु रायसाहेबांनी काहीही ऐकले नाही. त्यांनी साफ साफ सांगून टाकले, मी संघाचा कार्यकर्ता या नात्याने इतरांना सोडून जाऊ शकत नाही. तो मुस्लिम स्टेशन मास्तर निराश होऊन गेला. परंतु जाताना एक अमिट श्रद्धाभाव घेऊनच गेला!

आणि खरोखरच जेव्हा कालांतराने रायसाहेबंचा परिवार जेव्हा भारतात आला, तेव्हा रिकाम्या हातानेच आला. परंतु आपल्या संघटनेच्या नावाला कलंक लावला नाही व आपले कर्तव्य निभावले, याचा रायसाहेबांना कोण आनंद झाला होता!

- **अत्याचार सोसले परंतु तोंड उघडले नाही!**

ओम प्रकाश खन्ना हे लाहोरच्या जनक नगरच्या प्रभात शाखेचे मुख्य शिक्षक होते. बॉंबस्फोटाच्या एका प्रकरणात त्यांना अटक करण्यात आली आणि लाहोरच्या कुप्रसिद्ध किल्ल्यात ठेवण्यात आले. दोन महिने त्यांच्यावर भीषण अत्याचार करण्यात आले. नरकतुल्य यातना देण्यात आल्या. त्यांचा एक डोळा जवळजवळ निकामी करण्यात आला. डोक्यावरील केस न केस उपटून काढण्यात आला. यामागील हेतू एकच होता की, संघासंबंधीची सर्व माहिती त्यांनी सांगावी. या वीराने दोन महिनेपर्यंत हे अत्याचार सहन केले, पण संघासंबंधी काहीही माहिती कळू दिली नाही. प्रत्येक वेळी त्याचे एकच उत्तर असे–

मुझे कुछ मालूम नहीं.

**डॉ. गिरीष आफळे**

◈ ◈ ◈

### विचारधन

आपल्या मनाची आणि शरीराची ऋशिर्शीशिपलू जुळली तरचं आपण जीवनात अशक्य गोष्टी शकय करू करून असामान्य यश मिळवून आनंदी, यशस्वी जीवन जगू शकतो. दिवसभरातले सर्व आव्हाने व्यवस्थित पार करण्यासाठी आपलं मन आणि शरीर दोन्ही स्वस्थ आणि एकमेकांसोबत उेपपशलींशव असायला पाहिजेत. आपण शरीराने ज्या क्रिया करत आहोत, त्या आपल्या मनाने सुद्धा स्विकारलेल्या असायला पाहिजेत. आपण घातलेले कपडे आपल्याला कसे दिसतात, ते योग्य प्रकारचे आहेत की नाही हे आपलं मन आपल्याला सांगत असतं. आपल्या मनाचा आवाज आपल्याला ऐकता आला पाहिजे. आरशासमोर उभे राहिल्यावर जर आपल्या मनाला आपला पेहराव खटकत असेल तरचे आपण घराबाहेर पडल्यावर मित्र-मैत्रिणींना, चार-चौघांना चार वेळा विचारतो आपण नीट दिसत आहोत की नाही पण आपल्या मनाला जर माहित असेल आपण व्यवस्थित कपडे घातलेले आहेत तर आपण इतरांना कधीच विचारणार नाही आपण कसे दिसत आहोत. प्रत्येक मनुष्याचं मन हे त्याला कोणताही निर्णय घेताना चांगली बाजु निवडव्याच सुचवतं असतं पण आपण चांगलं, योग्य न निवडता सोपं निवडत असतो. सोप्या गोष्टी निवडून आपण जीवन अवघड कठीण बनवतो. त्यापेक्षा कठीण गोष्टी निवडल्या तर जीवन जगणे सोपे आणि आनंदी होते. चोराला सुद्धा त्याचं मन सांगत असतं की चोरी करण चुकीचं आहे पण तो मनाचं ऐकत नाही आणि एक दिवस मोठा गुन्हेगार बनतो. चोरी करण चांगल, बरोबर आहे असं कोणत्याच मनुष्याचं मन त्याला सांगत नाही. आपल्या मनाचा आवाज आपल्याला ऐकता आला, स्विकारता आला तरचं जीवन आत्मविश्वासाने, आनंदी जगता येतं. मनाचा आवाज ऐकण्यासाठी पहाटेचा एक तास स्वतःसाठी द्यायला हवा.

# इतिहासातील पुराण आणि पुराणातील इतिहास लेखांक ७

चंद्रापासून निर्माण झालेल्या राजांना सोमवंशी राजे हे संबोधन आहे. या राजांना श्रीदत्तप्रभूच्या अनुग्रहामुळे इहपरलोकी सुखसमृद्धी प्राप्त झाली. भगवान श्रीकृष्ण हे याच वंशातील होत. ही वंशावळ देतांनाही पुढल्या पिढीतील नावे देत उतरंड नमूद करीत आहे. विष्णूपुत्र ब्रह्मदेव – मानसपुत्र अत्री त्यांच्यापासून चंद्र – त्याचा पुत्र बुध – पुरूरवा जो उर्वशीवर लुब्ध झाला. त्यांच्यापासून आयू, श्रुतायू, सत्यायू, रय, विजय, जय. त्यांना अनुक्रमे नहुष, वसुमान, श्रुतंजय, एक, भीम आणि अमित असे सहा जण. भीमापासून कांचन–होत्रक – जनू पुरू बलाक अजक कुश कुशांबू – गाधी गाधीकन्या सत्यवती व जावई ऋचीक – गाधीपत्नीला व सत्यवतीला अनुक्रमे ब्रह्मर्षी विश्वामित्र व जमदग्नी हे पुत्र झाले. जमदग्नीस पराक्रमी परशुराम ज्याने २१ वेळा पृथ्वी निःक्षत्रिय केली. पुरूरवा आयू क्षत्रवृद्ध सुहोत्रक काश्य, कुश, गृत्समद. गृत्समद – शुनक ऋषी. कश्याला काशी राष्ट्र दीर्घतमा रूघ्न – धन्वंतरी – केतू भीम दिवोदास द्युमान – कुवलयाश्व त्याची पत्नी मदालसा चार मुलांपैकी पहिले तीन आत्मज्ञानी व चौथा अलर्क हा राजपद भोगल्यावर दत्तप्रभूच्या कृपेने योगी झाला. त्याने ६६ हजार वर्षे राज्य केले होते. अलर्क संतती – सुनीथ. दुसरीकडे नहुष – ययाती, पत्नी देवयानी, दासी शर्मिष्ठा – पुरु – जनमेजय प्रचिन्वान प्रवीरक नमस्यू – चार्वघ्नी – सुधू– बहुगू संयाती अहंयाती रौद्राश्व व पत्नी अप्सरा घृताची दहा पुत्र पैकी एक ऋतेयू –रन्तिभार – सुधी, अप्रतिरथ, ध्रुव. अप्रतिरथापासून मेधातिथी, प्रस्कण्व हे महर्षी. सुधी रैभ्य– दुष्यंत व पत्नी शकुंतला – महान सम्राट व यज्ञकर्ता भरत – भरद्वाज – मन्यू – त्यास बृहत्क्षत्र, महावीर्य, नरगर्ग, जय असे पाच पुत्र झाले. नर संस्कृती रन्तिदेव व गुरू. इकडे गर्ग, क्षेत्र व महावीर्य यांच्यापासून ब्राह्मणवंश सुरू झाला. बृहत्क्षत्र – हस्ती पुरुमीढ, अजमीढ, द्विमीढ. अजमीढपासून बृहदिशू, नील, ऋक्ष. बृहदिशू – बृहद्धनू – बृहत्काय – जयद्रथ विशद सेनजित – रूचक. नील – शांती – सुखशांती पुरूज अर्क भार्यश्व – मुदगल् – दिवोदास मित्रेयू च्यवन सुदासक –सहदेव – सोमक – पृषत् द्रुपद कन्या द्रौपदी व पुत्र धृष्टद्युम्न. ऋक्ष – संवरण, कुरू जनू सुरथ – विदूरथ – जयसेन राधिक अयुत क्रोधन देवातिथी – ऋष्य – दिलीप – प्रतीप याला शंतनू, बाह्लिक, देवापी हे तीन पुत्र. बाह्लिक– सोमदत्त भूरी. शंतनू – पराक्रमी भीष्म. सत्यवतीला पराशराकडून अवतारी व्यास तर शंतनूपासून विचित्रवीर्य. ह्याच्या मृत्यूनंतर याच्या दोन्ही पत्न्यांना व्यासांपासून अंध धृतराष्ट्र व पांडू हे पुत्र झाले.

धृतराष्ट्र–गांधारीला शंभर पुत्र झाले जे युद्धात मारले गेले. पांडूपत्नी कुंतीस धर्मराज, भीम, अर्जुन तर दुसरी पत्नी माद्रीला नकुल व सहदेव. अर्जुनास अभिमन्यू –त्यास परीक्षित जो श्रीकृष्णांना प्रिय होता. परीक्षित – कलियुगात सर्पसत्र केलेला जनमेजय. यदूचे चार पुत्रांपैकी थोरला सहस्रजित शतजित हैहय – धर्म –नेत्र – कुंतीस – सोहंजी महिष्मान भद्रसेन – धनक –कृतवीर्य – दत्तभक्त सहस्रार्जुन. याचे अनेक पुत्र मारले गेले व पाच शिल्लक राहिले त्यातील एक मधू – वृष्णी. यदूपुत्र क्रोष्ट्र – वृजिनवान श्वोही रूशेकू – चित्र – योगी शशबिंदू. याला अनेक पुत्र पैकी एक पृथश्रवा – धर्म –उशना – रूचक – ज्यामघ विदर्भ क्रथ कुंतीस धृष्टी – निवृत्ती दशार्ह व्योम जीमूत विकृती – भीमरथ – नवरथ दशरथ शकुनी करंभी देवरात – देवक्षत्र – मधू – करवश अनू पुरूहोत्र आयू– सात्वत –भजमान – वृष्णी – विदूरथ शूर भजमान – शिनी –भोज – हृदीक शूर कृती वसुदेव भगवान श्रीकृष्ण. वृष्णीखेरीज इतर वंशात अंधक उग्रसेन – कंस आदी राजे झाले. यदूचे नल व अरी नावाच्या पुत्रांचे वंशही खूप विस्तारले. सोमवंशात एकंदरीत योगीराज, राजर्षी, पुण्यश्लोक अनेक झाले व श्रीकृष्ण बलराम हे महान अवतारी ठरले. बाकी श्रीकृष्ण व त्यांच्या गोतावळ्याची माहिती प्रचंड प्रमाणात उपलब्ध आहे. ती सांगण्याची आवश्यकता नाही. सोमवंशातही सत्ययुग, त्रेतायुग व द्वापारयुगातील व्यक्तींचा जास्त भरणा आहे. विविध युगांच्या सरासरी वयोमानानुसार या वंशानेही कोट्यावधी वर्षांचा प्रचंड काळ व्यापला आहे. वंशावळीतील

काही नावे पुन्हापुन्हा येतात कारण काही पिढ्यानंतर पूर्वजांची नावेच ठेवण्याची प्रथा प्रथमपासून चालू आहे.

तात्पर्य, सूर्यवंशी व सोमवंशी पिढ्यांच्या वंशावळी व इतिहास प्रदीर्घ आहे. दोन्हीतून भगवंतांनी अवतार घेतले व धर्माला आलेली ग्लानी रोखून पुनर्स्थापना केली. साक्षात दत्तावतारी श्री वासुदेवानंद सरस्वती स्वामींनी बारीक तपशीलासह दोन्ही वंशांची उतरंड वर्णिली आहे. वरील पुराणेतिहासातील घटना तुम्हाला सध्याच्या कोत्या तथाकथित विज्ञानवादी दृष्टीकोनातून अशक्यप्राय वाटत असणार. कारण तुम्ही त्रिमितीपलीकडे जायला तयार नाही. पण आईनस्टाईनने स्वतः चौथी मिती 'काल' अस्तित्वात असल्याचा वैज्ञानिक सिद्धांत मांडला आहे. यास्तव तुम्हाला काही गोष्टींबद्दल जास्त कुतूहल असू शकेल. या घटना प्रदीर्घ वयोमान, दिव्यदेह प्राप्ती, जे आपणास चमत्कार वाटतात त्यामागील विज्ञान, परग्रहवासी, अकल्पित वेगाने दूरवरील किंवा परग्रह किंवा ताऱ्यांकडे गमन, संदेशवहनशक्ती, अष्टसिद्धी, विनावाणी संवाद इत्यादी. या गोष्टी अनुभवलेली लाखो उदाहरणे असतील पण त्यावर मौन बाळगण्याच्या आचारसंहितेमुळे ते गुप्त राहिले. तथापि कलियुगी मनोवृत्तीच्या पाखंडी बुद्धीभ्रष्टांना ते सारे भाकड वाटते. असे अनेक विचारप्रवर्तक मुद्दे देतो व त्यांचे संदर्भलेखाच्या शेवटी देतो.

१) बळीराजाने सुतललोकात दहा कोटी वर्षे कल्याणकारी राज्य केल्यावर त्याला आत्मिक शांतीची ओढ लागल्याने तो सध्या पूर्णपणे तपस्येत गुंतला आहे.

२) नर्मदा परिक्रमेत चिरंजीव अश्वत्थामा अनेकांना भेटला आहे. महाभारताचा काळ ठरवतांना तथाकथित पुरोगामी बुद्धीभ्रष्ट मंडळी, ती कथा कपोलकल्पित म्हणोत, पण डॉ. वर्तकांनी ज्योतिष आधारावर तत्कालीन ग्रहस्थितीवरून तो काळ इसवी पूर्व ५५०० च्या आसपास असल्याचे दाखवून दिले आहे. म्हणजे अश्वत्थामा सध्या किमान साडेसात हजार वयाचा आहे.

३) चिरंजीव परशुराम ह्यांचा रामायणात उल्लेख आहे पण ते त्यापूर्वीच्या युगातही ज्ञात होते. डॉ. वर्तकांनी ज्योतिष आधारावर रामायणकाळ इसवी पूर्व ७००० च्या आसपास ठरवला आहे. परशुरामांनी कलियुगात मोजक्या लोकांनाच दर्शन दिले आहे. म्हणजे ते सध्या किमान दहा हजार वर्षांचे असणार.

४) नीळकंठ ओक या तरूण अभ्यासकाने रामायणातील अरूंधती ताऱ्याच्या स्थितीवरून अभ्यास करत रामायण काळ इसवी पूर्व १२००० च्या आसपास असा सिद्ध केला आहे. म्हणजे हनुमान व परशुराम यांची सध्याची किमान वये १४००० वर्षांपेक्षा जास्त आहेत.

५) चिरंजीव बिभीषण अद्याप लंकेवर राज्य करीत आहे. साक्षात हनुमानाने १३ व्या शतकात संत नामदेव व १७ व्या शतकात समर्थ रामदासस्वामी यांची बिभीषणाशी भेट घडवली आहे. त्या प्रसंगी निरोप घेतांना समर्थांनी रचलेली स्तुतीस्तोत्रे सध्या उपलब्ध आहेत.

६) आद्य शंकराचार्य आईचे अंत्यसंस्कार करण्यासाठी सिद्धीच्या सहाय्याने तत्काळ केरळच्या कालाडी ग्रामात पोहोचले होते.

७) वैभवशाली द्वारकानगरी पश्चिमेकडील समुद्रतळात अद्याप दिमाखात वसलेली आहे. राजाधिराज अक्कलकोट स्वामी समर्थांनी स्वतःच्या प्रिय भक्तास प्रत्यक्ष नेऊन दाखवली आहे. (क्रमशः)

**हणमंत नाडगौडा**

◈ ◈ ◈


**विश्व हिंदू परिषद व हिंदुबोधच्या कार्यास हार्दिक शुभेच्छा**

**डॉ. गायत्री सतिश गोरडे, नेत्रतज्ञ (MBBS, M S (Ophthamology) Fellowship in CORNEA)**

# शैक्षणिक संस्कार - भाग १

विद्यारंभ : लहान मूल त्याचे जन्मापासून शिकतच असते. सवयीने माता, पिता, आजी–आजोबा, भाऊ–बहिण यांना ओळखू लागणे, स्वतःचे नावाशी परिचय होणे, हाक ऐकू आली की तिकडे मान वळवणे, दृष्टी स्थिरावणे, हासणे–रडणे, झेप घेणे, कुशीवर वळणे, रांगणे, उभे रहाण्याचा प्रयत्न करणे हे सारे अत्यंत आनंदी विकसन होत असते. विशेषतः वारंवार ऐकलेले शब्द बोलण्याचा प्रयत्न करणे, पहिला शब्दोचार बहुधा मातेला आई म्हणणे किंवा एकच शब्द वारंवार म्हणणे सुरु होते. ते बोबडे बोल ऐकताना धन्य धन्य वाटते, ऐकणे व बोलणे जसे जसे स्पष्ट होत जाते तसतसे लिहीण्याची नक्कल करणे सुरु होते. दिसेल व हाताला येईल त्या वस्तूने कोठेही रेघोट्या मारणे सुरु झाले की लिहायला शिकवायची पालकांचीच घाई सुरु होते.

खरतर हाताच्या बोटांचे स्नायू पुरेसे सक्षम झाल्याशिवाय र्लिहायला मुळीच शिकवू नये असा वैज्ञानिक सल्ला सोयिस्करपणे दुर्लक्षित केला जातो. यामुळे मुलांचे लिखाण तर बिघडतेच पण लिहिण्याविषयी कंटाळा ही येतो हे सर्वांनीच लक्षात घेतले पाहिजे.

प्राथमिक शिक्षणाचा प्रारंभ म्हणजे विद्यारंभ. पाडवा किंवा दसरा अशा शुभमुहूर्तावर बालकांकडून पाटीवर सरस्वती पूजन करून घेतले जाई व त्याचे कडून ॐ, श्री, 卐 आदी शुभअक्षरे व सुचिन्हे लिहून घेणे श्री गणेशाय नमः हे किंवा तत्सम वाक्ये वारंवार लिहायला गिरवायला सांगणे व मंत्रपूर्वक आशीर्वाद देणे हा विधी म्हणजे 'विद्यारंभ.'

प्रत्येक प्रदेशात याचे स्वरुप व स्थान वेगवेगळे असते. मंदिरात, गुरुद्वारात, शाळेत वैयक्तिक किंवा सामूहिक स्वरुपातही हा विधी आजही केला जातो. वाळूमध्ये, धूळपाटीवर, तांदळाचे राशीवर ही अक्षरे गुरुंच्या हाताने बालकांकडून लिहवली जातात. एकूणच पालकांना व बालकांना लेखनाचे, लेखन साहित्याचे व शिक्षकांचे महत्त्व या संस्काराने लक्षात येते. यातूनच पुढे चित्रकला हस्तकला, शिल्पकलादी सृजनांचा परिचय कालांतराने होतो. सातत्य, चिकाटी व इतर सर्वांकडून वारंवार प्रोत्साहन व कौतुक मिळाल्यास सहजच एक प्रगल्भ व्यक्तिमत्व साकारते.

विद्यारंभ म्हणजे प्राथमिक शिक्षणाचा प्रारंभ तर उपनयन किंवा मुंज किंवा 'विद्याव्रत' म्हणजे माध्यमिक शिक्षणाचा प्रारंभ. मुलाला वेदाध्ययनासाठी गुरुंजवळ घेऊन जाणे म्हणजे 'उपनयन.' ब्रह्मचर्यव्रतांचा उपदेश गुरुंकडून केला जातो म्हणून या विधीला 'व्रतबंध' असेही म्हणतात. व्रतांचे बाह्यचिन्ह म्हणून 'मुंज' नावाच्या गवताची मेखला किंवा करदोटा बटूच्या कमरेला बांधला जातो म्हणून 'मौजीबंधन' असेही या विधीचे नाव आहे. हा संस्कार म्हणजे जणू त्या बटूचा दुसरा जन्मच आहे असे मनुस्मृती सांगते. सावित्री (गायत्री मंत्र) ही त्याची माता व आचार्य हा पिता होय.

असा विधी सर्व धर्मात दिसतो. ख्रिश्चन धर्मात बाप्तीस्मा, पारशी लोकात कुश्ती, मुसलमानात सुंता ही त्याचीच रूपे. यज्ञोपविताप्रमाणे काही बाह्य चिन्हेही देण्याची प्रथा दिसते. दुसरा जन्म म्हणजे द्विजत्व हे दीक्षेतून प्राप्त होते असे ख्रिश्चन धर्मग्रंथ बायबलही नमूद करते.

ब्रह्मचाऱ्याने दिवसा झोपू नये, युक्ताहार–विहार कटाक्षाने करावा. रात्री गादीवर झोपू नये, जमिनीवर झोपावे. थंड पाण्याने स्नान, ब्राह्ममुहूर्तावर जागरण आदी व्रतांनी बटूचे जीवन नियमबद्ध होते. हा संस्कार मुलींवरही केला जात असे. उपनयनाचा मुख्य आशय आयुष्याला दिशा देणे आहे. त्यासाठी जीवनध्येय निश्चत करणे, ध्येयप्राप्तीसाठी संकल्प करणे आहे. व्रताचरण करुन स्वतःला सक्षम बनवणे, अत्यंत एकाग्रतेने विद्याभ्यास करून आपला ब्रह्मचर्याश्रम कृतार्थ करणे आहे.

विद्याव्रत हा एक शैक्षणिक संस्कार आहे. सामान्य व सर्वमान्य शिक्षण म्हणजे माहितीचा भडीमार व कौशल्यवृद्धीद्वारे रोजगार सक्षम होणे एवढेच समजले जाते. पण वृत्तीघडण व प्रेरणाजागरण यांची या विचारात भर घातली तर शिक्षण अधिक समृद्ध होते. कौशल्यवाढीसाठी पुरेसा सराव व माहितीची वारंवार उजळणी केल्याने मन–बुद्धीवर उत्तम संस्कार होतात. प्रेरणाजागरणासाठी ध्येयदर्शन घडवावे लागते, असे ध्येय ज्यांनी गाठले त्यांचा सहवास व दृढ परिचयही अत्यंत उपयोगी असतो. विद्याव्रत व व्यक्तिविकसनाचा अधिक विचार पुढील लेखात...

**यशवंत लिमये**

# चालुक्य राजांची मंदिरे

महाराष्ट्रात वाकाटक राजवट मंदिरांची निर्मिती करत असताना उत्तर भारतात गुप्त राजांनी भव्य मंदिरे उभारण्यास सुरुवात केलेली होती. सुरुवातीस एका खोली स्वरूपात असलेली ही मंदिरे नंतर भव्य स्वरूपात बांधण्यात आली. विटा तसेच दगड वापरुन ही मंदिरे उभारण्यात येत होती. मंदिरांच्या बाह्य भागांवर हळू हळू विविध देवता कोरण्यास येऊ लागल्या होत्या. मंदिरांचे अलंकृतीकरण करण्यास सुरुवात झालेली होती. उत्तर भारतात गुप्त आणि महाराष्ट्रात वाकाटक राजांनी बांधलेल्या मंदिरांची कीर्ती साहजिकच दक्षिणेतील प्रबळ अशा बदामीच्या चालुक्य राजांवर गेली नसल्यास नवल ते काय.

सहाव्या शतकात उदयास आलेल्या या घराण्याने सध्याच्या कर्नाटकातील बदामी येथे आपली सत्ता प्रस्थापित केलेली होती आणि बदामीच्या आजूबाजूच्या परिसरात आपले राज्य वाढवण्यास सुरुवात केली होती. बदामीचे राजे हे शैव तसेच वैष्णव पंथाचे उपासक होते त्यामुळे सहाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात त्यांनी शैव तसेच वैष्णव पंथीय लेणी बदामी येथे खोदून घेतलेल्या होत्या. उत्तर भारतात प्रसिद्ध झालेल्या नागर शैलीतील मंदिरांच्या स्थापत्याची भुरळ बदामीच्या राजांना पडली आणि ऐहोळे येथे मंदिर स्थापत्याची शाळा सुरू झाली.

ऐहोळे हे तसे प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेले शहर. शहर बदामी चालुक्यांच्या मंदिर स्थापत्याच्या उत्क्रांतीचे साक्षीदार आहे. सहाव्या आणि सातव्या शतकात चालुक्यांनी ऐहोळे येथे सुमारे शंभरपेक्षा जास्त मंदिरांचे बांधकाम केले, ज्यामुळे हे ठिकाण मंदिर स्थापत्याच्या प्रयोगशाळेसारखे बनले. येथील मंदिरे प्रामुख्याने शैव, वैष्णव आणि जैन पंथांना समर्पित होती, ज्यातून चालुक्यांच्या धार्मिक सहिष्णुतेची झलक मिळते.

ऐहोळे येथील मंदिरे उत्तर भारतातील नागर शैली आणि दक्षिण भारतातील द्राविड शैली यांच्या संमिश्रणाचे उत्कृष्ट उदाहरण आहेत. सुरुवातीच्या येथील मंदिरांचे स्वरूप साधे होते जे आपल्याला लाडखान सारख्या मंदिरावरून समजून येते. यामध्ये एक छोटे गर्भगृह आणि त्यासमोर मंडप अशी रचना होती. परंतु कालांतराने मंदिरांचे स्थापत्य अधिक भव्य बनत गेले. येथील दुर्गा किंवा दुर्ग मंदिर हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. हे मंदिर नावाप्रमाणे दुर्गा देवीला समर्पित नसून, विष्णूंना समर्पित आहे आणि त्याची रचना अप्सिडल (अर्धवर्तुळाकार) स्वरूपाची आहे, जी बौद्ध चैत्यगृहांशी साम्य दर्शवते. या मंदिराच्या बाह्य भिंतींवर कोरलेली शिल्पे आणि अलंकरणे चालुक्य कालखंडातील कला आणि शिल्पकौशल्याची साक्ष देतात.

ऐहोळे येथे आत्ता जवळपास १०० मंदिरे वेगवेगळ्या समूहात बांधली गेली आहेत. यातील काही मंदिरे ही अगदी गावात आहेत तर काही गावाच्या बाहेर. मंदिरांची निर्मिती करताना चापाकृती, आयताकृती, शिखरयुक्त, सांधार, निरंधार अशा विविध मंदिरांच्या उपशैली बांधलेल्या दिसून येतात. उत्तर भारतात प्रसिद्ध आलेल्या नागर शैलीचा देखील वापर येथे केलेला दिसतो. एकाच ठिकाणी नागर आणि द्राविड अशा दोन्ही शैली बांधणारे कदाचित चालुक्य हे भारतातील एकमेव राजघराणे असावे. ऐहोळे येथील मंदिरे ही उत्तर आणि दक्षिण भारतीय स्थापत्य रचनेतील एक दुवा आहेत ज्यामुळे दक्षिण भारतात द्राविड शैलीतील मंदिरांचा मोठ्या प्रमाणावर विस्तार झाला.

ऐहोळे बरोबरच चालुक्य राजांनी पट्टदकल, महाकुट तसेच राजधानी बदामी येथे देखील मंदिरांची निर्मिती केली. यातील



पट्टदकल येथे निर्मिती केलेली मंदिरे ही कलेच्या दृष्टीने सर्वोत्तम आहेत. पट्टदकल ही राज्याभिषेकाची जागा. चालुक्यांच्या राजांनी आठव्या शतकात या जागेवर आपला अभिषेक करण्यास सुरुवात केली. पट्टद म्हणजे अभिषेक आणि कल्लू म्हणजे दगड. असा या नावाचा अर्थ आहे. या जागेवर भव्य मंदिरांची निर्मिती चालुक्य राजांनी केली. पट्टदकल इथल्या मंदिरांचे वैशिष्ट्य म्हणजे या ठिकाणी उभारलेली मंदिरे ही नागर आणि द्राविड अशा दोन्ही प्रकारातील आहेत. यातील नागर शैलीतील मंदिरे ही सातव्या शतकात उभारली असून पुढे द्राविड शैलीतील मंदिरे उभारलेली दिसतात. या जागेवरील सर्वात भव्य अशा विरुपाक्ष मंदिरावर आपल्याला कांची येथील कैलासनाथ मंदिराची छाप दिसते. पल्लव राजांनी कांची येथे उभारलेल्या मंदिरांसारखेच मंदिर आपल्या इथे असावे म्हणून याची निर्मिती करण्यात आली.

पट्टदकल येथे असलेल्या मंदिरातील वैशिष्ट्ये म्हणजे इथे असलेले खांब. या मंदिरातील खांब हे अतिशय अलंकृत आहेत आणि यातील खांबांवर शिव पुराण, पंचतंत्र, महाभारत, रामायण अशा विविध कथाप्रसंग कोरलेले दिसून येतात. यातील शिल्पकला ही चालुक्यांच्या इतर ठिकाणी असलेल्या मंदिरांपेक्षा सरस आहे.

चालुक्य काळात स्थापत्य हे शास्त्र पिढ्यानपिढ्या चालत आलेले असायचे. यामध्ये वडिलांकडून मुलाकडे असे ते शास्त्र शिकवले जायचे किंवा एखाद्या गुरुकडे जाऊन हे शास्त्र शिकावे लागायचे. भारतीय मंदिरांच्या इतिहासातील एक शोकांतिका म्हणजे ही मंदिरे कोणी बांधली हे आपल्याला विशेष समजत नाही. परंतु चालुक्यांच्या बाबतीत या मंदिरांवर आपल्याला वेगवेगळ्या स्थपतीची नावे आढळून येतात. या स्थपतीना या शिलालेखात सुत्रधार असे संबोधले आहे तसेच मांची या नावाची लोक आपल्याला सुत्रधार म्हणून दिसून येतात. उदाहरणार्थ आर्यमांची उपाध्याय नावाचे एक स्थपती होते त्यांनी बदामी येथे मळेगट्टी या ठिकाणी एक देखणे शिवालय सातव्या शतकात बांधले. तसेच ऐहोळे येथे हुच्चपाया मंदिराचा स्थपती हा नरसोबा नावाचा एक मनुष्य होता आणि लेखानुसार याच्यासारखा स्थपती हा उभ्या जंबुद्वीपात आढळणार नाही असे सांगितले आहे. इथे जंबुद्वीप म्हणजे भारत होय. जसे सध्या आपल्या देशात भारतरत्न वगैरे सारखे सर्वोच्च नागरी सन्मान समाजातील उल्लेखनीय व्यक्तिना दिले जातात तसे चालुक्यांच्या काळात हे सन्मान असे देखणे काम करणाऱ्या स्थपतीना दिले जात. हेच स्थपती मुर्ती कोरण्यात देखील तितकेच कुशल होते हे आपल्याला दिसून येते.

चालुक्य राजांची मंदिरे कर्नाटकात जरी असली तरी त्यांची सत्ता मात्र महाराष्ट्राच्या अनेक भागात होती आणि त्यांनी तिथे देखील मंदिरे नक्की उभारली असणार परंतु आज आपल्याला पुराव्या अभावी यावर ठोस विधान करता येत नाही. सध्याच्या काळात बदामी परिसर आणि आंध्रप्रदेशातील आलमपुर येथे आपल्याला चालुक्यांची मंदिरे आढळून येतात. ही सर्व ठिकाणे आवर्जून जाऊन पहावीत अशी आहेत. या ठिकाणी वेळ घालवण्यासाठी किमान २-३ निवांत दिवस हवेत म्हणजे इथे असलेले किल्ले, मंदिरे असे सर्व काही पाहता येते. या पुढील लेखात चालुक्य राजांचा पराभव करून गादीवर आलेले राष्ट्रकूट, त्यांनी उभारलेले कैलास लेणे आणि त्यांची महाराष्ट्रातील मंदिरे असे सर्व काही पाहू..!

**शंतनू परांजपे**

◈ ◈ ◈

**विचारधन**

समजा तुम्ही मार्गावर हरवला आहात, भरकटत आहात, वादळ, मोठा पाऊस, जोराचा थंडगार वारा सर्व आहे रस्त्यावर आणि तुम्ही निवारा शोधत आहात. शोधता शोधता तुम्हाला एक द्वार दिसते. हा दरवाजा खूप आकर्षित करणारा, स्वागत करणारा आणि आनंदित वाटतो आहे आणि याहून आकर्षित काहीही दिसत नाही, म्हणून तुम्ही त्या दरवाजाजवळ पोचता. गुरूच्या द्वारातून आत प्रवेश केलात, की तुम्ही स्वगृही पोचला आहात. इथून तुम्हाला जग एका वेगळ्याच अर्थाने पाहता येते. या दरवाजाच्या आतूनही तुम्हाला बाहेरच्या वादळाचा आणि मुसळधार पावसाचा आवाज येतो, पाऊस दिसतो. पण, आता त्यामुळे तुम्ही बेचैन होत नाही. इथे आत सुरक्षेची ऊबदार जाणीव होते. इथून जग भयानक वाटत नाही, ते प्रेम, साहाय्य आणि करुणेने भरलेले दिसते. इथे आल्यावर तुमचे भय अदृश्यच होते. गुरूची आवश्यकता का असते? जेव्हा तुम्ही गुरूच्या नजरेने हे सर्व जग पाहू लागता, तेव्हा तुम्ही गुरूपर्यंत पोचला आहात, असे समजावे.

# कशासाठी हवा आहे भिकाऱ्यांचा डॉक्टर?

१. लोक चोखून आंबा खातात, आंब्याचा गर खरवडून खरवडून पातेल्यात काढून आमरस करतात, शेवटी उरते ती कोय... तिला उकिरड्यावर फेकून देतात! तसंच काही लोकांचं आयुष्य असतं, आपल्या पोरा पोरींसाठी आई-वडील आंबा होतात, पोरं सुना नातवंड या आंब्याचा गर आपल्या सोयीने खरवडून घेतात, आणि त्यांचा उपयोग संपल्यानंतर, ऊरलेली बिनकामाची कोय म्हणून आई-बाबांना उकिरड्यावर, रस्त्यावर, गटारात फेकून देतात. आता कोयीचा काय उपयोग? डॉ अभिजीत सोनवणे, ज्याला भिकाऱ्यांचा डॉक्टर म्हटलं जातं..

तो अभिजीत, पोरांनी उकिरड्यावर आणि गटारात टाकलेल्या या वृद्ध कोयी उचलतो. त्यांना नमस्कार करून अंघोळ घालतो. रस्त्यावर पडलेल्या वृद्ध आजी आणि आजोबा यांना घातलेली आंघोळ हाच नकळतपणे अभिषेक होऊन जातो!

आता त्याला कुठल्याही मंदिरात, अभिषेक करण्याची गरज पडत नाही. अभिजीत या कोयी पुन्हा जमिनीत रुजवतो.. मरण्याअगोदरच, मेलेल्या या वृद्ध कोयींना, जगण्याची आशा दाखवून, पुन्हा कोयींना जमिनीत रुजवण्याचा प्रयत्न करतो, खतपाणी घालतो. पुन्हा आंबा तयार करण्याचा प्रयत्न करतो.! आईबाप पोरांना जन्माला घालत असतात. अभिजीत आणि त्याची बायको डॉ मनीषा यांनी मिळून ८० आजी आजोबांना पुन्हा जन्माला घातलं आहे.

काल रस्त्यावर पडलेले हे आजी आजोबा कोय म्हणून नाही. तर आज हापूसचा आंबा म्हणून सन्मानाने जगत आहेत!

अशा रस्त्यावरील सर्व आजी-आजोबांना, सुरक्षित अशा ठिकाणी ठेवले आहे आणि डॉ अभिजीत आणि डॉ मनीषा ह्या वृद्ध आजी आणि आजोबांचे मुलगा सुन आणि नातवंडे झाले आहेत. जेव्हा हे आजी आजोबा वयोमानानुसार देवाघरी जातात, तेव्हा त्यांचे अंतिम संस्कार मुलगा आणि सून म्हणून डॉ अभिजीत आणि डॉ मनीषा करतात! अशा वृद्धांना जर रस्त्यावरून सुरक्षित हलवले नाही तर या आई बाबांचा रस्त्यावरच तडफडत मृत्यू होतो. मूल दत्तक घेण्याची प्रथा आहे. पण डॉ अभिजीत आणि डॉ मनीषा आईबाप दत्तक घेतात.

२. मोठ्या माणसांच्या तुलनेत लहान मुलांना भीक जास्त मिळते. आणि म्हणून लहान मुलांना त्यांचे पालकच भीक मागायला लावतात, काही गुन्हेगार मंडळी लहान मुलांना पळवून भीक मागायला लावतात. अशा मुलांचे लैंगिक शोषण सुद्धा होते. अर्थातच शाळेचा किंवा इतर संस्कारांचा अशा मुलांच्या बाबतीत प्रश्नच येत नाही. पुढे ही मुले मोठी झाल्यानंतर, लहानपणी मिळत होती तितकी भीक मिळत नसल्यामुळे, गुन्हेगारी मार्गाकडे वळतात. शे पाचशे रुपयांसाठी कोणतेही कृत्य करायला ते तयार होतात. इथूनच नवे गुन्हेगार जन्माला येतात. सुरुवातीला निर्मळ असणारं हे पाणी पुढे गटाराला जाऊन मिळतं. डॉ अभिजीत यांनी अशा ५२ मुलांना दत्तक घेतलं आहे. गुन्हेगारी मार्गाकडे



**मध्यरात्री सूर्य दाखवणारे भिकाऱ्यांचे डॉ. सोनावणे दांम्पत्य हे नरसेवा नारायण सेवा या भावनेने पुण्यात गेली दहा वर्षे अतिशय प्रेरणादायी सेवाकार्य करत आहेत. जरूर वाचा त्यांचा परिचय त्यांच्याच शब्दात**

वळणार असलेल्या अशा मुलांपैकी एक यावर्षी पोलीस डिपार्टमेंट मध्ये जाईल, दुसरा मुलगा कॉम्प्युटर सायन्स करतो आहे, एक मुलगी एमबीए करते आहे, आणि एक मुलगी पुढच्या वर्षी आयएएस ला बसणार आहे. अशी अनेक उदाहरणे देता येतील.

५२ हा आकडा कागदावर छोटा वाटत असला तरी ५२ मुलं शिकल्यानंतर आपल्या कुटुंबाला भीक मागू देणार नाहीत, म्हणजेच ५२ कुटुंबे आपोआप समाजाच्या मुख्य प्रवाहात येतील.

३. रक्तदान करा, मतदान करा अशा राष्ट्रहिताच्या बाबी आजही सुशिक्षित समाजाला सांगाव्या लागतात. अशा परिस्थितीत, डॉ अभिजीत सोनवणे भीक मागणाऱ्या धडधाकट लोकांना घेऊन जनकल्याण ब्लड बँकेमध्ये जातात आणि त्यांना तिथे रक्तदान करायला लावतात. भीक मागणाऱ्या समाजाने केलेल्या रक्तदानामुळे कोविड काळात ५६७ लोकांचे प्राण वाचले आहेत. आजही हा उपक्रम सुरू आहे. भीक मागणारे लोक रक्तदान करतात हा जगातला एकमेव प्रकल्प असेल.

भीक मागणारे लोक, डॉ अभिजीत सोनवणे यांच्या माध्यमातून, मतदान करा म्हणून अनेक सोसायटी समोर जाऊन जनजागृती करतात.

डॉक्टरांनी शंभर आज्यांची मिळून एक स्वच्छता टीम तयार केली आहे. या टीम मार्फत पुण्यातील सार्वजनिक भाग स्वच्छ करून त्यांना संस्थेतर्फे पगार दिला जातो.

एकावेळी शंभर वृद्ध भिक्षेकरी येऊन एखाद्या भागाची स्वच्छता करतात हा सुद्धा जगातला पहिला प्रकल्प असेल.

स्वच्छता टीममधील हे शंभर वृद्ध भिक्षेकरी पंतप्रधानांनी राबविलेल्या स्वच्छता अभियानाचे पुणे जिल्ह्याचे ब्रँड अँबेसिडर आहेत, यापेक्षा कौतुकाची आणखी कोणती गोष्ट असू शकते...

४. डॉक्टरांनी रस्त्यावर भीक मागणाऱ्या २९० लोकांना छोटे छोटे व्यवसाय सुरू करून देऊन स्वयंपूर्ण केले आहे. आज ते भिक्षेकरी म्हणून नाही तर सन्मानाने गावकरी म्हणून जगत आहेत.

डॉ अभिजीत सोनवणे यांना डॉक्टर झाल्यानंतर त्यांच्या प्रतिकूल परिस्थितीमध्ये एका भीक मागणाऱ्या आजोबांनी मदत केली होती. या मदतीमधून उतराई होण्यासाठी आणि त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी म्हणून डॉ अभिजीत सोनवणे यांनी आंतरराष्ट्रीय संस्थेतील पाच लाख उत्पन्नाची नोकरी सोडून हे काम २०15 सालापासून सुरू केले आहे.

ते जे काही करतात ते भिक मागणाऱ्या लोकांसाठी... आणि म्हणून लोक त्यांना भिकाऱ्यांचे डॉक्टर असं म्हणतात.

डॉक्टर सोनवणे म्हणतात, सहज रस्त्यावरून चक्कर मारली तर पाच पन्नास एमबीबीएस, बीएएमएस, बीएचएमएस असे डॉक्टर सापडतील. परंतु भिकाऱ्यांचा डॉक्टर ही पदवी संपादन केलेला जगातला मी एकमेव डॉक्टर आहे, आणि याचा मला सार्थ अभिमान आहे. लोकांनी मला बहाल केलेली ही पदवी, आम्ही भिंतीवर नाही... हृदयात घेऊन फिरतो... !

**डॉ. अभिजीत सोनावणे**

◈ ◈ ◈

**विचारधन**

एकमेकांचे म्हणणे आधी नीट पूर्णपणे ऐकून घ्या. कारण अनेकदा बोलायचे वेगळेच असते. मात्र त्याचा अर्थ वेगळाच घेतला जातो. त्यामुळे गैरसमज वाढतात आणि वादाला तोंड फुटते. दुसऱ्याच्या जागी जाऊन एकमेकांचा विचार करा. त्यामुळे समोरच्याची बाजू नीट समजेल. राग, चिडचिड कमी होईल. बंधने कमी करा, खूप जण नात्यात जोडीदारावर बंधन ठेवत असतात. बंधनामुळेही कर्च कधी कधी नाते नकोसे होऊ लागते. जर तुम्ही अशी बंधने घालत असाल, तर त्या बंधनातून मुक्त होण्याचा समोरच्याचा मानस असतो. त्यामुळे अशी व्यक्ती जोडीदाराच्या कोणत्याही गोष्टीला कंटाळत असते. जोडीदाराला ही व्यक्ती आपल्या हाताखाली किंवा शब्दाबाहेर नाही असे वाटते; पण हा तुमचा गैरसमज आहे, असे काहीही नाही. ती व्यक्ती तुमच्या बंधनातून मुक्त होण्याचा मार्ग शोधत असते. यात काहीही शंका नाही. बरेचदा समोरच्याचा कंटाळा येणे यामध्ये आपलीही काहीतरी चूक नक्की असते. जर तुम्हाला असा कंटाळा तुमच्या जोडीदाराचा येत असेल, तर तो कोणत्या कारणामुळे येतो हे ओळखा. खूप जणांना आपल्या कोणत्याही चुका दाखवल्या की, समोरची व्यक्ती नकोशी होऊन जाते. पण, असे का होते ते ओळखण्यासाठी तुम्ही आधी आपण काय चुकलो हे देखील माहीत करून घ्या.

# स्मरण क्रांतिवीरांचे



**गणेश दामोदर तथा बाबाराव सावरकर**

**(जन्म : १३ जून १८७९ – मृत्यू : १६ मार्च १९४५)**

**सशस्त्र क्रांतिचे पुरस्कर्ते असलेले बाबाराव सावरकर हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक साहसी व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या ग्रंथसंग्रहात इतिहास, राजकारण, राज्यशासन, भाषा, सैन्यव्यवहार, धर्म, तत्त्वज्ञान, चरित्रे, संघटनशास्त्र, कला अशा अनेकविध विषयांची अनेक पुस्तके होती. आपले कनिष्ठ बंधू विनायक सावरकर यांच्या क्रांतिकार्यात बाबाराव सक्रिय होते. चतुरस्त्र व्यक्तिमत्व असलेल्या बाबाराव यांनीही स्वातंत्र्यासाठी 'अंदमानच्या काळ्या पाण्याची चव चाखली'.**

देशाभिमानी असलेले बाबाराव लहानपणापासून हुशार, अभ्यासू, संघटन कुशल, सततोद्योगी होते. तसेच बुद्धिबळ, आट्यापाट्या, विटी–दांडू, धनुष्य–बाण चालविणे अशा विविध खेळात ते पटाईत होते. वडील दामोदरपंतांच्या देखरेखीखाली बाबाराव तलवार आणि बंदूकही उत्तम प्रकारे चालवायला शिकले. घरची परिस्थिती आणि कौटुंबिक जबाबदारीमुळे बाबारावांचे शालेय शिक्षण मॅट्रिकच्या आतच उरकले. पण योगविद्या, वैद्यकाचा नाद असल्याने त्या अनुषंगाने त्यांनी अनेक पुस्तकांचे वाचन केले. ते स्वतः अनेक प्रकारची औषधेही तयार करीत असत. फलज्योतिष, हस्त सामुद्रिक, मंत्रशास्त्र, योग, वेदांत अशा शास्त्रांचा सखोल अभ्यास त्यांनी केला. त्यांच्या ग्रंथसंग्रहात इतिहास, राजकारण, राज्यशासन, भाषा, सैन्यव्यवहार, धर्म, तत्त्वज्ञान, चरित्रे, संघटन शास्त्र, कला आदी अनेकविध विषयांची अनेक पुस्तके होती. त्यांचे सखोल वाचन बाबारावांनी केले होते. ते स्वतः चांगले गात. तसेच तबला आणि सतार वाजवत होते.


सावरकर कुटुंबीय नाशिक येथे निवासाला असताना आईच्या निधनानंतर १८९६ मध्ये बाबारावांचे लग्न झाले. लग्नानंतर त्यांनी पत्नीचे नाव यशोदा ठेवले. बाबारावांचे धाकटे बंधू विनायक तथा तात्यारावांसह अनेकजण त्यांना येसू वहिनी म्हणत. येसू वहिनी या तात्याराव आणि नारायणरावांच्या प्रेरणास्थान होत्या. विनायक आणि मित्रांनी १८९९ च्या नोव्हेंबर महिन्यात 'राष्ट्रभक्त समूह' नावाची एक गुप्त संस्था स्थापन केली. सुरुवातीला बाबारावांना या संस्थेबद्दल काहीच माहिती नव्हती. मात्र, नंतर त्यांना माहिती मिळाल्यावर त्यांनी संस्थेसाठी काम सुरू केले. या गुप्त संस्थेत तरुणांना प्रवेश देण्यापूर्वी त्यांची मानसिक तयारी पाहण्यासाठी १ जानेवारी १९०० या दिवशी 'मित्रमेळा' नावाची संस्था उघडपणे सुरू करण्यात आली. बाबाराव मित्रमेळा संस्थेचे कार्यवाह होते.

'मित्रमेळा' संस्थेतर्फे गणेशोत्सव, शिवजयंतीसह इतर थोरांची जयंती साजरी करणे, प्रकट भाषणांचे आयोजन करणे, कविता, पोवाडे याद्वारे तरुणांना क्रांतिकार्यासाठी प्रोत्साहन देण्याचे काम हाती घेण्यात आले. संस्थेतील तरुणांना मार्गदर्शन मिळावे म्हणून बाबारावांनी लोकमान्य टिळकांसह क्रांतिकारी विचारांच्या अनेकांना वेळोवेळी नाशिक येथे आमंत्रण दिले. त्यांच्या प्रयत्नांमुळेच नाशिक हे राष्ट्रीय चळवळीचे केंद्र म्हणून ओळखले जाऊ लागले. १९०४ मध्ये मित्रमेळाची गुप्त संस्था म्हणून 'अभिनव भारत' संस्था स्थापन करण्यातही त्यांचा पुढाकार होता. अभिनव भारत ही जहालवाद्यांची संस्था होती. भारताला पूर्ण स्वातंत्र्य हाचत्यातील लोकांचा ध्यास होता. त्यासाठी काहीही करण्याची तयारी असलेल्या तरुणांनाच त्यात प्रवेश दिला जात असे. या दोन संस्थांशिवाय बाबारावांच्या पुढाकारानेच १९०३ मध्ये मित्रसमाज नावाची विद्यार्थ्यांची संस्था आणि १९०५ मध्ये 'आत्मनिष्ठ युवती संघ' नावाची स्त्रियांची संघटना स्थापन करण्यात आली. या सर्व संस्था आपापल्या कार्यक्षेत्रात स्वदेशीचा पुरस्कार करणाऱ्या होत्या. यातील निवडक मंडळींनाच अभिनव भारत या संघटनेशी जोडले जात असत.

२० जुलै १९०५ या दिवशी ब्रिटिश राज्यकर्त्यांनी ‘वंग भंगची’ अधिकृत घोषणा केली. त्यानंतर त्याच्या विरोधार्थ देशभरात सर्वत्र विदेशीचा बहिष्कार–विदेशी कपड्यांची होळी, स्वदेशीचा पुरस्काराची चळवळ सुरू झाली. बाबाराव नाशिक येथून आणि तात्याराव पुणे येथून ही चळवळ चालवीत होते. बाबारावांच्या पुढाकाराने. गुप्तपणे सशस्त्र क्रांतीचा प्रचारही सुरू करण्यात आला. ब्रिटिश सरकारी. यंत्रणा बाबारावांच्या पाळतीवर होती. त्यातच ते काही कामानिमित्त मुंबईला गेले आणि क्षुल्लक वादात सापडले. त्यावरून चौकशी करून बाबांना २८ फेब्रुवारी १९०९ या दिवशी मुंबईत अटक करण्यात आली. नंतर त्यांना नाशिकला नेण्यात आले. ब्रिटिश पोलिसांना बाबारावांच्या घरी स्वातंत्र्य चळवळीला पोषक ठरणारे मात्र, ब्रिटिश राजवटीच्या दृष्टिने आक्षेपार्ह ठरणाऱ्या गोष्टी आढळल्या. त्यांच्यावर खटला दाखल करण्यात आला. ८ जून १९०९ या दिवशी बाबारावांना जन्मठेपेची–काळ्या पाण्याची शिक्षा ठोठाविण्यात आली. त्यांच्या सर्व मिळकतींच्या जप्तीचा आदेश देण्यात आला. काळ्या पाण्याची शिक्षा अंदमान येथे भोगायची होती. बाबारावांनी उच्च न्यायालयात फेर निर्णयासाठी याचिका दाखल केली. पण त्याचाही निकाल त्यांच्या विरुद्धच लागला आणि जुनी शिक्षा कायम करण्यात आली. बाबारावांना जन्मठेपेची शिक्षा झाल्याचे लंडनमध्ये असलेल्या भारतीयांना समजले. त्यामुळे संतापलेले विनायक आणि सहकाऱ्यांनी ब्रिटिशांना अद्दल घडवण्याबाबत विचार सुरू केला. त्याच सुमारास मदनलाल धिंग्रा याने वंगभंगसाठी जबाबदार असलेल्या कर्झन वायलीवर १ जुलै १९०९ ला गोळ्या झाडून त्याचा वध केला. तर दुसरीकडे नाशिकमधील अभिनव भारतचे सदस्य गुप्तपणे एकत्र आले. अनंत कान्हेरे, अण्णा कर्वे आणि विनायक देशपांडे यांनी २१ डिसेंबर १९०९ या दिवशी बाबारावांच्या शिक्षेस जबाबदार असलेला नाशिकचा कलेक्टर ए एम टी जॅक्सन याच्या निरोप समारंभासाठी विजयानंद थिएटरमध्ये आयोजित केलेल्या शारदा या नाटकाच्या प्रयोगाच्या वेळी जॅक्सनचा वध केला. काळ्या पाण्याची शिक्षा भोगण्यासाठी १९११ मध्ये बाबारावांना अंदमानला पाठविण्यात आले. अंदमान येथील सश्रम कारावासाची शिक्षा अतिशय कठोर स्वरूपाची होती. बाबाराव रोज मरण यातना भोगत होते. त्यातच बंधू विनायक यांनाही काळ्या पाण्याची शिक्षा झाली आणि त्यांचीही रवानगी अंदमानला करण्यात आली. १९२१ मध्ये दोन्ही सावरकर बंधूंची अंदमान मधून सुटका झाली. पण एकूण शिक्षेचा काळ संपला नसल्याने त्यांना भारतातील विविध ठिकाणच्या तुरुंगात पाठवण्यात आले.

बाबारावांची तब्येत साथ देत नाही असे पाहून घाबरलेल्या ब्रिटिशांनी १९२२ मध्येत्यांची शिक्षा संपल्याचे घाईने कळविले. तुरुंगातून बाहेर पडल्यानंतर प्रकृती साथ देत नसतांनाही बाबारावांनी आपले पूर्वीचे कार्य नव्या जोमाने सुरू केले. त्यांचे लिखाण, वाचन, प्रकाशनाचे कामही वाढले. अनेक तरुणांना प्रोत्साहन देऊन सशस्त्र क्रांतीशिवाय पर्याय नसल्याचे पटवून दिले. क्रांतिकार्य अव्याहतपणे सुरू असतांनाच १६ मार्च १९४५ या दिवशी बाबाराव सावरकर यांनी सांगली येथे अखेरचा श्वास घेतला. सांगली शहरातील गावभाग येथे नदी किनारी एका इमारतीत बाबाराव सावरकर यांचे एक स्मारक आहे. स्मारकामध्ये क्रांतीवीर बाबाराव सावरकर यांची पंच धातूने बनलेली भव्य मूर्ती आहे.

~~~



### राष्ट्रपुरुष डॉ. हेडगेवार

**होय, मी डॉ. केशव बळीराम हेडगेवार म्हणतो, हे हिंदूराष्ट्र आहे!, असे ठणकावून सांगणारे डॉ. हेडगेवार यांनी देशाचे स्वातंत्र्य आणि अखंड हिंदूराष्ट्रासाठी सर्वस्व समर्पण केले. क्रांतिकारी प्रवृत्तीच्या डॉ. हेडगेवार यांच्या मनात ब्रिटिश राज्यकर्त्यांबद्दल तिरस्कार होता. शाळेत तपासणीसाठी आलेल्या इंग्रज इन्स्पेक्टरचे वंदे मातरम्च्या जयघोषाने स्वागत करणाऱ्या डॉ. हेडगेवार यांनी १९२० मध्ये नागपूर येथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात प्रथमच पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मांडला होता. बलशाली हिंदूराष्ट्राच्या निर्मितीसाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सुरू केल्यानंतरही ते स्वातंत्र्यलढ्याला सक्रिय पाठिंबा देत राहिले. विविध आंदोलनांत सहभागी होऊन देशासाठी तुरुंगवासही भोगला.**

संघाच्या शताब्दी वर्षात ‘स्मरण क्रांतिवीरांचे’ या मालिकेत राष्ट्रपुरुष डॉ. हेडगेवार यांच्या क्रांतिकार्याची माहिती देताना
~~~

विशेष आनंद होत आहे. नागपूर येथे एका गरीब कुटुंबात केशवराव यांचा जन्म १ एप्रिल १८८९ या दिवशी झाला. त्यांच्या आईचे नाव रेवतीबाई होते. वडील बळीराम हे वेद आणि भारतीय तत्त्वज्ञानाचे अभ्यासक होते. महादेव आणि सीताराम असे त्यांचे दोन ज्येष्ठ बंधू होते. क्रांतिकारी विचारांचे केशवराव शाळेत शिकत असताना इंग्रज इन्स्पेक्टर जेव्हा शाळेत तपासणीसाठी आले; तेव्हा केशवराव यांनी आपल्या काही वर्गमित्रांसह वंदे मातरम्च्या जयघोषाने त्यांचे स्वागत केले. त्यामुळे इंग्रज इन्स्पेक्टर संतापले. त्यांच्या आदेशानुसार केशवराव यांना शाळेतून काढून टाकण्यात आले. शाळेतून काढून टाकल्यानंतर त्यांनी पुण्यातील नॅशनल स्कूलमध्ये शालेय शिक्षण पूर्ण केले. त्यांचे ज्येष्ठ बंधू महादेव हे शास्त्रात तसेच मल्ल-युद्धाच्या कलेतही पारंगत होते. ते रोज आखाड्यात जाऊन व्यायाम करत. गल्लीतल्या मुलांना गोळा करून कुस्तीचे डावपेच शिकवत असतं. महादेव हे भारतीय संस्कृती आणि विचारांचे काटेकोरपणे पालन करत. महादेव यांच्या आचार-विचारांचा केशवराव यांच्या मनावर खोलवर प्रभाव पडला. मात्र, महादेव यांच्यापेक्षा ते अधिक क्रांतिकारी विचारांचे होते.

वैद्यकशास्त्राचे शिक्षण घेण्यासाठीते १९१० मध्ये कलकत्त्याला गेले. तेथे ते क्रांतिकारकांच्या अनुशीलन समिती मध्ये सामील झाले. त्यामार्फत ते क्रांतिकार्यात सहभागी होऊ लागले. त्यांची प्रखर नेतृत्व प्रतिभा ओळखून त्यांची हिंदू महासभोच्या बंगाल राज्याच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली.

कलकत्ता वैद्यकीय महाविद्यालयातून ते प्रथम श्रेणीत वैद्यकीय परीक्षा उत्तीर्ण झाले. केशवराव डॉ. केशवराव हेडगेवार झाले. पण देशसेवेसाठी त्यांनी घरच्यांच्या इच्छेविरुद्ध नोकरीचा प्रस्ताव नाकारला. नागपुरात परतल्यावर १९१५ मध्ये ते काँग्रेसमध्ये सक्रिय झाले. कालांतराने विदर्भ प्रांतीय काँग्रेसचे सचिव झाले. १९१६ मध्ये काँग्रेसच्या अधिवेशनात सहभागी होण्यासाठी ते लखनौला गेले. डॉ. हेडगेवार काँग्रेस आणि हिंदू महासभा या दोन्ही पक्षांत कार्यरत होते. १९२० मध्ये नागपूर येथे काँग्रेसचे देशव्यापी अधिवेशन झाले तेव्हा डॉ. हेडगेवार यांनी काँग्रेसच्या या अधिवेशनात प्रथमच पूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मांडला, पण तो मंजूर झाला नाही. १ ऑगस्ट १९२० या दिवशी लोकमान्य टिळकांचे निधन झाले आणि टिळक युगाचा अस्त होऊन गांधीयुग सुरू झाले. गांधींनी ४ सप्टेंबर १९२० या दिवशी असहकार आंदोलन सुरू केले. हे आंदोलन ऐन भरात होते. तेव्हा स्वराज्यासाठी इंग्रज सरकारच्या विरोधातील या आंदोलनात डॉ. हेडगेवारांच्या जहाल आणि प्रभावी भाषणांनी लोकांवर गारुड केले होते. लोकमान्य टिळकांच्या नंतर काँग्रेसला हिंदुत्वाच्या दिशेने नेणारा नेता डॉ. हेडगेवारांच्या रुपाने मिळाला होता. डॉ. हेडगेवारांनी काँग्रेसच्या सभांमधून इंग्रजांच्या विरोधात रान उठवले. मात्र, नंतर हे आंदोलन गांधींनी अचानक स्थगित केले. मात्र, असहकार आंदोलनात भाग घेतल्याने १९ ऑगस्ट १९२१ ला ब्रिटिशांनी डॉ. हेडगेवार यांना अटक केली. त्यांना एक वर्षाचा तुरुंगवास भोगावा लागला. तोपर्यंत क्रांतिकारी विचारांचे धाडसी डॉ. हेडगेवार लोकप्रिय झाले होते. १२ जुलै १९२२ या दिवशी अशी शिक्षा भोगून डॉ. हेडगेवार तुरुंगाबाहेर आले.

तुरुंगातील सुटकेनंतर त्यांच्या स्वागतासाठी आयोजित केलेल्या सभेला पंडित मोतीलाल नेहरू आणि हकीम अजमल खान यांच्यासारख्या दिग्गजांनी संबोधित केले होते. आपल्या

**'स्मरण क्रांतिवीरांचे' मालिका समारोप**

**भारताच्या स्वातंत्र्यासाठी देशभरातील अनेक ज्ञात-अज्ञात क्रांतिकारकांनी आपल्या जीवनाची आहुती दिली. या क्रांतिकारकांनी केलेल्या कार्याची माहिती देशबांधवांना व्हावी; यासाठी 'स्मरण क्रांतिवीरांचे' या मालिकेद्वारे त्यांना अभिवादन करण्यात आले. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त गेली दोन वर्षे ज्येष्ठ पत्रकार आणि विद्या भारती, पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे प्रचार विभाग प्रमुख राजन वडके (९८८१०९९००९) यांनी ही मालिका सादर केली. संघ निर्माते राष्ट्रपुरुष डॉ. केशव बळीराम हेडगेवार आणि क्रांतिकारक बाबाराव सावरकर यांच्या क्रांतिकार्याच्या माहितीने 'स्मरण क्रांतिवीरांचे' या मालिकेचा आपण समारोप करत आहोत. या मालिकेबाबत वाचकांनी आपल्या लेखी प्रतिक्रिया 'हिंदुबोध' कडे पाठवाव्यात. त्या आगामी अंकात प्रकाशित केल्या जातील.**

**या सर्व तसेच अन्य क्रांतिवीरांच्या कार्याची माहिती आपण From Rajan's Desk या यू ट्यूब चॅनलवर पाहू शकता.**

**- संपादक, हिंदुबोध, मो. ९८२२२ ६१६६२**

भाषणांतून डॉक्टरांनी पुन्हा इंग्रजांच्या विरोधात तोफगोळे फोडण्यास सुरुवात केली. त्यांच्या जहाल भाषणाने इंग्रज सरकार जेरीस आले. दरम्यान, गांधींचे राजकीय पटलावर आगमन झाल्यानंतर मुस्लीम सांप्रदायिकतेने डोके वर काढायला सुरुवात केली. खिलाफत चळवळीला गांधीजींचा पाठिंबा होता. खिलाफत चळवळीमुळे नागपूर आणि इतर अनेक ठिकाणी हिंदू-मुस्लीम दंगली सुरू झाल्या डॉ. हेडगेवारांनी खिलाफत चळवळीवर जोरदार टीका केली. त्यांच्यासह नागपुरातील काही हिंदू नेत्यांना जाणवले की, हिंदू ऐक्य लोकांचे आणि देशाचे रक्षण करू शकते. या काळात मलबारातील मोपल्यांच्या बंडामुळे हिंदूंवर अत्याचाराचे प्रकार घडत होते. असंख्य हिंदू नाहक बळी गेले होते. तेव्हा हिंदूंना मदत करण्यासाठी अनेक हिंदू नेते मलबार-केरळला गेले, त्यात नागपूरचे हिंदू महासभेचे प्रमुख नेते डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे, डॉ. हेडगेवार, आर्य समाजाचे नेते स्वामी श्रद्धानंद आदींचा समावेश होता. तेथील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी झालेल्या बैठकीला डॉ. हेडगेवार आणि डॉ. लक्ष्मण वासुदेव परांजपे उपस्थित होते, या बैठकीत त्यांनी 'हिंदू-मिलिशिया' स्थापन करण्याचा निर्णय घेतला, हिंदूंचे रक्षण करणे आणि हिंदुस्थानला सशक्त हिंदुराष्ट्र बनविणे हे त्याचे उद्दिष्ट होते.

१९२३-२४ मध्ये क्रांतिकारक विनायक दामोदर सावरकर यांचे 'हिंदुत्व' हे पत्र प्रसिद्ध झाले. त्यात डॉ. हेडगेवार यांचाही सहभाग होता. या पत्राचे मूळ हस्तलिखित त्यांच्याकडे होते. काँग्रेसमधील त्यांचा मनापासून सहभाग आणि तुरुंगजीवनातील अनुभव यामुळे त्यांना समाजजीवनाचा अभ्यास करता आला. समाजातील एकात्मतेची आणि लोप पावत चाललेली देशभक्तीची भावना केवळ काँग्रेसच्या जनचळवळीने जागृत व प्रकट होऊ शकत नाही, असे त्यांना प्रकर्षाने जाणवू लागले. इंग्रजांच्या दडपशाहीविरुद्ध बंडाची भावना जागृत करण्याचे कार्य चालू राहील, पण राष्ट्रजीवनातील तीव्र फुटीरतावादी प्रवृत्तीवर मात करण्यासाठी काही वेगळ्या उपायांची गरज आहे, असे डॉ. हेडगेवार यांना वाटू लागले. डॉ. हेडगेवार हे माणसाची क्षमता वाढवण्यासाठी नवनवीन पद्धती विकसित करणारे आगळे व्यक्तिमत्त्व होते. तत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन त्यांनी निमलष्करी संघटनेचा पाया रचला. डॉ. हेडगेवार, डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे, डॉ. परांजपे आणि बापूसाहेब सोनी यांनी 'हिंदू युथ क्लबची' पायाभरणी केली होती. या विचारसरणीचा व विचारमंथनाचा परिणाम म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ नावाच्या संस्कार शाळेच्या रूपाने एक शाखा व्यवस्था सुरू झाली, जी दिसायला साधी पण परिणामकारक ठरली.

'हिंदुत्व हेच राष्ट्रीयत्व आणि राष्ट्रीयत्व हेच हिंदुत्व' हा विचार घेऊन डॉ. हेडगेवार १९२५ सालाला सामोरे गेले. १९२५ साल हे भारताच्या उज्ज्वल इतिहासाला कलाटणी देणारे ठरले. १९२५ मध्ये विजयादशमीच्या दिवशी डॉ. हेडगेवारांनी त्यांच्या संपर्कात आलेल्या राष्ट्रभक्त तरुणांना एकत्र करून, 'आजपासून आपण संघ सुरू करीत आहोत,' असे जाहीर केले. संघ निर्माते डॉ. हेडगेवारांनी हिंदुत्वाच्या विचाराची सुवर्ण पाने नागपूरकरांना मुक्तहस्ते वाटप करत संघाच्या मुहूर्ताचा नारळ भारतमातेच्या पूजनाने वाढवला. नागपूरच्या पडक्या वाड्यात संघाची पहिली दैनंदिन शाखा सुरू झाली. भगव्या ध्वजाला गुरुस्थानी संबोधून 'नमो धर्मभूमी जियेच्याच कामी पडो देह माझा सर्वदा' या प्रार्थनेचे स्वर कानात घुमू लागले. संघाचे कार्य सुरू झाल्यानंतरही त्यांचा काँग्रेस आणि स्वातंत्र्यलढ्यासाठी क्रांतिकारकांच्या कार्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक राहिला. संघाच्या माध्यमातून ते इंग्रजांना धूळ चारत राहिले. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला पाठिंबा देत राहिले. डॉ. हेडगेवारांचे क्रांतिकारकांशी संबंध कायम होते. १९२८ मध्ये लाहोरमध्ये सॉन्डर्स याच्या वधानंतर भगतसिंग, सुखदेव आणि राजगुरू भूमिगत झाले. तेव्हा राजगुरू हे डॉ. हेडगेवार यांना भेटण्यासाठी नागपूरला गेले. तेव्हा डॉ. हेडगेवारांनी उमरेड येथील संघाचे प्रमुख पदाधिकारी भैय्याजी दाणी यांच्या निवासस्थानी त्यांची राहण्याची व्यवस्था केली होती.

त्यानंतर १९२९ मध्ये लाहोर येथे झालेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात अखेर स्वराज्याचा ठराव संमत झाला. डॉ. हेडगेवार यांच्या सूचनेनुसार २६ जानेवारी १९३० या दिवशी देशभरातील संघाच्या सर्व शाखांमध्ये तिरंगा फडकवून पूर्ण स्वातंत्र्य मिळविण्याचा संकल्प करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार त्यांनी सर्व संघ शाखांना एक परिपत्रक पाठवले. काँग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्याला आपले ध्येय घोषित करणारा ठराव मंजूर केला आहे. २६ जानेवारी १९३० हा स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करण्याचे आवाहन केले आहे. संघाला स्वाभाविकच खूप आनंद आहे की; अखिल भारतीय काँग्रेसने आमच्या पूर्ण स्वातंत्र्याच्या


ध्येयाला मान्यता दिली आहे. त्या ध्येयासाठी काम करणाऱ्या कोणत्याही संघटनेशी सहकार्य करणे हे आमचे कर्तव्य आहे. म्हणूनच, प्रत्येक शाखेतील सर्व स्वयंसेवकांनी रविवारी, २६ जानेवारी १९३० ला संध्याकाळी ६ वाजता संघस्थानांवर एकत्र यावे. राष्ट्रध्वजाला वंदन केल्यानंतर, स्वातंत्र्याची संकल्पना आणि हा एकमेव आदर्श सर्वांसमोर का ठेवला पाहिजे, याची माहिती द्यावी. संपूर्ण स्वातंत्र्याचा आदर्श स्वीकारल्याबद्दल कॉंग्रेसचे अभिनंदन करून, कार्यक्रमाचा समारोप करावा. त्यानुसार संघाच्यासर्व स्वयंसेवकांनी २६ जानेवारी १९३० ला शाखांमध्ये स्वातंत्र्य दिन साजरा केला. नंतर १२ मार्च १९३० या दिवशी गांधींनी 'मीठाचा सत्याग्रह' करून सविनय कायदेभंग चळवळ सुरू केली. डॉ. हेडगेवार यांनी या चळवळीला पाठिंबा दिला. डॉ. हेडगेवार यांच्या पुढाकाराने १०० स्वयंसेवकांचे वैद्यकीय सेवा पथक स्थापन करण्यात आले. मीठाच्या सत्याग्रहाच्या वेळी पोलिसांच्या क्रूरतेचा फटका बसलेल्या सत्याग्रहींवर या पथकातील स्वयंसेवकांनी नागपूर आणि परिसरातील भागात तातडीने उपचार केले. दरम्यान, डॉ. हेडगेवार यांनी स्वतः या सत्याग्रहात भाग घेण्याचा निर्णय घेतला. ब्रिटिश अधिकाऱ्यांकडून अटक होण्याची शक्यता लक्षात घेऊन, डॉ. हेडगेवार यांच्या अनुपस्थितीत, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे नेतृत्व डॉ. लक्ष्मण वासुदेव परांजपे यांच्याकडे सोपवण्यात आले. कार्यवाहक सरसंघचालक म्हणून त्यांची नियुक्त करण्यात आली. सर्व स्वयंसेवकांना १२ जुलै १९३० ला या बदलाची माहिती देण्यात आली. डॉ. हेडगेवार आणि संघ स्वयंसेवकांचा एक गट सत्याग्रह करण्यासाठी १४ जुलैला नागपूरहून पुसद येथे गेला.


त्यानंतर डॉ. हेडगेवार आणि त्यांच्या तुकडीने २१ जुलै या दिवशी वन कायदा मोडण्याची घोषणा केली. त्यानुसार सत्याग्रहींनी राखीव जंगलात प्रवेश करून अधिकाराचा अवमान करताच, पोलिसांनी त्यांना अटक केली. पोलिसांच्या गाडीत बसण्यापूर्वी डॉ. हेडगेवार यांनी, हे आंदोलन अधिक वेगाने पुढे नेण्याचे आवाहन लोकांना केले. त्यांना सहा महिने सक्तमजुरी आणि तीन महिने साधी शिक्षा सुनावण्यात आली. त्यांची रवानगी अकोला तुरुंगात करण्यात आली. ब्रिटिश पोलिसांना न घाबरता संघ संस्थापकांनी अकोला तुरुंगाच्या परिसरातच संघ शाखा सुरू केली. १४ फेब्रुवारी १९३१ ला त्यांची तुरुंगातून सुटका झाली.ते १७ फेब्रुवारीला नागपूरला परतल्यानंतर त्यांनी सरसंघचालक म्हणून पुन्हा जबाबदारी स्वीकारली. नंतर डॉक्टरांनी संघ कार्यावर लक्ष केंद्रित केले. संघाच्या वाढीसाठी अनेक कार्यकर्ते पूर्णवेळ प्रचारक म्हणून देशभरात गेले. संघकार्य जोमाने वाढू लागले. डॉ. केशव बळीराम हेडगेवार 'संघनिर्माते' म्हणून हिंदुस्थानाला सुपरिचित झाले.

१९३४ मध्ये वर्धा येथे संघाचे हिवाळी शिबीर होते. १५०० स्वयंसेवक शिबिराला उपस्थित होते. या शिबिराला महात्मा गांधी यांनी भेट दिली. महादेवभाई देसाई यांना बरोबर घेऊन गांधीजी आले होते. आप्पाजी जोशी यांच्या समवेत त्यांनी शिबिराची पाहणी केली. स्वयंसेवकांची शिस्त पाहून गांधीजी प्रभावित झाले. त्यांनी स्वयंसेवकांना प्रश्न विचारले की, तुम्ही कोणत्या जातीचे आहात, प्रत्येकाने, आम्ही हिंदू आहोत. असे एकच उत्तर दिले. संघकार्याचा गाडा पुढे नेत असताना १९४० मध्ये डॉक्टरांची प्रकृती बिघडली. त्या वर्षीच्या संघ शिक्षा वर्गातही डॉक्टरांनी स्वयंसेवकांना संबोधित करून हिंदुत्वाची ज्योत प्रज्वलित ठेवण्याचे आवाहन केले. अखेर २१ जून १९४० या दिवशी या राष्ट्रपुरुषाने अखेरचा श्वास घेतला.

नागपुरातील रेशीमबाग येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. तेथेच त्यांची समाधी उभारण्यात आली आहे. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात हिंदुत्वाच्या विचारातून लढणारे थोर स्वातंत्र्य योद्धे डॉ. केशव बळीराम हेडगेवारांच्या पवित्र स्मृतीला शतशः प्रणाम !

**राजन वडके, ज्येष्ठ पत्रकार, प्रचार विभाग प्रमुख,**
**विद्या भारती, प. म. प्रांत.**




Janaseva Sahakari Bank Ltd. Hadapsar, Pune
आव्हान ...
ग्लोबल वॉर्मिंगचे,
पर्यावरण संवर्धनासह
लाभ मिळवा सेव्हिंगचे !
रुफटॉप सोलर इलेक्ट्रिक, सोलर वॉटर हिटरसाठी
जनसेवा बँक सोलर कर्ज
अल्प प्रोसेसिंग फी
किफायतशीर व्याजदर
सुटसुटीत कर्ज प्रक्रिया
जनसेवा सहकारी बँक लि., हडपसर, पुणे.
जनसामान्यांची असामान्य बँक, जनसेवेसाठी वचनबद्ध !
www.janasevabankpune.net

वार्षिक वर्गणी रु. २००/- फक्त
Date of Publication : 26/07/2025 and
Date of Posting : 28/07/2025 at PSO, GPO, Pune 411 001

RNI NO. MAHMAR/2001/05879
Postal Registration No. PCW/077/2024-2026
Licence to post Without Prepayment No. WPP-114

# हिंदुबोध
(मासिक)

सप्रेम नमस्कार,

विश्व हिंदू परिषदेचे संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचणारे एकमेव मासिक म्हणजे **'हिंदुबोध'.**

● मासिक मुल्य रु. २०/- ● वार्षिक वर्गणी रु. २००/- ● त्रैवार्षिक वर्गणी रु. ५००/-

(पंचवार्षिक किंवा आजीवन योजना आता बंद केली आहे.)

००००

## ✻ हिंदुबोध जाहिरात दरपत्रक ✻

मासिक पाने ४४ (रंगीत पानांसह)

| | | | |
|---|---|---|---|
| रंगीत पूर्ण पान रु. १.५ लाख | साधे पान रु. १ लाख | साधे अर्धे पान रु. ५०,०००/- | साधे १/४ पान रु. २५,०००/- |
| साधे १/८ पान रु. १२,०००/- | साधे १/१६ पान रु. ६,०००/- | सौजन्य पृष्ठ (तळटीप शुभेच्छा) रु. २,१००/- | |
| हिंदुबोध अंक मुल्य रु. २०/- | वार्षिक वर्गणी रु. २००/- | त्रैवार्षिक वर्गणी रु. ५००/- | |

## ✻ हिंदुबोधची वर्गणी ✻

जनता सहकारी बँक लि. शनिवार-नारायण पेठ शाखा, पुणे - ४११०३०.

**Account Name : Hindubodh**

A/C No : 015220100024473 IFSC Code : JSBP0000015

**HINDU BODH**

Scan QR Code below with your PSP App

Or Pay to VPA
hindubodh@jsb

**कार्यालयीन पत्ता : संपादक, हिंदुबोध**

विश्व हिंदू परिषद, महाराष्ट्र प्रदेश (पश्चिम) १३६०, शुक्रवार पेठ, भारत भवन, पुणे - ४११ ००२.

दूरध्वनी : ९०४९३९६३६३, दूरभाष : (०२०) २४४७१७०१

**Email : hindubodh.pmp@gmail.com**

**हिंदुबोध**
द्वारा : रविकांत कळंबकर, ९८२२२६१६६२
विश्व हिंदू परिषद, १३६० शुक्रवार पेठ, नातूबाग,
भारत भवन, पुणे - ४११ ००२.
दूरध्वनी : ०२०-२४४७१७०१